शनिवार । २५ जुलै १९८१ । एक रुपया

# माणूस

## विनाशाच्या काठावर उभे असलेले महानगर—मुंबई

पृष्ठ....८

## 'कलयुग'...धंदेवाईक चित्रपटांच्या कुशीत श्याम बेनेगल

पृष्ठ....१९

## अस्वस्थ करणारी संध्याकाळ (कोल्हापूर)

पृष्ठ....१३



"कविता हा आमचा विरंगुळा आहे.
ती आमची गरज आहे.
तुमचंही तसंच असणार.
म्हणूनच तुम्ही सगळी मंडळी
इथं आला आहात...."
—पु. ल. देशपांडे

सुनीताबाई
आणि
मर्ढेकर

(उत्तरमीमांसा—पृष्ठ....५)

पुणे वार्ता

# पाणिनी चर्चासत्र

## पाश्चात्य अभ्यासक स्वखर्चाने आले होते

महाराष्ट्रामध्ये संस्कृत नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. शाळा–कॉलेजमध्ये तर संस्कृतची केवळ दयनीय अवस्था आहे. अशा वेळी पुण्याच्या 'संस्कृत प्रगत अध्ययन केन्द्रा'मध्ये संस्कृतचा आणि तोही केवळ एका शाखेवरील जागतिक चर्चासत्रासारखा एक विलक्षण कार्यक्रम करण्यात आला. संस्कृतची व्याकरण ही जशी एक शाखा तशाच वेद, वेदान्त, न्याय, मीमांसा, साहित्य, साहित्यशास्त्र या अन्य शाखा. या जागतिक ज्ञानसत्रास अर्थातच जगातील निरनिराळ्या देशांतून प्रा. कार्दोना, प्रा. किपार्स्की, प्रा. स्टाल, प्रा. शार्फे, प्रा. रुट्बेर्गेन यांसारखे पाश्चात्य तर प्रा. अकलूजकर, प्रा. देशपांडे, प्रा. मणिलाल यांसारखे काही भारतीयच परंतु परदेशात स्थायिक झालेले विद्वान आले होते. विशेष उल्लेख करण्यारखी गोष्ट ही की, हे सारे पाश्चात्य स्वखर्चाने आले होते.

पाणिनी हा व्याकरणाचा उद्गाता. पाणिनी हे व्यक्तिनाम असावे की नाही याविषयीदेखील वाद आहे. तर त्याचा काळ इसवी सन पूर्व आठवे शतक असावा की, चौथे शतक यावर वाद असणे स्वाभाविकच आहे. त्याच्याच एका सूत्रावरून (अष्टा. ६. ४, १६५) ते गोत्रनाम असावेसे वाटते. भट्टोजी दीक्षित तर पणीचा पुत्र तो पाणिन व त्याचा नातू तो पाणिनी अशी अगदी वेगळी व्युत्पत्ती देतात. त्याचा जन्म सध्याच्या लाहोरमध्ये झाला असावा असे मानतात. अर्थात अशा प्रकारे जन्माचा काळ आणि नावातच मतभेद असल्याने त्याच्याविषयी असणारी इतर माहिती म्हणजे दंतकथाच होत. त्याच्याबाबतीत एक गंमतीची कथा अशी सांगतात की, पाणिनी व कात्यायन असे दोघे वर्ष नावाच्या गुरूचे शिष्य. पैकी पाणिनी अगदी मदबुद्धीचा तर कात्यायन कुशाग्र बुद्धीचा. अर्थातच पाणिनीला ते सारं असह्य झालं आणि तो हिमालयात निघून गेला. तेथे त्याने शिवाची आराधना केली. शिवाने प्रसन्न होऊन त्याला प्रतिभाशाली बुद्धी दिली. त्याच्यासमोर नृत्य करताना शिवाने डमरूनाद केला. त्यातून येणाऱ्या नादावरून पाणिनीने अष्टाध्यायीची 'अइउण्,' 'ऋलृक्' अशा प्रकारची सुरुवातीची १४ प्रत्याहार सूत्रे बनवली. त्या १४ शिवसूत्रावरच अष्टाध्यायी आधारित आहे.

अशाच प्रकारची त्याच्या मृत्यूविषयीही एक कथा सांगितली जाते की, पाणिनी 'निघ्रति इ व्याघ्रः' अशा प्रकारे 'व्याघ्र' शब्दाच्या व्युत्पत्तीविषयी विचार करत होता. त्याच्या समोर प्रत्यक्ष वाघ आला; पण त्याचे त्या वाघाकडे लक्षच गेले नाही आणि अखेर त्या वाघाने त्याला खाऊन टाकले. त्या वेळी पाणिनीच्या मुखातून 'अ अ' अशा प्रकारे दोन स्वर बाहेर पडले जे अष्टाध्यायीतील अखेरचे सूत्र ठरले. अष्टाध्यायी हा पाणिनीचा एकमेव ग्रंथ; पण जो जगातील सर्व विद्वानानी पकड घेऊ शकला. त्याच्यापूर्वीही भारतात शब्दविद्येचा अनेकांगी विकास झालेला होता याचा पुरावा म्हणून पाणिनीच्या अष्टाध्यायीत शाकटायन, गार्ग्य, शाकल्य, शौनक, भारद्वाज, काश्यप अशा अनेक पूर्वाचार्यांची नावे आढळतात; पण अष्टाध्यायीसारख्या सर्वांगपरिपूर्ण आणि बंदिस्त ग्रंथाने पूर्वीच्या ग्रंथाचा लोप झाला. अष्टाध्यायीचे एकूण आठ अध्याय व प्रत्येकी चार पाद असून त्यात एकूण ३९८१ सूत्रे आहेत. यात ५०० गावे आणि नगरे यांची पूर्ण सूची मिळते. याखेरीज २५०० वर्षांपूर्वीची भारतातील कृषी, क्रीडा, शिक्षण, रीतिरिवाज, कलाकौशल्य, देवधर्म उपासनापद्धती, गृहजीवन, व्यवसाय यांची माहिती उपलब्ध होते,

या विषयावर संपूर्ण जगात अभ्यास चालला आहे अशा वेळी पौर्वात्य व पाश्चात्य याच्यात वैचारिक देवघेव व्हावी हा तर या चर्चासत्राचा प्रमुख उद्देश; पण त्याचबरोबर पाणिनीच्या व्याकरणाचा पारंपारिक व आधुनिक रीतीने जो अभ्यास करण्यात येतो त्याविषयीचे विचार एकमेकांना कळावे असाही एक दृष्टिकोण होताच. यात एक गंमतीचा भाग असा की प्रा. कार्दोना पाणिनीचा पारंपारिक रीतीने अभ्यास करणारे तज्ज्ञ तर डॉ. शि. द. जोशी पाणिनीचा आधुनिक रीतीने अभ्यास करणारे पंडित.

अशा अनेकविध उद्देशानी युक्त असलेले

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : आठवा

२५ जुलै १९८१

किंमत : एक रुपया

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

चर्चासत्र ९ जुलैला सुरू झाले ते पं श्रीनिवासशास्त्री यांच्या सुमधुर तैत्तिरीय उपनिषद्‌पाठाने. त्यानंतर डॉ. शि. द. जोशी याचे स्वागतपर भाषण झाले. नंतर जगप्रसिद्ध विद्वान डॉ. रा. ना. दांडेकर यांनी 'वेदार्थाच्या निश्चितीसाठी पाणिनी उपयुक्त असला तरी अंधानुकरण नको' असे स्पष्ट शब्दात सांगितले. अध्यक्षीय भाषणात पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम ताकवले यांनी 'संस्कृतच्या अभ्यासाला पाठ्यक्रमात योग्य स्थान न दिल्यास राष्ट्राची फार मोठी हानी होईल अशी भीती व्यक्त केली. सांस्कृतिक ऐक्यासाठी संस्कृतची असणारी आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. यानंतर प्रा. कर्दोना, प्रा. शार्फे, प्रा. रुट्बर्गेन अशा पाश्चात्य विद्वानांची भाषणे होऊन उद्घाटनाचा सोहळा संपला.

यानंतर चर्चासत्रास प्रारंभ झाला. संपूर्ण सप्ताहभर सकाळी ९ ते१२ व दुपारी २–३० ते ५–३० पर्यंत निबंधवाचन झाले, १० व ११ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. पॉल किपार्स्की याची तर १२, १३ रोजी सायंकाळी ६ वाजता व१४ रोजी सकाळी ११ वाजता प्रा. स्टाल यांची व्याख्याने झाली तर रोज रात्री ९ वा. विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम योजले होते आणि भारतीय पाश्चात्य मिळून सुमारे ६० निबंध वाचण्यात आले. यातील काही इंग्रजीत तर काही संस्कृतमध्ये होते. प्रा. अकलूजकर, प्रा. माधव देशपांडे, प्रा. घाटगे, आचार्य लिमये, डोमेनिक कजास्टिक, प्रा. भागवतशास्त्री, डॉ. भाटे यांच्या निबंधांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. या सर्वच निबंधांवर अतिशय साधक–बाधक चर्चा झाली. या संपूर्ण चर्चासत्रात विशेषत्वाने चर्चा झालेला निबंध म्हणून यजन वीर याच्या निबंधाचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी पॉल किपार्स्की यांच्या पुस्तकाविषयी आपले मतभेद मांडले होते. यावर बरीच चर्चा होऊनही यजन वीर मात्र स्वत च्या मुद्द्याना सोडायला किंवा बदलायला तयार नव्हते. अशाच प्रकारे प्रा. दीप्ती त्रिपाठी यांच्याही निबंधाबाबत म्हणता येईल. त्याच्या निबंधावरची चर्चा बरीच एकांगी वाटली. कारण कोणत्याच प्रश्नाला त्या फारसं समाधानकारक उत्तर देऊ शकल्या नाहीत. दि ९, १० व ११ रोजी कै. काशिनाथशास्त्री अभ्यंकरस्मृतिव्याख्यानमालेत डॉ. किपार्स्की यांनी अष्टाध्यायीतील काही वादग्रस्त मुद्द्याचा विचार केला. डॉ. किपार्स्की याना 'Panini as Variationist' या पुस्तकाबद्दल गत वर्षी पारितोषिक मिळाले तर दि. १२, १३ व १४ रोजी कै. प्रा. पा. द गुणे स्मृतिव्याख्यानमालेत प्रा स्टाल यांनी अग्निचयनविषयक व्याख्याने दिली. यामध्ये १४ रोजी तर त्यांनी प्रत्यक्ष स्लाइडस-साहाय्याने पक्ष्याच्या आकाराच्या वेदीवर कशा प्रकारे विटा लावल्या जातात, कसे अग्निचयन केले जाते याविषयी माहिती सांगितली. रात्री ९ वाजता होणाऱ्या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात डॉ. श्रीपादशास्त्री आठलेकराचा अष्टाध्यायी-पाठातराचा स्मृतिचमत्कार, दि. १० रोजी पं. चन्द्रकांत सरदेशमुख यांचे सतारवादन आणि दि. १३ रोजी संस्कृत *प्रगत अध्ययन* केन्द्राचे प्रमुख डॉ. शि. द. जोशी व त्यांचे केन्द्रातील सहकारी प्रा विघ्नहरी देव यानी संस्कृतमध्ये भाषातरित केलेल्या हॅम्लेट या इग्रजी नाटकाचा– चंद्रसेन *दुर्गदेशस्य युवराजः–प्रयोग* हे कार्यक्रम विशेष उल्लेख करण्यासारखे झाले.

या निमित्ताने आलेल्या विद्वानापैकी दोघाशी काही बोलणे शक्य झाले. त्यापैकी प्रा. अशोक अकलूजकर भारतीय असून विदेशी झालेले तर डोमेनिक कजास्टिक पाश्चात्य. दोघेही भिन्न संस्कृतीचे प्रतिनिधी असून त्यांचे वैचारिक साम्य बघण्यासारखे आहे. व्हॅंकुवरमधील संस्कृत केन्द्राचे प्रमुख असलेल्या प्रा. अकलुजकरांनी प्रामुख्याने असे प्रतिपादन केले की संस्कृतचा अभ्यास करताना पाश्चात्यांचा कोणताही भावनिक भर दिसत नाही तर खंडप्राय आणि प्राचीन म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारताच्या संस्कृतीचा अभ्यास करताना भारताची प्रमुख भाषा म्हणून संस्कृतचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. कारण 'संस्कृतिः संस्कृताश्रिता' हेच खरे. संपूर्ण जगामध्ये केवळ पाचच प्रमुख भाषा मानल्या जातात, त्या म्हणजे संस्कृत, ग्रीक, लॅटिन, अरेबियन आणि चीनी. या दृष्टिकोनातूनही पाश्चात्य देशात संस्कृतचा अभ्यास केला जातो. अशा प्रकारचं व्हॅंकुवरमधील केन्द्र Centre of South Asian Languages म्हणून प्रसिद्ध आहे. पाश्चात्य देशात तौलनिक अभ्यासास प्राधान्य दिलं जातं. केवळ संस्कृतवर तेथे कुणीच अवलंबून न राहता त्याच्या जोडीला धर्म, परंपरा, भाषाशास्त्र यापैकी कशाचा तरी अभ्यास केला जातो. विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे चांगल्या प्रकारे संस्कृत बोलता व वाचना येणं हे तेथे आवश्यक असतं.

डोमेनिक कजास्टिक हा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीत Ph. D. करणारा विद्यार्थी.इंग्लडमध्ये कॉलेज व युनिव्हर्सिटी असा विभाग नसून सुमारे ३०/३२ कॉलेजेस् ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीच्या कक्षेत येतात. त्या कॉलेजांमध्ये पदवीपूर्व, पदव्युत्तर आणि संशोधन असा तीनही प्रकारचा अभ्यास चालतो. डोमेनिक कजास्टिक Brasenose कॉलेजमध्ये असून त्या कॉलेजची स्थापना सुमारे १६०६ मध्ये झालेली आहे. त्या कॉलेजच्या नावाचे speling 'noze' असे न करता 'nose' असेच केले जाते. कारण याविषयीची गमतीची गोष्ट म्हणजे त्या कॉलेजच्या दाराचा आकार एखाद्या माणसाच्या *नाकाप्रमाणे आहे.* कजास्टिकने संस्कृत अधिक शास्त्रशुध्द भाषा असल्याचे मान्य केले. 'पाश्चात्याना संस्कृत शिकणं हे कठीण जात नाही का?' असं विचारलं असता त्याने सांगितलं की, वारंवार अभ्यासानेच (Practice) संस्कृत शिकता येते. त्याचप्रमाणे सतत मोठ्याने संस्कृत वाचल्याने ते उच्चार अधिक चांगले होतात. इतर भाषांपेक्षा संस्कृत अधिक शास्त्रशुध्द आहे उदा इंग्रजीमध्ये देखील शब्दांचा उच्चार speling प्रमाणे होतोच असे नाही. जसे, enough मधील 'gh' चा उच्चार 'घ' होण्याऐवजी 'फ' होतो. असे संस्कृतच्याबाबत घडत नाही. संस्कृतचे उच्चार मूर्धन्य, तालव्य, दन्त्य, ओष्ठ्य,दन्त्योष्ठ्य अशा प्रकारे पूर्णपणे साचेबंद असतात. संस्कृत भाषा ही त्या दृष्टीने शिकायला सुलभ असली तरी भारतीय संस्कृतीतील यज्ञ किंवा समिधा यासारख्या संकल्पना मात्र आम्हा पाश्चात्यांना कळणे अत्यंत कठीण असते असे त्याने सांगितले आणि या संकल्पना थोडयाफार प्रमाणात जरी समजून घ्यायच्या असतील तरी भारतात सर्वत्र फिरून यज्ञयागादीसारख्या क्रिया प्रत्यक्ष बघणे किंवा तज्ज्ञांना याबाबत विचारणे याखेरीज अन्य मार्ग नाही. अर्थात इतके करूनही भारतीयांप्रमाणे त्या पाश्चात्यांना पूर्णपणे समजतातच असे नाही. कारण अखेर हा दोन संस्कृतीमधील फरक आहे. प्रा. अकलूजकरांप्रमाणेच कजास्टिकनेही तौलनिक अभ्यासक्रमावर भर दिला. त्याविषयी सांगताना तो म्हणाला की, एका हाताला पाच बोटे असतील व दुसऱ्याला तीनच असली तर असे का म्हणून जास्त विचार केला जातो, त्याचप्रमाणे एकाच भाषेचा किंवा संस्कृतीचा अभ्यास करण्यापेक्षा परस्पर

साम्य व भेद असणाऱ्या दोन भाषा किंवा संस्कृतीचा अभ्यास केल्यास एकांगी विचार होत नाही. पाश्चात्य लोक जेव्हा भारतात येतात तेव्हा प्रामुख्याने भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यावर त्याचा भर असला तरी ही मुंबईच्या टाटा रिसर्च इन्स्टिटयूट किंवा I. T. I. मध्ये काही पाश्चात्य विद्वान येतात याचा अर्थ शास्त्रीय दृष्टिकोनातूनही अल्प प्रमाणात का होईना पण पाश्चात्याना भारतात येण्यात रस असतो असे डोमेनिकने सांगितले. गॉम्ब्रीज हे पालीबुध्दीझममधील तज्ज्ञ तर मणिलाल हे भारतीय परंतु इंग्लंडला स्थायिक झालेले न्याय-वैशेषिक शाखेचे पंडित. डोमेनिकची मात्र भारतीय संस्कृती आणि जैनिझम यांचा तौलनिक अभ्यास करण्याची मनीषा आहे.

अशा प्रकारे आयोजित करण्यात आलेले जागतिक ज्ञानसत्र १४ जुलैला समाप्त झाले. सुमारे २०० लोकांनी या ज्ञानसत्राचा प्रत्यक्ष लाभ घेतला. केवळ व्याकरणावरील चर्चासत्र असूनही त्यामुळे अमरांची भाषा म्हणून गौरवलेल्या मृतप्राय भाषेला पुन: एकदा उजळा मिळाला आणि त्याचबरोबर भारताकडे इतराना देण्यासारखं खूप आहे; पण त्याचं जतन आणि वाढ योग्य प्रकारे व्हावी हेही सिध्द झालं. स्वखर्चाने या चर्चासत्राला हजर राहणं यातून पाश्चात्यांना या भाषाशास्त्रीय ग्रंथाने किती आकर्षित केलं आहे हे समजतंच. त्याचबरोबर या ग्रंथाचं अलौकिकत्वही सिध्द होतं. परन्तु भारतात-विशेषत: महाराष्ट्रात संस्कृतची होणारी आबाळ आणि पाश्चात्यांना त्याविषयी वाटणारं महत्त्व यातील विरोधाभास सहज जाणवण्यासारखा आहे. प्रा. स्टाल यासारख्या यज्ञयागाशी पूर्ण अपरिचित संस्कृतीत वाढलेल्या व्यक्तीने स्वत: यज्ञाचं अध्वर्यूपण करून एक संपूर्ण यज्ञ केला. इतकंच नव्हे तर अग्निचयनावर अप्रतिम व्याख्यानं दिली आणि इकडे भारतात मात्र काही वर्षातच यज्ञसंस्था लोप पावेल किंवा काय अशी भीती निर्माण झाली आहे. कदाचित पाश्चात्यांना ही भाषा परकी असल्यानं याचं महत्त्व वाटत असेल ही गोष्ट नाकारता येत नसली तरीही ते लोक स्वत च्या कोणत्याही गोष्टीचा अशा प्रकारे ऱ्हास होत असताना गप्प बसणार नाहीत हा त्याचा गुण आपण लक्षात घेण्यासारखा आहे. राखेतून पुन: जर्मनीसारखं राष्ट्र निर्माण झालं आणि आपण मात्र आज आपल्या डोळ्यांदेखत अत्यंत समृद्ध असणारी भाषा मृतप्राय म्हणून त्याज्य ठरवत आहोत ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे हे नाकारता येत नाही !

—श्यामला कामत

# मुंबई वार्ता

## ☐ बुवाबाजीशी लढाई

किरण नगरकरांच्या 'सात सक्कं त्रेचाळिस' मधला कुशंक म्हणतो की, अख्ख्या जगावर कोबाल्ट बॉम्ब पडून ते बेचिराख झालं तरी मुंबईतल्या लोकलसना मात्र माणसं लटकलेली असतील ! गर्दीचा असाच आणखी एक हुमखास पत्ता म्हणजे दादर टी. टी. अगदी रात्री-अपरात्रीसुद्धा इथल्या वर्दळीला उसंत नसते, तर संध्याकाळी तर सोडूनच द्या ! उभ्या-आडव्या मध्य-पश्चिम अशा सगळ्या मुंबईची लोकसंख्या दादरभागात एकवटलेली असते. आता सध्याच्या दिवसात ज्यांच्या स्वतःच्या घरी किंवा अगदी शेजारीपाजारीसुद्धा टी. व्ही. नाही असेच अभागी रविवारी संध्याकाळी घराबाहेर पडतात ही गोष्ट निराळी !

पण आषाढी एकादशीच्या रविवारी संध्याकाळी खोदादाद सर्कलहून वडाळयाच्या प्रसिद्ध विठ्ठलमंदिराच्या दिशेने तुम्ही जायला निघाला तर गर्दीच्या त्या विशाल दर्शनानं साफ नतमस्तक होऊन गेला असता. खेरीज, ' मानव हा अखेर एक क्षुद्र जंतू आहे, झालच तर गर्दीच्या या सागरात तो बिंदुमात्र आहे ' वगैरे विनम्र भक्तीभावही तुमच्या मनात डोकावू लागेल. आषाढी एकादशीला वडाळा बसडेपोच्या काठी जी जत्रा भरते ती बरीच महत्वाची समजली जाते. कारण वारकऱ्यांची दिल्ली म्हणजे जरी पंढरपूर असलं, तरी वडाळा हे लोकल –हेड ऑफिस आहे ! तेव्हा जत्रा म्हणजे अगदी रीतसर जत्रा. तिथे कमी-जास्ती काही नाही. फुलं, हारवाले, पूजेचं सामानवाले, खाऊवाले, खेळणीवाले, पाव–भाजीवाले (उपास असल्यामुळे बिनकांद्याची भाजी ! ) वगैरे सगळे आयटेम्स हजर. गर्दी, गडबड, गोंगाट, पिपाण्यांचे आवाज, पिसांच्या टोप्या खेरीज ही मुंबई, त्यामुळे विठोबा काही इथे केवळ म्हराटी माणसांसाठी राखीव नाही. तेव्हा भरतभूच्या या वैविध्यपूर्ण प्रतिनिधित्वामुळे जत्रा एकदम रंगी-बेरंगी आणि ' कॉस्मॉपॉलिटन ' !

जत्रेच्या या गजबजाटात सर्व बाजूंनी बंद केलेला कापडाचा एक छोटासा मांडव लक्ष वेधून घेत होता. लाउडस्पीकरवरून हिन्दी आणि मराठीत घोषणा चालल्या होत्या ' भाविक लोकहो, चला, बाबा विचारानंदांच दर्शन केवळ आठ आण्यात घ्या ! तुमचे कसलेही प्रश्न असोत नोकरी–धंदा, कोर्ट-कचेरी शिक्षण, लग्न, मुलं–बाळं, आजार, चिंता, गरिबी, कसलीही उणीव असो. तुम्ही फक्त बाबा विचारानंदांना भेटा.' मागे पार्श्वभूमीला ' शिरडीवाले साईबाबा' चालू.

माडवाच्या आतमध्ये बाबांची चित्रं आणि मोठी पोस्टर्स लावली होती, ' चमत्कार बाबाका, रहस्य विज्ञान का ' बाहेरच्या लाबलचक क्यूमध्ये उभी असलेली माणसं आत येत होती. मांडव झपाट्यानं भरत होता. प्रेक्षकांपैकी काही कुतूहलाने आलेले पण बहुसंख्य चेहऱ्यावर भोळा विश्वास आणि भाबडा भक्तीभाव.

निवेदकाचं निवेदन, ' रामकृष्णहरी 'चा गजर, उदबत्ती आणि धुपाचा दरवळ, स्टेजवरच्या भगव्या कपड्यातल्या भक्ताची लगबग अशा सगळ्या पार्श्वभूमीवर काही वेळच्या प्रतीक्षेनंतर बाबाचं आगमन होतं. स्टेजवरच्या भक्तमंडळीकडून त्याची पूजा होते. सर्वांना आशीर्वादासाठी हात वर करत असताना बाबा धाडकन एक जळता निखारा गिळून दाखवतात. भाविकाच्या तोंडाचा आ वासला जातो, मग बाबा चमत्कारावर चमत्कार दाखवायला लागतात. सहज हातावर हात चोळून ते विभूती काढून दाखवतात. मग एक तार घेऊन ती जिभेच्या आरपार घालून दाखवतात. मध्येच ते बेभान होतात, घुमायला लागतात. त्याचा आत्मा थेट ब्रह्मलोकात विहार करायला जातो. त्यांचं ते घुमणं, भारावलेलं वागणं, स्टेजवर ठेवलेल्या मंचकावर सहज डोलात बसणं, आशीर्वादासाठी उंचावलेला हात, येता–जाता जळते निखारे खाणं या साऱ्यानं प्रेक्षक अगदी मंत्रमुग्ध होतात. मग प्रेक्षकात बसलेले भाविक आपली गाऱ्हाणी घेऊन बावांकडे यायला लागतात. स्टेजवरचे भक्त ' चपला काढा ! बाबाना नमस्कार करा ! ' अशा सूचनांनी बाबाच्या आजूबाजूचं पवित्र वातावरण कायम राखतात. दुसऱ्याच्या मनातलं ओळ-

खेणं–भूतबाधा ? संतानप्राप्ती ? कॅन्सर ? घरगुती अडचणी ?– बाबाच्या विभूतीमध्ये सगळ्या प्रश्नाची उत्तरं असतात !

अधी-पाऊण तास दैवी चमत्कारांची अशी खैरात करुन झाल्यावर आता बाबा आपला दिव्यसंदेश देतील, असं निवेदक जाहीर करतो. भाविक औत्सुक्यानं कानाचे शिपले करून पुढे सरसावतात. धीरगंभीर सुरात बाबा बोलायला सुरुवात करतात. पहिलंच वाक्य असतं. 'लोकहो, मी कुणी बाबा नाही !' बोलता बोलता ते आपला नकली केशसंभार उतरवतात ! 'मी लोकविज्ञान संघटनेचा एक कार्यकर्ता आहे. बुवा आणि स्वामीलोकांचे पेटंट चमत्कार कसे फसवे असतात हे दाखविण्यासाठीच आम्ही हा कार्यक्रम केला. या सगळ्या चमत्कारातलं रहस्य विज्ञानाला ठाऊक आहे. पेटता निखारा तर तुम्हीही तोंडात घालू शकाल. तो केवळ तीन सेकंदात विझतो ! विभूति काढणं ही तर हातचलाखी झाली. ज्यांना विभूती काढता येत असेल त्यांनी खरं तर सिमेंटच काढावं ! संतानप्राप्ती, कॅन्सरवर इलाज जर असल्या बाबांनाही करता आले असते तर रुग्णालयं ओस पडली असती ! तेव्हा लोकहो फसू नका, चमत्कार करणाऱ्या भोंदू बाबाकडे जाऊ नका, पैश्याचा अपव्यय करू नका !' 'तमसो मा ज्योतिर्गमय' च्या पार्श्वभूमीवर हे बाबादर्शन संपतं.

या कार्यक्रमात बऱ्याच संस्थांचा सहभाग होता. 'महाराष्ट्र रॅशनॅलिस्ट असोसिएशन' मराठी विज्ञान परिषद, इंडियन विमेन सायंटिस्टस् असोसिएशन, राष्ट्रसेवादल, फुले क्रांतिकारी मंच, अमेय, श्रमिक विकास मंडळ, नवयुग संघटना आणि लोकविज्ञान संघटना अशा बऱ्याच संस्था इथे एकत्र आल्या होत्या. काही महिन्यापूर्वी लोकविज्ञान संघटनेनं शहाद्याला भरवलेल्या विज्ञान जत्रेविषयी वाचलं होतं. ही आत्ताची विज्ञान जत्रा हाही तसाच एक उपक्रम. लोकविज्ञान संघटनेचं पुष्कळसं, खरं म्हणजे संपूर्ण कार्य दलित, तळागाळातल्या आणि आर्थिकदृष्ट्या कनिष्ठ वर्गासाठी आहे. आषाढी एकादशीनिमित्त हा जो अगदी 'शत्रूच्या गोटात' जाऊन केलेला कार्यक्रम होता तोही मुख्यतः अशाच लोकांसाठी आणि त्याला प्रतिसादही उत्तम मिळाला ! पण चमत्कार दिसला रे दिसला की नमस्कारच काय, लोटांगणसुद्धा घालण्याची सवय माणसाच्या आयुष्याच्या कुबड्या बनलेली असते. या कुबड्यांना धक्का बसला की काही माणसं एवढी कोसळतात की त्याना पहाणं मोठं करूण होतं; पण त्याचबरोबर अंधश्रद्धाच्या विरुद्धचा लढा किती तीव्र करायला पाहिजे त्याचीही जाणीव होते. बाबाच्या दर्शनाला आलेली एक म्हातारी मात्र भलतीच थोर निघाली. तिचं म्हणणं असं की, ढोंगी साधू लोकांना लुटतात वगैरे जे काही या बाबानी सांगितलं ते सगळं खरच आहे मुळी. फक्त ते या बाबाला लागू होत नाही, बाकीच्या बुवांना होतं. तेव्हा या बाबाची महती काय वर्णावी ? असं म्हणून ती दिवसभर तिथेच बसून राहिली.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने लोकविज्ञान संघटनेचा, तिच्या कार्याचा आणि कार्यकर्त्यांचा थोडा जवळून परिचय झाला. हे उत्साही कार्यकर्ते प्रथम एकत्र आले ते बाबा आमट्याच्या सोमनाथ विज्ञान केन्द्रातून. तेव्हा ही विज्ञान संघटना अस्तित्वात नव्हती. या तरूण मंडळींनी सूर्यग्रहणाबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठी १६ फेब्रुवारी १९८० च्या सूर्यग्रहणाच्या वेळी एक सूर्यजत्रा भरवली. चबूरच्या झोपडपट्टीमधल्या या सूर्यजत्रेत माणसांनी जमावं म्हणून ग्रहणकाळात फुकट खाण्याचं आमिष ठेवलं. माणसांना, गरोदर स्त्रियांना आग्रह करून घराबाहेर काढलं आणि खरोखरच जेव्हा बाकीच्या मुंबईत शुकशुकाट होता, तेव्हा सूर्यजत्रेत हजाराच्या संख्येत मोजावी लागतील एवढी माणसं होती. सूर्यग्रहण पहाण्यासाठी गॉगल्स (३० पैशाला एक) विकून दहा हजाराची रक्कम तेव्हा उभी केली गेली. या जत्रेत सूर्यग्रहणाचे प्रात्यक्षिक, सूर्यग्रहणाची चित्रं आणि सोप्या भाषेत माहिती मांडली होती.

यापुढचा कार्यक्रम विज्ञानजत्रेचा. प्रकाशा या धुळे जिल्ह्यातल्या छोट्याशा गावी भरलेल्या या विज्ञानजत्रेला आठ–दहा हजार आदिवासी आले होते. जत्रेतले विषयही लोकाच्या अगदी जिव्हाळ्याचे–आरोग्य, रोग, स्त्रियाचं आरोग्य, सेक्स एज्युकेशन, अन्न–भेसळ, पाणी आणि आरोग्य, शेती, नॅचरल सायन्सिस, ॲप्रोप्रिएट टेक्नॉलॉजी, खगोलशास्त्र, शास्त्रीय खेळ अशा–रोजच्या जीवनव्यापारात असलेल्या गोष्टींची माहिती या प्रदर्शनात होती. विशेष असं की, प्रदर्शनात निवेदन करण्यासाठीसुध्दा स्थानिक आदि-

मलपृष्ठ २ वर


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

१. उज्ज्वल उद्यासाठी – ( समाजपरिवर्तनावर लेख ) – बाबा आमटे
२. मर्म – ( समाजपरिवर्तनावर लेख ) – सु. श्री. पांढरीपांडे
३. अग्रलेख – गोविंद तळवलकर
४. जन्मदा – खंड ४ था – संपादित
५. अक्षर दिवाळी ८० – ( दिवाळी अंकातील निवडक साहित्य ) संपादित

1. **Deadline In Jakarta** – ( Thriller ) – In Stewart
2. **Whip Hand** – ( Racing Thriller ) – Dick Francis
3. **Incredible Japanese** – ( Management ) – M. K. Rustomji & S. A. Sapre
4. **Daddyji** – ( Biography ) – Ved Mehta
5. **Life Ahead** – J. Krishnamurti

* " As a general rule the most sucessful man in life is the man who has the best information. " — Benjamin Disraeli.
When you join ' Phoenix ', you get plenty of infomation !

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# पॅलेस्टिनींचा प्रश्न

## लेबाननमधील संघर्षाचे मूळ

वा. दा. रानडे

लेबाननमधील पॅलेस्टिनींच्या तळावर इस्राइली विमानांनी गेल्या आठवड्यात जोरदार हल्ले चढविले. लेबाननला या हल्ल्याचा मारा अनेकदा सहन करावा लागला आहे. त्या देशाला यामुळे गेल्या काही वर्षांत स्थैर्य व शांतताच लाभलेली नाही. हा प्रश्न अरब–इस्राइल–संघर्षाशीच निगडित आहे. तो संघर्ष मिटल्याशिवाय लेबाननला शांतता लाभणार नाही. पॅलेस्टाइनच्या फाळणीमुळे निर्वासित झालेल्या पॅलेस्टिनींना स्वतःचे राष्ट्र मिळत नाही तोपर्यंत त्यांच्या गनिमी हालचाली, दहशती हल्ले चालूच राहणार आणि लेबाननमध्ये त्यांचे तळ असल्याने ते नष्ट करण्यासाठी इस्राइलही मधूनमधून जोरदार हल्ले करीत राहणार !

लेबाननमध्ये १९७५ साली यादवीयुद्ध झाले. त्यातून हे राष्ट्र टिकते की त्याची फाळणी होते अशी शंका वाटू लागली होती. प्रत्यक्षात फाळणी झालेली नसली तर दोन भाग स्पष्ट जाणवतात. एक ख्रिश्चन वस्तीचा भाग आणि दुसरा अरब वस्तीचा भाग. ख्रिश्चन वस्तीचा भाग पूर्व बेरूटपासून बिब्लॉसपर्यंत किंवा त्यापलीकडेही थोडासा आहे. हे ख्रिश्चन पॅलेस्टिनीविरोधी आहेत, तर दुसऱ्या भागात पॅलेस्टिनी अरब आहेत. हे पॅलेस्टिनी स्वतःला अरबांपेक्षाही अधिक स्वतंत्र समजतात. लेबाननवरील सीरियाच्या प्रभावासही त्यांचा विरोध आहे. पॅलेस्टिनींची स्वतंत्र राज्याची मागणी मान्य केल्यानेच त्यांचा प्रश्न सुटेल असे त्यांना वाटते.

लेबाननची 'एकसंधता टिकविण्यासाठी ही दोन्ही टोके टाळून मधला मार्ग अध्यक्ष एलिअस सर्किस यांच्या सरकारने स्वीकारला आहे; पण त्यांच्या सरकारचा दुबळेपणा आणि अधिकाऱ्यांमध्ये असलेले मतभेद यामुळे मधला मार्ग अनुसरण्यात त्यांना अडचणी येत आहेत. काही वेळा स्वतः अध्यक्ष आणि माहितीखाते यांचे संबंध अगदी तुटण्याचे सीमेपर्यंत ताणले जातात आणि मग सरकारला एखाद्या प्रश्नावर निश्चित काय म्हणायचे आहे तेच कळत नाही. माहितीखात्याच्या पत्रकातून एक भूमिका मांडलेली असते तर रेडिओ आणि टी. व्ही. वर निराळाच प्रचार होत असतो. त्यात मंत्र्यांना, अध्यक्षांना मारेकऱ्यांच्या हल्ल्याची भीती असल्याने सरकार चालविणे जवळजवळ अशक्य झालेले आहे. सरकार जागेवर आहे की नाही, त्यांचा अंमल चालत आहे की नाही अशीच शंका काही वेळा येऊ लागते. त्यामुळे देश सध्या निरनिराळ्या गटांच्या खासगी लष्करी संघटनांच्या संघर्षात सापडला आहे. पूर्व बेरूट मॅरोनाइट ख्रिश्चनांच्या कलांजिस्ट या लष्करी संघटनेच्या नियंत्रणाखाली आहे. बशीर गेमायेळ या संघटनेचे नेते आहेत. रस्ते स्वच्छ ठेवणे, बसेस चालविणे, सहकारी संस्था चालविणे या गोष्टी कलांजिस्ट संघटनेचेच लोक करतात. इस्राइली ज्यूंच्या संघटनेच्याच धर्तीवर त्यांनी आपली संघटना उभारली आहे; पण त्यांच्यातही दोन तट पडले आहेत. एक कलांजिस्ट संघटनेचे संस्थापक पिएरे गेमायेल यांच्या अनुयायांचा गट, तर दुसरा त्यांचे बंधू बशीर गेमायेल यांच्या नेतृत्वाखालील गट. हा गट इस्राइल-धार्जिणा असून, त्यांचे इस्राइलशी संबंधही आहेत; पण या धोरणास वाढता विरोध दिसून येऊ लागताच कलांजिस्टांचे इस्राइलशी असलेले संबंध तोडण्याचे आश्वासन बशीर यांनी दिले आहे; पण ते प्रत्यक्षात कितपत पाळले जाईल याबद्दल शंका व्यक्त केली जात आहे.

पश्चिम बेरूतमधील परिस्थिती यापेक्षाही अस्पष्ट आहे. सुन्नी मुस्लिमांच्या उदारमतवादी प्रवृत्तीच्या प्रभावामुळे तेथे विविध राजकीय धार्मिक गटांना आपल्या निमलष्करी संघटना उभारण्यास मोकळीक मिळालेली आहे. वालीद जम्बार यांच्या नेतृत्वाखालील ड्रूस समाजवादी, अमाल गटाचे शिया पुनरुज्जीवनवादी, याशिवाय अनेक सुन्नी गट यांच्या अशा या संघटना आहेत. पॅलेस्टाइन मुक्ति संघटनेच्या नेतृत्वाखाली अनेक पॅलेस्टिनी गट एकत्र आले असले तरी त्यांच्यातही संघर्ष आहेतच.

सबंध लेबानन आपल्या नियंत्रणाखाली आणता आला तर कलांजिस्ट संघटनेचे नेते बशीर गेमायेळ यांना ते हवेच आहे; पण पॅलेस्टिनी नेते हे कसे मान्य करतील ? तडजोड म्हणून ख्रिश्चन वस्ती असलेला भाग तरी आपल्या पूर्ण नियंत्रणाखाली हवा हा पर्याय स्वीकारायला ते तयार होतील. पॅलेस्टिनी नेत्यांनाही देशाची फाळणी नको आहे; पण कलांजिस्ट मागतात ती किंमत देण्याचीही त्यांची तयारी नाही. लेबाननचे संघराज्य बनवावे या सूचनेचाही राजकीय नेते विचार करीत आहेत.

लेबाननचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघटना काहीही करू शकलेली नाही. या प्रश्नाच्या बाबतीत तिची निष्क्रियता व असमर्थता दिसून आलेली आहे. इस्राइलने हल्ले केल्यावर सुरक्षासमितीकडे तक्रार केली जाते. तात्पुरते युद्धतहकुबी-करार होतात; पण काही दिवसांतच ते पुन्हा मोडले जातात. अमेरिका मध्यस्थीचे प्रयत्न करीत आहे; पण तिला कितपत यश येईल याची शंका वाटते. कारण पॅलेस्टिनी अरबांचा अमेरिकेवर विश्वास नाही. अरब–इस्राइल संघर्षात अमेरिकेने नेहमी इस्राइलची बाजू घेतलेली आहे. पॅलेस्टाइन मुक्ति संघटनेला पॅलेस्टिनी अरबांची प्रातिनिधिक संघटना म्हणून युनोनेही मान्यता दिली; पण अमेरिका तसे मानायला तयार नाही. इस्राइलने तर पॅलेस्टिनी मुक्ति संघटनेशी बोलणी करण्याचेच नाकारले आहे. इजिप्तचे अध्यक्ष सादत व इस्राइलचे पंतप्रधान बेगिन यांच्यात बोलणी झाली; पण इस्राइलच्या ताठर भूमिकेमुळेच पॅलेस्टिनींच्या प्रश्नावर कोणतीही टिकाऊ तडजोड होऊ शकलेली नाही. हा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत अलिप्त राष्ट्र–संघटनेच्याही मर्यादा दिसून आल्या आहेत. खुद्द अरब राष्ट्रांमध्ये अंतर्गत संघर्ष आहेत. त्यामुळे इस्राइलविरुद्ध एकजुटीची आघाडी ते उभी करू शकलेले नाहीत. ही सर्व परिस्थिती लक्षात घेता, पॅलेस्टिनींचा प्रश्न व त्यातूनच निर्माण झालेला लेबाननचा प्रश्न लौकर सुटण्याची शक्यता दिसत नाही. □

## उत्तरमीमांसा : १५ :

स. शि. भावे

# बोली अरूपाचे रूप :

## पुल–सुनीताबाई आणि मर्ढेकर

'कविता हा आमचा विरंगुळा आहे. ती आमची गरज आहे. तुमचंही तसंच असणार. म्हणूनच तुम्ही सगळी मंडळी इथे आला आहात.'

एवढ्या प्रास्तविकासह 'अवधान देणारे' म्हणून 'आम्ही'नी मर्ढेकरी कवितेचे वाचन सुरू केले. हे 'आम्ही' म्हणजे सुनीताबाई देशपांडे आणि 'पुल' देशपांडे. अगदी 'वागर्थाविव संपृक्तौ' असे 'आम्ही'.

'कवितेचे वाचन' असे म्हटले. त्यातला 'वाचन' हा शब्द जसाच्या तसा चालणार नाही. उभयतांच्या कविता पाठ होत्या. (सुनीताबाईंचे पाठांतर उजवे होते. त्या बसल्या होत्या त्याही पुलंच्या उजवीकडे. खरे तर त्या डाव्या अंगाला हव्या होत्या. वामांगी रखुमाई हवी !) कविता म्हटल्या, किंवा कवितांचे 'पठण' केले, असे म्हणावे का ?

नाही. 'वाचन', 'पठण', 'गायन' असे शब्द अपुरे पडतात. उभयता मर्ढेकरी कविता भोगत होते, जगत होते. समोर बसलेल्याना ती कविता भोगण्यासाठी आपल्या परीने जिवंत करून देत होते. उभयता मर्ढेकरी कविता आमच्यात वाटीत होते.

¤

कार्यक्रमाविषयीची उत्सुकता आधीपासून जागी झालेली होती. थिएटर ॲकॅडमीचे निमंत्रण आले त्या वेळी उत्सुकतेला काळाचा पैलू मिळाला आणि उत्सुकतेची उत्कंठा झाली. तशी, मुंबईला हा कार्यक्रम होणार –कार्यक्रम झाला–असे ऐकू येत होते तेव्हापासून मनात उत्सुकता जागी झाली होती. मागे पुलंनी केशवसुताची कविता वाचली होती त्या वाचनासारखाच हा कार्यक्रम असेल का ? असेल ना ? असा उत्सुकतेचा खेळ मनात आधीच सुरू होता. आता जसे 'ॲपल' उपग्रहाला खास 'धक्के' देऊन इष्ट १२० ( पूर्व ) रेखांशावर आणले आहे तसा थिएटर ॲकॅडमीच्या निमंत्रणाने मनातल्या उत्सुकतेला धक्का दिला आणि मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या सभागृहात रविवार १२ जुलै ८१ रोजी रात्री ९॥ वाजता स्थिर होण्याच्या दिशेने उत्सुकतेचा– उत्कंठेचा–प्रवास सुरू झाला.

किती जणासाठी कार्यक्रम आहे ? कोणकोणाला बोलावले आहे ? सभागृहात तर दीडशेच मावतात. मग कळले की, सायंकाळी सात वाजता पहिला आणि साडेनऊ वाजता दुसरा, असे दोन कार्यक्रम लागोपाठ आहेत, म्हणजे तीनशेंची सोय झाली. उरलेल्या उत्सुकितांचे काय ?

'टीए'च्या एका कार्यकर्त्याला विचारलेही. तो घाईघाईत म्हणाला, 'हे पहा. खरं म्हणजे साहित्य संस्थांनी असा कार्यक्रम करायला हवा होता. आता आम्ही करणार ते आमच्या मर्यादेत आणि आमच्या मंडळीसाठी करणार ! इतरांना इतकीच उत्सुकता असेल तर त्यांनी स्वतःसाठी करावा !' बोलणे रास्त होते. माझी उत्सुकता तितक्यापुरती गप्प झाली.

पण उत्सुकतेच्या आणखी शलाका मनात घुसत राहिल्याच.

कोणत्या कविता असतील ? क्रम कसा असेल ? मुंबईस एक कविता गाऊन दाखविली होती म्हणे. गाताना इथे साथ असेल का ? निदान सूर असेल का ?

मर्ढेकरांची कविता मूलतः अप्रगट. ती मंचावर प्रगट होऊ शकेल का ? तेथून श्रोत्यांपर्यंत पोचू शकेल का ? प्रगट होण्याचे कष्ट या कवितेला सोसतील का ?

मर्ढेकर स्वतः आपली कविता कसे प्रगट करीत असत ? तशीच ती आता प्रगट होईल का ?

मर्ढेकरांना दिवंगत होऊन यंदा पंचवीस वर्षे झाली. त्याआधी दहा पंधरा वर्षे त्यांची कविता लिहिली जात होती. आज ऐकताना ती कविता ताजीतव्जी वाटेल का ? की हा सारा स्मरणरमणीयतेचा (nostalgia चा) खेळ होईल ?

बरोबर साडेनऊला उभयता 'आम्ही' मंचावर येऊन बसले. त्या वेळी उत्सुकता फोफावत शिगेला पोचली होती. नंतरच्या सव्वा तासात ही उत्सुकता अनेक अंगांनी तृप्त होत राहिली.

¤

पहिली तृप्ती मिळाली ती या उभयतांच्या निर्दोष 'परफॉर्मन्स' ने. 'प्रयोग' यशस्वी करण्यात ही उभयता प्रवीण आणि अनुभवी आहेत. इथे त्या दोघांना एकत्र पाहिल्यावर मन जे मागे गेले ते एकदम 'वंदे मातरम्'च्या काळात आणि नतर 'सुन्दर मी होणार'च्या वातावरणात. ध्येयवादाने भारलेला नवयुवक आणि त्याच्या ध्येयवादासह त्याच्यावर प्रेम करणारी देशभक्त युवती. निःस्पृह, क्रांतिकारक निष्ठा असणारा कवी संजय आणि त्याच्या ध्येयवादी, आदर्शवादी व्यक्तित्वाने आणि कवित्वाने मनोमन घायाळ होऊन फुलणारी दिदीराजे–तोच काव्यवेडा युवक आणि तीच काव्यवेडी युवती आजही मंचावर बसली होती, तीच पहिली तरल थरथर घेऊन आणि तोच पहिला भावदाट उमाळा उरात साठवून.

बघता बघता एखाद्या भूमिकेत शिरून एकरूप होणे पुलंना किती सहज जमते असे आपण म्हणतो खरे. पण त्यामागे केवढी तपस्या असते, अखंड चिंतन असते, 'ट्रायल ॲण्ड एरर' पद्धतीने सतत परिपूर्णतेचा ध्यास घेतलेले नियोजन असते, याची जाणीव, प्रयोग अनुभवल्यानंतरच्या विचारातच जागी होते.

आजच्या मंच-अस्तित्वाला चौकट नव्हती, फक्त वातावरण होते. श्रोत्यांच्या उजवीकडे मर्ढेकरांचे मोठे केलेले छायाचित्र होते. डावीकडे 'मर्ढेकरांची कविता' या 'मौज' पुस्तकाच्या ताज्या आवृत्तीचे 'क्लोजअप' मुख-

पृष्ठ होते. अमर्याद दिशा सूचित करणारे हे दोन बिंदूच फक्त वर होते. या दोन बिंदूचे काल्पनिक त्रिकोणात्मक नाते, नजर खाली आली की, पुल आणि सुनीताबाई यांच्याशी पूर्ण होत होते.

प्रकाश : दोघांना पूर्ण उजळील एवढा, यथायोग्य.

पुल जरा सैल बसलेले. सुनीताबाई एकदम ताठ ! कवितेे-कवितेप्रमाणे ऊर्ध्वांगाची हालचाल पुलंची सावकाश, गोलाकार, सुनीताबाईंची चपळ, धारदार.

मुद्रा दोघांच्याही मुळात प्रसन्न, बदलत्या भावनांचे रस पुलंच्या मुद्रेवर ऐस–पैस मधूनच झळकून पळून जाणाऱ्या त्या 'खास' ओषाळेपणासह. हेच रंग सुनीताबाईंच्या मुद्रेवर विद्ध करणाऱ्या तीव्रतेसह.

'दंवात आलिस भल्या पहाटे' मधला नाजूकपणा व्यक्त करताना सुनीताबाईंनी लहान मुलीची कोवळीक दाखविली. 'आला आषाढ श्रावण, आल्या पावसाच्या सरी, किती चातक चोचीने, प्यावा वर्षाऋतू तरी ' यातील जख्मी करणारी उत्कटता त्यांच्या तेजाने चमकत्या डोळ्यांत, 'गाऱ्यागाऱ्या भिंगोऱ्या' खेळणाऱ्या तेरा–चौदा वर्षांच्या मुलीचे उसळते कुमारपण घेऊन, उतरली होती.

या दुःखाच्या कढईचीं गा
अशीच देवा घडण असू दे

यातला, श्रद्धेने भिजलेला अगतिक कडवटपणा त्यांच्या पिळवटलेल्या नजरेतून थेट सुटून ऐकणाऱ्याच्या मनात घुसत होता !

'या गंगेमधि गगन वितळले' मधील उदात्त भाव सुनीताबाईंच्या नजरेत आणि सोन्याच्या बारीक तारेसारख्या धारदार आवाजात तेजस्वी झाला होता.

प्रत्येक कलावंताची एक स्थायी वृत्ती असते. त्या वृत्तीच्या आधाराने इतर अनेक भाव प्रकट होतात. सुनीताबाईंची धारदार तेजस्वीपणाची स्थायी वृत्ती आज काव्य दर्शनात जाणवत होती. बाकीचे भावरंग या स्थायी रंगात रंगून व्यक्त होत होते.

मात्र, समाधानाची गोष्ट अशी की यालाही अपवाद होते. एक महत्त्वाचा अपवाद म्हणजे 'फलाटदादा' ही कविता म्हणताना कधी खेळकर, कधी विव्हळ, कधी मिस्किल, कधी चिंतनशील–असे बदलताना सुनीताबाई पुरत्या मोकळ्या (डिफेन्सलेस, व्हल्नरेबल) झाल्या होत्या. बाल्य व यौवन यांच्या सीमा रेषेवरील निरागसता या कवितेच्या वेळी होती. एरवी त्या कवितेला जिंकत होत्या. या वेळी या कवितेने त्यांना जिंकले होते.

चिंतनशील समजूतदारपणा हा पुलंच्या वाचनाचा स्थायी रंग होता. त्याला प्रौढ कारुण्याची मोहक छटा होती. आणि ढाल्या सुरेल आवाजाचा भरदार आधार होता. मर्ढेकरांच्या कवितांतील उपरोध, थट्टा, मिस्किलपणा यांच्या छटा अधूनमधून झळकत होत्या. पण त्यांना मूळ, पायाभूत रंग होता तो समंजस कारुण्याचा.

मर्ढेकरांच्या ' नतद्रष्ट' अभंगातील आर्तता त्यांनी अलगद पेश केली. त्या अभंगांतला काही वेळा येणारा आक्रस्ताळा, आत्मविनाशक वैताग पुलंनी वाचनात 'मूक आकान्त' म्हणून उभा केला. ' जिथे मारते कांदेवाडी टांग जराशी ठाकुरद्वारा' या ओळीलाही त्यांनी थिल्लरपणाचा स्पर्श होऊ दिला नाही.

' मी एक मुंगी' ही कविता गायनात पुढे पुढे कव्वालीच्या ढंगावर गेली; पण तिची सुरुवात पुलंनी एकनाथी भारुडासारखी केली होती. मराठीतील हे आधुनिक भारुडच आहे आणि ते भारुडाच्या ढंगाने यावे हेच योग्य; पण गाताना भारुड कवालीत जाऊ शकते. तसे ते जाऊ लागले आहे असे दिसल्यावर पुलंनी ताबडतोब ते परत भारुडात आणले. म्हणजे पुल ही कविता कवाली म्हणून मुळीच गात नव्हते. उपरोधाच्या ओळी, भारुड परिचित नसल्याने कवालीसारख्या वाटत होत्या. मात्र, कडक आसूड ओढणाऱ्या ओळी भारुडाच्या म्हणून जाणवत होत्या.

उभयताचे स्थायी रंग असे वेगळे–वेगळे होते; पण ते एकमेकांना पूरक होत होते. सुनीताबाईंचा तेजस्वी रंग पुलंच्या समंजस हुंकाराने किंवा स्नेहाळ नजरेच्या शाबासकीने किंवा ' म्हण, तूच म्हण' असे मायेने सुचविणाऱ्या आग्रहाने मधुरमवाळ होत होता. पुलंचे समंजस कारुण्य सुनीताबाईंच्या तेजस्वी उत्कट प्रेरकतेने झळाळत होते.

वाचनप्रयोगातील अनेक पैलुंनी रमणीय झालेली ही कलात्मकता मनाला तृप्त करीत होती. तिच्यापाठीमागील तयारी, कष्ट, आखीव नियोजन नंतर विचारात कळत होते. पण प्रत्यक्ष प्रयोगात मात्र ते वेगळे जाणवत नव्हते.

कवितावाचनाच्या आपापल्या भूमिकांशी उभयता एकजीव झाली होती. विशेष म्हणजे यावेळी ती दोघे कविताछांदिष्टांच्या आपल्या वास्तवातल्या भूमिकाच मंचावर सादर करीत होती.

दुसरी तृप्ती जाणवली ती मर्ढेकरांच्या कवितेची प्रकट रूपे इतकी देखणी ठरली याचा सुखद अनुभव येऊन!

¤

'अभिरुचि', 'सत्यकथा' यात प्रसिद्ध होत होत्या तेव्हापासून मर्ढेकरी कविता वाचल्या होत्या. नंतरही आवडीने आणि निमित्ताने त्या सतत वाचनात होत्या. सुमारे बारा-तेरा वर्षांपूर्वी आम्ही बारा-तेरा जणांनी दोन-तीन वर्षे 'पोएट्री क्लब' चालवला होता. तेव्हा सामुदायिक अभ्यासासाठी मर्ढेकरांची कविता प्रथम निवडली होती.

कै. दि. के. बेडेकर, प्रभाकर पाध्ये,अशोक केळकर असे खंदे लोक आमच्या पोएट्री क्लबमधे होते. दर बैठकीत तीन अथवा चार कवितांचा अभ्यास दोनदोन तास चालत असे. या अभ्यासात असे आढळले होते की मर्ढेकर हा कवी विविधरूपी आहे. त्याच्या कवितांचे साचे भिन्न भिन्न आणि अनेक आहेत. शब्दांच्या ' प्रसरणशीलते'चा आणि संस्कृत-इंग्रजी–मराठी व क्वचित हिंदी अशा दोन-दोन,चार-चार भाषांचा वेगळा आणि एकत्र लवचिक उपयोग हा कवी विलक्षण हुकमतीने करतो. हे असे सारे कळायला आम्हाला दहा-बारा बैठकी तरी द्याव्या लागल्या होत्या.

यमक, अनुप्रास, लयीचे नवेनवे प्रयोग, शब्दाच्या सांस्कृतिक अंत.संगीताची सूक्ष्म व प्रगल्भ जाण अशा गुणांनी मनात झळकणारी ही कविता प्रगट रूपात विदग्धासाठी तशीच झळकेल असा विश्वास वाटत असे. आज पुल-सुनीताबाईंनी तो खरा केला.

या दंपतीच्या वाचनात मर्ढेकरी कवितेचे सर्व पैलू एकसमयी व एकत्रितपणे जाणवत होते. पंचेंद्रियगोचर होऊन प्रकट झाल्याने ऐकता-ऐकता ते ' तत्क्षणी ' जाणवत होते, एकजीव होऊन जाणवत होते.

शब्दाचे वजन, नाद, हेल, स्वरांप्रमाणे एका शब्दाला दुसऱ्या शब्दाची असणारी आस, ध्रुवपद असेल तर त्याचा ठेका अशी

बोलणाऱ्या भाषेची सारी रूपे या वाचनात एकवटून सर्व गुणसमृद्ध असा श्राव्य काव्यानुभव जिवंत करीत होती.

'पोरसवदा होतीस, कालपरवा पावेतो' या अक्षरछंदात, 'काल' मधील 'का' वर पुलंनी छोटासा न्यास अशा नजाकतीने घेतला की 'परवा' या उत्तरार्धाला त्याची आस बरोबर पोचली किंवा 'फुटेल (होती वेडी आशा)' या कवितेत

'दो मिनिटांची सडी शांतता
शहारली अन् भिटली लब्ध —
प्रतिष्ठितांवर.'

येथे 'लब्ध' शी होणारा दिखाऊ यतिभंग वरच्या 'सुतकी शब्द' या अंताशी 'शाब्दिक आणि 'आर्थिक' यमक साधून, खालच्या प्रतिष्ठितांना भारदस्त कोपरखळी देतो.हा अनेकांगी परिणाम सुनीताबाईंच्या 'न्यास व मीड' या जोडतंत्राने एकदम साधला. या विविधरंगी विभ्रमात 'इरेस पडलो जर बच्चंजी', आणि 'पोपटपंची चतुरकि जान' ही भिकाऱ्याच्या माळेच्या गाण्यावर लिहिलेली कविता, याचा समावेश हवा होता असेही वाटले. असे वेगवेगळे अनेकाना वाटत असणार !

¤

मर्ढेकरांच्या कवितेचे हे असंख्य रचनाविभ्रम कानांनी व पूर्ण अवधानाने अनुभवीत असताना मर्ढेकरी कवितेला लावली गेलेली अनेक लेबले कशी आग्रही व पोकळ आहेत हे सहजीच लक्षात येत होते.

'जंतुवादी' हे लेबल अलगद गळून पडले, 'थांब उद्याचे माऊली। तीर्थ पायाचे घेईतो', किंवा 'पानात जी निजली इथे, इवली सुकोमल पाखरे, जातील सांग अता कुठे ?' या ओळींचा भावघन कवी जंतुवादी कसा असेल ?

'मोलाची पण मलूल भक्ती, जशि कुंतीच्या लिहिली भाळी' या ओळीने 'बीभत्स गारठ्या'ची तक्रार लटकी वाटू लागली. सह नौ टरवतु। सहवीर्यं डरवावहै। ही ओळ किंवा 'पिपात मेले ओल्या उंदिर' ही सर्व कविता याच्या वाचनात या ओळींतील घेरणारे कारुण्य प्रकट झाले, संकुचित मनातील बीभत्सता नव्हे.

हीच नव्हे तर सारीच लेबले ऐकताना गळून पडली होती. एक स्नेही नंतर म्हणाले, "मला आजच प्रथम जाणवलं की मर्ढेकर हे 'भाष्यकवी'च नाहीत, तर मोठे 'भावकवी' आहेत."

विषय, दृष्टिकोण, प्रतिगामिता, पुरोगामिता, क्रांतिकारकत्व—इत्यादी नेहमीच्या गटवारीची, आज या कविता ऐकून अनुभवताना, गरज तर भासत नव्हतीच; पण आठवणही होत नव्हती.

¤

आणखी एक क्वचित् येणारा अनुभव येत होता. मर्ढेकरांच्या कविता अनुभवता—अनुभवता, मनाच्या दुसऱ्या पातळीवर, मर्ढेकरांची कविता अनुभवाला येत होती. 'केशवसुतांची कविता', 'बालकवीची कविता' या दोन ठिकाणी जसे एकवचन पूर्णपणे सार्थ आहे, तसे ते मर्ढेकरांच्या कवितेबाबतही आहे, असे आपोआप जाणवत होते.

'शिशिरर्तुच्या पुनरागमे' उगाच रडायला येणारा आणि 'किती चातकचोचीने प्यावा वर्षाऋतु तरी' असे म्हणून नाचणारा आणि 'किती तरी दिवसात नाही पावसात गेलो' असे हळहळणारा हा साधा—सरळ—पोर—स्वभावी निरागस 'बाळ' आहे. मोठा होऊन जग पाहिल्यावर हा चिडतो, रागावतो, उदासतो, कातावतो— तोही सरळपणे आणि 'हासडल्या तुज शिव्या तरीही, तुझ्याच पायी आलो लोळत' अशी 'मोलाची पण मलूल भक्ती' देखील सरळ मनाने करतो. 'या गंगेमधि गगन वितळले' अशा निरागस मनाचा हा सज्जन कवी आहे, आस्तिक्यबुद्धीचा कवी आहे. मराठपणाचा, मराठी काव्यपरंपरेचा अभिमानी कवी आहे, कवितेवर नितांत प्रेम करणारा कवी आहे, अशी मर्ढेकरांची एकरस कविता जाणवत गेली.

मर्ढेकर आज हा 'प्रयोग' ऐकायला असते तर ? त्यांना खचित समाधान वाटले असते ! आम्ही समीक्षकांनी त्यांच्या कवितेवर जो अन्याय केला आणि प्राध्यापक म्हणून जो करीत आहोत तो या दंपतीने धुऊन काढला याने त्यांना एकदाचे हलके वाटले असते.

कविता दुसऱ्यापर्यंत पोचण्याचा एकच मार्ग. आपण अनुभवता अनुभवता ती जिवंत करायची. अनुभवासाठी ती दुसऱ्यापुढे ठेवायची.

देशपांडे दंपतीचे वाचन ऐकताना सर्वांनाच हे सत्य नव्याने व स्वानुभवाने जाणवत होते. वाचली जाणारी कविता ऐकताना, प्रत्येकाच्या मनात ज्याने त्याने वाचलेली स्वतःची कविता जिवंत होत होती आणि मर्ढेकरी कवितेचा, मर्ढेकरांची, स्वतःची व पुलंची असा, तिहेरी अनुभव एकसमयी येत होता.

पुल आणि सुनीताबाई यांच्याबद्दलची धन्यता आणि कृतज्ञता व्यक्त करावी का ? धन्यता व्यक्त करू या. कृतज्ञता मनात ठेवू या ! त्या दोघांना प्रगट कृतज्ञतेने संकोचच वाटेल.

ते म्हणतील, अरे, सुरुवातीलाच नव्हे का सांगितले, 'हा आमचा विरंगुळा आहे. ही आमची गरज आहे.'

विरंगुळाच केवळ नव्हे. हे काव्यदर्शन म्हणजे या उभयताची नव-निर्मिती होती. मर्ढेकरांच्या कवितेचे अरूप त्यांनी मनोमन उपभोगले आणि अंगच्या गुणकौशल्याने जेव्हा त्यांनी ते गोचररूपात प्रकट केले तेव्हा त्यांना या काव्य-रूप-निर्मितीमुळे केवढी धन्यता वाटली असेल !

त्यांच्या या धन्यतेला आम्ही सर्व श्रोते निमित्तमात्र झालो होतो. □

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
मूल्य : रुपये पंधरा

अवतीभवती । शरद कृष्णन

## □ विनाशाच्या काठावर उभे असलेले महानगर–मुंबई !

जोरदार शिटी देऊन गाडी बोरीबंदर स्टेशनात प्रवेश करते आणि मुंबईमध्ये जिंदगी घडवण्याची इच्छा असलेला माणसांचा आणखी एक लोंढा गाडीमधून खाली उतरतो. गाड्यामागून गाड्या येतच असतात आणि माणसांची अगदी खेचाखेच भरलेल्या या महानगरामध्ये, नोकरी–धंद्याच्या निमित्ताने येणाऱ्या मंडळींची आवक मुंबापुरीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक गाडीबरोबर वाढतच असते. वर्षानुवर्षे असे होत असल्याने शहर अक्षरश: टरटरून फुगले आहे. ज्या मुंबईमध्ये जास्तीत जास्त वीस लाख लोकांना नागरी सुविधा उपलब्ध होऊ शकतात अशा या महानगराची आजची लोकसंख्या ८२ लाखाहून अधिक आहे. केरळ हे प्रचंड लोकसंख्या असलेले राज्य ! अशा या राज्यामधील एक तृतियांश लोक जर एका शहरात कोंबले तर... तर अशा शहराला मुंबई म्हणावे लागेल ! गेल्या चाळीस वर्षांत महानगर मुंबईची वाढ अशा प्रचंड वेगाने झाली आहे की, हे असेच चालू राहिले तर देशाची आर्थिक राजधानी असलेले, संपूर्ण देशाचे छोटे प्रतिबिंब असलेले हे शहर बघता बघता विनाशाकडे खेचले जाईल ! मग प्रश्न असा येतो की, काही करता येणार नाही का ? प्रत्येक दिवसागणिक विनाशाकडे खेचल्या जात असलेल्या या शहराला वाचवता येणार नाही का ? उत्तरादाखल एवढेच सांगता येईल की, अगदी युद्धपातळीवरून प्रयत्न केले तर या शहराचा विनाश थांबवता येईल. मात्र राजकीय नेत्यांनी तशी हिंमत दाखवली पाहिजे आणि शहराची यंत्रणा ज्यांच्या हाती आहे त्या सर्वांनी आळस झटकून, झडझडून प्रयत्न केले तरच काही होऊ शकेल. मुंबानगरीची विकासाकडून विनाशाकडे अशी जी वाटचाल चालू आहे त्याची सविस्तर चर्चा करणारा, तसेच या शहराला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांचा ऊहापोह करून काही उपाय सुचवणाऱ्या लेखांनी सजलेला मुंबईबद्दलचा एक विशेष अंक 'दि इलस्ट्रेटेड विकली' या साप्ताहिकाने प्रसिद्ध केला असून, हा सुरेख माहितीपूर्ण अंक नुसता नजरेखालून घातला तर मुंबापुरीवर प्रेम करणाऱ्या कोणाही व्यक्तीचे मन अस्वस्थ झाल्यावाचून रहाणार नाही !

डॉ. रश्मी मयूर यांच्या मते, मुंबईची लोकसंख्या आहे या वेगाने वाढू लागली तर आज ८२ लाख असलेली ही लोकसंख्या या शतकाअखेर १ कोटी ६० लाखाहून जास्त झालेली असेल ! आजच मुंबईमधील लोकसंख्येच्या ४५ टक्के लोक झोपडपट्टीतून अथवा फुटपाथवर राहतात. येत्या २५ वर्षांतच हे प्रमाण ७५ टक्क्यावर जाईल. जगामधील सर्व मोठ्या शहराच्या झोपडपट्ट्या हा एक अविभाज्य भाग असल्या तरी जगामधील कोणत्याही शहरामध्ये नसेल अशी अवाढव्य झोपडपट्टी मुंबईच्या वाट्याला आली आहे. धारावीची झोपडपट्टी ही जगामधील सर्वांत मोठी झोपडपट्टी मानावी लागेल. ज्यांच्या डोक्यावर सुरक्षित छप्पर आहे आणि ज्यांना दोन वेळचे अन्न मिळू शकते अशा सुरक्षित जागी असलेल्या कोणत्याही संवेदनाक्षम माणसाला शरम वाटावी असे ओंगळ जिणे धारावीच्या झोपडपट्टीमधील असंख्य नागरिकांच्या वाट्याला आले आहे. आपण सुरक्षित जागी आहोत ही भावनाही फसवी आहे. आपल्या सुरक्षित घरनामक कॉंक्रीट पेटीतून तुम्ही रस्त्यावर उतरलात तर पुन्हा घरी सुरक्षित जाऊ शकाल याची कोणतीही शाश्वती देता येणार नाही. आपल्या खुराड्यातही तुम्ही सुरक्षित असाल असेही नाही. दर अठ्ठेचाळीस तासांमध्ये या शहरात एक खून पडतो ! दिवसाढवळ्या होणाऱ्या चोऱ्या, घरफोड्या, अंगावरील दागिने पळवण्याचे प्रकार यासारखी गुन्हेगारी इतक्या झपाट्याने वाढत आहे की, नागरिकांच्या मनामधील सुरक्षिततेची भावना लोप पावत चालली आहे. पोलीसदप्तरामध्ये नोंदलेल्या अशा स्वरूपाच्या गुन्ह्यांची संख्या प्रतिवर्षी २५ हजारांहून जास्त असते. असे असले तरी आपल्या अपुऱ्या ताफ्यासह मुंबईची पोलीसयंत्रणा उत्तम कामगिरी बजावत आहे, असा दावा मुंबईचे पोलीसकमिशनर श्री. एम. एस. कसबेकर यांनी केला आहे. जगभर ज्याची वाखाणणी होते अशी ही कार्यक्षम यंत्रणा असून या महानगरामधील नागरिकांचे जीवन सुरक्षित ठेवण्याचे काम या यंत्रणेमार्फत व्यवस्थित बजावले जात आहे,असाही त्याचा दावा असला तरी विलक्षण स्फोटक परिस्थितीला प्रतिदिनी तोंड देणाऱ्या नागरिकांना हा दावा मान्य होणे अवघड आहे. आज मुंबईमध्ये प्रत्येक ५०० माणसांमागे एक पोलीस आहे. लंडनमध्ये दर २०० माणसांमागे एक पोलीस आहे. शहरात विशेषत: उपनगरामध्ये गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढली असून पोलीस स्टेशनांची आणि पोलिसांची संख्या विलक्षण अपुरी पडते. गुन्हेगारीचे स्वरूपही बदलले आहे. लोकसंख्या रोज वाढत आहे. नोकऱ्या नसलेल्या तरुणांची संख्याही वाढत आहे. गुन्हेगारी अधिक सुसंघटित झाली असून, २० ते ३० या वयोगटामधील असंख्य तरुण आज गुन्हेगारी जगामध्ये वावरत आहेत. गुन्हेगारीचे काही प्रकार तर अगदी राजरोस चालू असतात. मटका, जुगार, चोरटी दारू, बेकायदेशीर वेश्याव्यवसाय, चोरट्या मार्गाने आलेल्या परदेशी मालाची विक्री, चरस, भांग यासारख्या मादक वस्तूंची सरसहा होत असलेली विक्री, या गोष्टी नागरिकांच्या डोळ्यासमोर आणि पोलीसखात्याला माहीत असूनही सरसहा घडत आहेत. कित्येक गाजलेल्या मोठ्या गुन्ह्याचाही तपास लागू शकलेला नाही. गिरगावासारख्या गजबजलेल्या भागात पेठ्यांचे दुकान फोडले गेले लक्षावधी रुपयाचा माल चोरला गेला. हुमायून अब्दुलअली नावाचे गृहस्थ आपल्या पत्नीसह बोरिवलीच्या नॅशनल पार्कमध्ये गेले असता, दिवसाढवळ्या त्यांच्या पत्नीवर हल्ला केला गेला व ते मदतीला आले असता त्यांच्यावर खुनी हल्ला झाला; हे असे प्रकार सरसहा होत आहेत. स्वत: मुख्यमंत्र्यांनी या गुन्हेगारी जगाचा फेरफटका केला. या साऱ्या गोष्टी इतक्या उघडपणे चालाव्यात याबाबत आश्चर्य व्यक्त केले. माजी पोलीसप्रमुख इ. एस. मोडक

म्हणतात, मुंबईमधील गुन्हेगारी केवळ वाढली आहे असे नव्हे तर एक प्रकारच्या आत्मविश्वासाने गुन्हेगार नवीन गुन्हे करत आहेत. गुन्हेगारांमधील क्रौर्यही विलक्षण वाढले आहे. या गुन्हेगारांनी केलेले गुन्हे पाहिल्यावर यांना स्वतःच्या अथवा इतरांच्या जिवाची पर्वा नाही हे सहज लक्षात येते. गुन्हेगारीविरुद्ध आणि गुन्हेगारांविरुद्ध लगोलग हालचाल करणाऱ्या पोलीसअधिकाऱ्यांना कित्येक वेळा राजकीय दबावाला तोंड द्यावे लागते आणि मग फार खोलात जाणे नको, असे पोलीसअधिकाऱ्यांना वाटू लागते. मुंबईमधील पोलीसयंत्रणा कार्यक्षम असली तरी वाढत्या गुन्हेगारीला ती समर्थपणे तोंड देत आहे असा विश्वास लोकांना वाटत नाही. शहरी जीवनाला जो बकालपणा आला आहे त्यामुळे गुन्हे करण्यास प्रवृत्त होणारांची संख्या प्रतिदिनी वाढत आहे. त्याला तोंड देण्यासाठी पोलिसांजवळ संख्यात्मक बळ नाही आणि सुयोग्य सुविधाही नाहीत. त्यामुळे आहे तेवढ्या ताकदीनिशी, होईल तेवढे काम करणे एवढेच या खात्याच्या हातात आहे.

## मुंबईचा कापडव्यवसाय व अन्य उद्योग

मुंबई हे देशामधील सगळ्यात मोठे औद्योगिक केंद्र आहे. आर्थिक उलाढाल एवढी प्रचंड आहे की, शासनाला कररूपाने सगळ्यात जास्त रक्कम याच मुंबापुरीमधून मिळते. १९८०-८१ मध्ये मुंबईमधून ९०० कोटी रुपयांचा आयकर जमा झाला आहे. मुंबई महानगरपालिकेचे ८१-८२ वर्षाचे उत्पन्न २६३·८६ कोटी रुपये आहे. तुलना करायची तर असे म्हणता येईल की, एखाद्या हिमाचल प्रदेशासारख्या छोट्या राज्यापेक्षा मुंबई महानगरपालिकेचे उत्पन्न जास्त आहे. मुंबईमधील झोपडपट्ट्या आणि फूटपाथवर राहणाऱ्या लोकांची संख्या लक्षात घेतली तरी मुंबईमधील फूटपाथवर राहणारा माणूसही पैसा कमावणारा असल्यामुळे, दरडोई वार्षिक उत्पन्न एक हजार आठशे रुपयांच्या घरात आहे. देशामधील कोणत्याही भागापेक्षा हे उत्पन्न जास्त आहे. मुंबईमध्ये ज्याला मोठी अथवा मध्यम स्वरूपाची म्हणता येईल अशी ७९८ औद्योगिक केंद्रे असून नोंदलेल्या छोट्या उद्योगधंद्यांची संख्या १४,५३१ आहे. न नोंदले गेलेले छोटे उद्योगधंदे सुमारे या संख्येच्या दहा पट असावेत असा एक अंदाज आहे. अर्थात या उद्योगधंद्यापासून मिळणारे उत्पन्नही नोंदले जात नाही. शहरामधील उद्योगधंद्याला जो कच्चा माल लागतो, तसेच नागरी गरजासाठी जो माल येतो त्याची आवक एवढी प्रचंड आहे की, रोज सहा हजार ट्रक्स आणि ९०० रेल्वे वॅगन्स माल आणून टाकत असतात. कापडउद्योग हा या शहरामधील एक सगळ्यात मोठा व्यवसाय. मुंबईमधील ५४ कापडगिरण्यांमधून देशामधील एकूण उत्पादनाच्या ३० टक्के कापड तयार होते. या गिरण्यांमधून ११४१,८७९ व्यक्तींना रोजगार उपलब्ध झाला आहे. मुंबईमध्ये तयार होणाऱ्या आणि मुंबईमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या मालावर घाऊक विक्रेत्यांचे नियंत्रण आहे. निरनिराळ्या विभागांमधील ८,००० घाऊक विक्रेते हा माल किरकोळ व्यापाऱ्यामार्फत ग्राहकांपर्यंत पोचवत आहेत. शहरविकासाचे नियोजन करणाऱ्या मंडळींनी व्यापारउदीमाचा व्यवहार उपनगरामध्ये नेण्याचे अनेक प्रयत्न केले खरे; परंतु त्याला यश येऊ शकले नाही. कारण उपनगरामधील जागा घेतल्या तरी व्यापारी शहरी भागामधील जागा सोडत नाहीत असा अनुभव त्यांना आला आहे.

फेब्रुवारी १८५४ मध्ये मुंबईमधील पहिली कापडगिरणी अस्तित्वात आली आणि हवेमधील आर्द्रता हा आवश्यक भाग असल्याने तसेच वाहतूक, कामगारांची उपलब्धता यासारख्या गोष्टीमुळे हा व्यवसाय झपाट्याने वाढीस लागला. आज असे बोलले जाते की, मुंबई जर खरोखरच विनाशापासून वाचवायची असेल तर हा कापडव्यवसाय प्रथम हलवला पाहिजे. मुंबईमधील कापडगिरण्या बाहेर हलवल्या गेल्या तर शहराचे प्रश्न सुटण्यास हातभार तर लागेलच, पण त्याखेरीज व्यावसायिकांनाही हा बदल लाभदायक ठरेल. मुंबईबाहेर पाणी स्वस्त आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे अन्यत्र स्वस्त दराने जागा उपलब्ध होऊ शकतात. वीजही स्वस्त दराने उपलब्ध होऊ शकते. समजा, योजना आखून येत्या ६ वर्षांत जर येथील कापडव्यवसाय बाहेर हलवला गेला तर लोकसंख्याही थोडीफार कमी होईल. खेरीज जी जागा उपलब्ध होईल, तिचा निवासी इमारतींसाठी, तसेच बागांसाठी व वृक्षारोपणासाठी उपयोग करून घेता येईल. आज मुंबई म्हणजे कॉंक्रीटचे जंगल झाले आहे. हे जंगल झपाट्याने कोरडे पडत चालले असल्याने जागा उपलब्ध करून घेऊन वृक्षारोपण केले जाणे आवश्यक आहे.

कापडउद्योगाखेरीज इंजिनिअरिंग व केमिकल्स हे इथले अन्य महत्त्वाचे उद्योगधंदे आहेत. देशाच्या एकूण इंजिनिअरिंग उत्पादनापैकी ६० ते ७० टक्के उत्पादन एकट्या मुंबईत होते. सीमेन्स, गोदरेज, क्रॉम्पटन, मुकुंद, लार्सन्स अशी किती तरी अवाढव्य युनिटस या व्यवसायात मुंबईमध्ये आपले पाय घट्ट रोवून आहेत. केमिकल्स व्यवसायामधील उत्पादन प्रामुख्याने कापड-उत्पादनाला पूरक ठरत गेल्याने या व्यवसायाचीही इथे झपाट्याने वृद्धी झाली. देशातील एकूण उत्पादनाच्या ४० ते ४५ टक्के उत्पादन मुंबईमधील केमिकल्स व्यवसायामार्फत केले जाते.

महाराष्ट्र शासनाने मुंबईबाहेर उद्योग सुरू करणाऱ्यांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या असल्या तरी उद्योगाशी संकल्पित असलेल्यांचा पाय मुंबईबाहेर निघत नाही!

## शैक्षणिक सुविधा व वाहतूक

आपल्या मुलांना शाळेत आणि महाविद्यालयात प्रवेश मिळतो की नाही याबाबत मुंबईकरांच्या मनात कायम भीती असते. या वर्षी ज्यांना शाळांतून आणि महाविद्यालयातून प्रवेश मिळू शकलेला नाही अशांची संख्या पन्नास हजारांच्या घरात आहे. शासन आपल्या परीने प्रयत्नशील असले तरी अखेर शाळा—कॉलेजांची संख्या मर्यादित असल्याने काहीही इलाज चालू शकला नाही. त्यात इच्छुकांना विशिष्ट शाळेमध्ये अथवा महाविद्यालयात प्रवेश हवा असतो. त्यामुळे अशा नाव असलेल्या संस्थेमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी एक झुंबड उडते. शेकडो विद्यार्थ्यांना प्रतीक्षायादीवर ताटकळत थांबावे लागते. या व्यापाला कंटाळून, मूल जन्माला येण्यापूर्वीच त्याचे नाव प्रतीक्षायादीवर चढवणारे उत्साही पालक आणि अशा पद्धतीने नोंदणी करून घेणाऱ्या शाळा येथे पहावयास मिळतात. प्रवेशाबाबत अडचणी जशा वाढू लागल्या त्या प्रमाणात गैरव्यवहारांनाही वाव मिळत गेला. या विषयावर 'विकली'च्या

अंकामध्ये लेख लिहिणारे श्रीनिवास लक्ष्मण लिहितात, 'माझ्या आई-वडिलांनी मला नामांकित अशा जॉन कॅनॉन स्कूलमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी खटपट केली तेव्हा त्यांना तुम्ही दारूची पार्टी देऊ शकाल का, अशी विचारणा करण्यात आली. माझ्या पालकांनी अर्थातच त्या शाळेचा नाद सोडून दिला!' शैक्षणिक खात्याचे नियम धाब्यावर बसवून प्रवेशाबाबतचे धोरण आखले जाते. ज्यांना शासनाकडून अर्थसहाय्य दिले जाते अशा शाळांवर थोडे-फार तरी नियंत्रण असते; परंतु इंग्रजी माध्यमाच्या शाळा आपल्या मस्तीत आणि आपल्या मताप्रमाणे प्रवेशाबाबतचे धोरण आखत असतात. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येमध्ये १९७७ पासून घट होत असल्याची माहिती मुंबई विद्यापीठाचे रजिस्ट्रार देत असले तरीही जे इच्छुक आहेत त्यांना प्रवेश मिळवण्यासाठी प्रचंड आटापिटा करावा लागतो. १९७८ मध्ये मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या १,४२,५८० होती, तर १९७९ मध्ये ही संख्या १,२७,८२० पर्यन्त घसरली. वाढती महागाई आणि फीमधील व पुस्तकांवरील वाढता खर्च यामुळे पालकांना इच्छा असूनही आपल्या मुलांना उच्च शिक्षण देता येत नाही. नोकरी करून शिकणारांसाठी सकाळची महाविद्यालये सोइस्कर होती; परंतु ती बंद केली गेल्याने नोकरी करून शिकणारांची संख्या कमी झाली. आज मुंबईमध्ये ८० महाविद्यालये अस्तित्वात आहेत आणि नवीन महाविद्यालयांना परवानगी देण्याबाबत विद्यापीठाचे व शासनाचे धोरण विलक्षण ताठर आहे. तथापि अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमधील सोयीमध्ये वाढ करून आणखी काही विद्यार्थी सामावून घेणे शक्य आहे.

मुंबईची प्रचंड लोकसंख्या, प्रतिदिनी त्यात पडत असलेली भर, नोकरीच्या व शिक्षणाच्या निमित्ताने दूरवर जाणारी मंडळी यामुळे उत्तम नसली तरी किमान समाधानकारक वाटावी अशी वाहतूकव्यवस्था, ही या शहराची गरज आहे. एक गोष्ट निश्चित की, अनेक महानगरांपेक्षा मुंबईची वाहतूक पुष्कळच सुरळीत आहे. तथापि वाढत्या गरजांचे दडपण एवढे प्रचंड आहे की, वाहतूकव्यवस्थेचा निभाव लागणे केवळ अशक्य आहे. येत्या वीस वर्षांत उपनगरी वाहतुकीवरील ताण २०० पट वाढेल अशी अपेक्षा आहे. रेल्वेने या गोष्टीची दखल घेतली असल्याने वाढीव गरजेच्या सत्तर टक्के गरजा पूर्ण होण्याची शक्यता आहे. मुंबईच्या वाहतूक-व्यवस्थेमध्ये उपनगरी रेल्वेप्रमाणेच 'बेस्ट'चे स्थानही महत्त्वाचे आहे. जवळजवळ ४५ लाख लोक प्रतिदिनी बससेवेचा लाभ घेत असतात, तर उपनागरी वाहतुकीचा लाभ घेणारांची संख्या ५५ लाखाच्या घरात आहे. बेस्ट-जवळ आज २०५२ बसेस असून त्यापैकी ९३% बसेस रस्त्यावर धावत असतात. याखेरीज तीस हजार टॅक्सीज मुंबईमधील वाहतुकीचा प्रश्न हलका करण्यास हातभार लावत असतात. खेरीज अन्य खाजगी वाहनांची संख्या तीस हजारांहून जास्त आहे. स्कूटर्स व अन्य दुचाकी वाहनांची यात गणना केलेली नाही.

वाहतुकीचा प्रश्न गर्दीच्या वेळी खरी गंभीर समस्या निर्माण करतो. या वेळेमध्ये मुंबईकरांची हालचाल करण्याची गती एवढी मंदावते की, स्वयंचलित वाहनाचा वापर केला जात असूनही आपण बैलगाडीतून प्रवास करत आहोत असे वाटते. लोकल गाड्याना तशी दिवसभर गर्दी असतेच; परंतु कामावर जाण्याच्या आणि येण्याच्या वेळी ही गर्दी खरे अक्राळविक्राळ स्वरूप धारण करते. एका लोकल गाडीची क्षमता २,६०० उतारू नेण्याची असली तरी प्रत्यक्षात अशा गाडीतून पाच हजारांपेक्षा जास्त उतारू प्रवास करत असतात. अशा वेळी प्रवाशांचे काय हाल होतात याचे वर्णन नाही करता येणार. त्याचा अनुभवच घेतला पाहिजे!

रस्त्यावरील वाहतूकव्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पोलीसखात्याच्या वाहतूक-विभागावर असते. या विभागात एक हजार पोलीस व अन्य अधिकाऱ्यांचा समावेश आहे. रस्त्यावर गर्दी करणाऱ्या एक लक्ष पन्नास हजार वाहनांवर नियंत्रण ठेवून पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी त्याना पार पाडावी लागते आणि पोलीसखाते आपल्या परीने ही जबाबदारी पार पाडत असते.

## घर– घर– घर–

मुंबईमध्ये स्वतःचे घर, म्हणजे–ज्याला आपण निवाऱ्याची खाजगी जागा म्हणू शकू व जेथे संडास–पाण्याच्या किमान सुविधा उपलब्ध असतील असे घर, मग त्याचा आकार काहीही असो–असे 'घर' हे लक्षावधी बेघरांचे कधीही पुरे न होणारे स्वप्न आहे. शहराच्या लोकसंख्येपैकी ८२ टक्के भाग्यवान लोक एका खोलीत अथवा झोपडपट्टीमध्ये निवारा घेतात, तर अक्षरशः रस्त्यावर राहणाऱ्यांची संख्या पाच लाखाच्या घरात आहे. संडास-पाण्याच्या सुविधा सुस्थिरतेने उपलब्ध असलेल्या ३० लाख फ्लॅटस् किंवा ब्लॉक्समधून वीस लाख भाग्यवान लोक रहातात. किमान ६० हजार ब्लॉक्स प्रतिवर्षी उपलब्ध होत गेले तर आहे इतपत परिस्थिती राहू शकेल. अशी अवस्था असताना केवळ २० हजार ब्लॉक्स उपलब्ध होऊ शकतात! स्वाभाविकपणे बेघरांची संख्या चिंता वाटावी अशी वाढत जाते. राहत्या जागेची परिस्थिती इतकी गंभीर आहे की, बोरिवलीपर्यंत खाली जाऊनही आज प्रत्येक चौरस फुटाला २०० रुपये भाव द्यावा लागतो. मलबार हिलसारख्या भागात आज चौरस फुटाला तीन हजार रुपये मोजून व्यवहार होतात. लक्षाधीश मंडळींनासुद्धा आज मुंबईमध्ये राहण्याची जागा मिळवणे जवळजवळ अशक्य झाले आहे. त्यामुळे जागेबाबत खोटी आश्वासने देऊन, पैसे लुबाडणाऱ्या कॉट्रॅक्टरची संख्याही इथे काही लहान नाही! स्वाभाविकपणे रस्त्यावर झोपडपट्ट्यांतून आणि पडायला आलेल्या जुन्या चाळीतून रहाणाऱ्या लक्षावधी लोकांनी घराचे स्वप्न पाहण्याचेही सोडून दिले आहे!

त्यामानाने बाहेर खाद्यपदार्थ मिळण्याच्या सुविधा मात्र मुंबईत मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. आपल्या खिशाला परवडेल असा आहार उपलब्ध होत असल्याने, मुंबईमध्ये व्यवसाय करणाऱ्या ११,५२० उपहारगृहांना धंद्याची चणचण भासत नाही.

मुंबईचे स्वतःचे असे सांस्कृतिक व राजकीय जीवन आहे. कामगार-चळवळीचा गाभाही अखेर मुंबईच! भाई डांगे असोत, जॉर्ज असो अथवा दत्ता सामंत असोत, कामगार चळवळ हा एक स्वतंत्र विभाग आहे.

या बहुरंगी आणि ज्याच्यावर प्रेम करावे अशा या अफाट नगराची परिपूर्ण वाढ होऊन तीस वर्षे होऊन गेली आहेत हे लक्षात न घेतले गेल्याने, आज हे शहर विनाशाच्या काठावर उभे आहे आणि त्याला वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न आताच झाले नाहीत तर विनाश अटळ आहे! □

शंभराव्या पुण्यतिथिनिमित्त लेख

# वेदनेचा वेदान्ती

## फ्योडोर दोस्तोयव्हस्की (१८२१-१८८१)

प्रा. गोपालदत्त कुलकर्णी

बहुतेक घरांच्या भिंती त्यात राहणाऱ्या जन्मदात्या किंवा पूर्वजांच्या तसबिरीने सजविण्याची रूढी पूर्वज पूजेचा कृतज्ञ प्रकार आहे. त्या तसबिरीत फोटोखाली नाव व दोन-चार ओळी आकडे त्या व्यक्तीची काळ-कारकिर्दही दाखवितात; परंतु त्या दोन कालनिदर्शक अंकांच्या दरम्यान त्याने स्वतःच्या कुटुंबहिताव्यतिरिक्त फारसे काही केलेले नसते; पण प्रत्यक्ष परमेश्वराला ज्याना जन्माला घालून देवत्वाचे सार्थक झाल्याचे वाटावे असे काही महाभाग असतात. त्यांची आयुष्ये एक धगधगती मशाल असते. जगाच्या चिंब अंधारात तर त्या तेजोनिधीचे मोठेपण अधिकच उठून दिसते. अशा एका महाभागाला अवनीतलावरून गेल्याला शंभर वर्षे झाली आहेत. त्याचे नाव आहे (डॉ) फ्योडोर मिखेलोविच दोस्तोयव्हस्की. १८२१ साली जन्मलेला हा जगज्जेता रशियन कादंबरीकार काळाच्या पड्याआड गेल्याला आज शंभर वर्षे झाली; परंतु त्याच्या लखलखीत व काळजात चर्रर् करीत घर करुन राहणाऱ्या कादंबऱ्यावर काळाला एवढादेखील जुनाटपणाचा ओरखडा तवंग उठविता आलेला नाही. दोस्तोयव्हस्की हा जगातील सर्वश्रेष्ठ कादंबरीकार आहे, हे सांगायला 'मॉम'ची गरज नाही हे प्रत्येक वाचकाला जाणवते. कादंबरीच्या जगात रशियाने एवढी उत्तुंग व्यक्तिमत्वे-गौरीशंकर आणि एव्हरेस्ट-निर्माण करून ठेवली की, बाकीच्यांनी फक्त थक्क व्हावे. जगातील अद्ययावत् साहित्यिकसन्मान ज्यांच्यावरून ओवाळून टाकावेत अशी नावे रशियन आहेत. दोस्तोयव्हस्की आणि टॉलस्टॉय !

व्यासांप्रमाणे ते दोघे म्हणू शकतील-'आम्ही कादंबरीचे जग उष्टे करून टाकले आहे !' त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या नाहीत, ती गद्यमहाकाव्ये आहेत.

धर्मगुरूच्या घरात जन्मलेल्या ह्या साहित्यधिकंदराचे अख्खे जीवन एक आतंक-वेदनेची यात्रा आहे. चढ-उतार, पराभव-पराजय आणि पराक्रमांची चित्तभेदक कथा आहे. दोस्तोयव्हस्की व्यवसायाने डॉक्टरी शिकला; पण शरीराच्या 'ॲनॉटॉमी' पेक्षा मानवी मनोव्यापारांचे विच्छेदन आपले जीवितकार्य मानून त्याने 'प्रॅक्टीस' केली. शेलेने वर्णन केलेलो सॅडेस्ट थॅाट (शोकात्म विचार आणि सॅडेस्ट सॉंग (शोकगीत) यातील अतूट नाते दोस्तोयव्हस्कीने व्रताप्रमाणे आचरले. 'गरीब माणसे' (पुअर फोक) ह्या पहिल्याच कादंबरीची दखल "सखोल जाणिवा आणि शोकात्म-कलात्मक जीवनाचे पुर्ननिर्माण" अशा शब्दात घेतली गेली. फ्योडोर आर्थिक-दृष्ट्या गरिबांचा लेखक नव्हता, तर एकूणच गरीब, हताश, पराभूत पापग्रस्त आत्म्यांच्या तडफडाटाने पोळलेल्या मानवाचा लेखक होता. दोस्तोयव्हस्कीच्या जाणीवा, संवेदना मानव ह्या 'वर्गा'साठी तुटणाऱ्या होत्या, गरीब ह्या 'वर्गीकृत' (राजकारणी सोयीसाठी) जमातीसाठी नव्हत्या. पीटर्सबर्गला जाताना एका गरीब टांगेवाल्याला (कोचमन) एका सभ्य माणसाने केलेली निर्बुद्ध, मुजोर व निर्दय मारहाण पाहून फ्योडोरने जीवनानुभवाचा पहिला जहाल घोट घेतला. त्या प्रसंगाने त्याला बुद्ध व हतबुद्ध दोन्ही केले. ते जहर घोटून तो 'नीलकंठ' बनला. शीलर, गटे, शेक्सपियर, कालझॅक व ह्युगो ही साहित्यिक पंचमहाभूते जी एकदा त्याच्या मानेवर बसली ती कायमचीच! फ्योडोर जेव्हा त्या साहित्यदिग्गजांच्या रांगेत बसण्याच्या पदवीला पोचला तेव्हा त्या पाचही जणांचे आत्मे मनी तोषले असतील ! लालझॅकच्या 'ग्रांदेत'चे भाषांतर करून फ्योडोरने जो अक्षरगृहप्रवेश केला, तो अक्षरवाङ्मय निर्माण करूनच विसावला !

दोस्तोयव्हस्कीच्या कादंबऱ्या शब्दशः झपाटून टाकणाऱ्या आहेत. शरीराना नव्हे मनाना ! आठशे-हजार पृष्ठांची त्याची कादंबरी जागेपणी तर हातावेगळी करताच येत नाही; पण झोपेतही ती छळत राहते. अहो, येता, जाता, उठता, बसता, कार्य करता सतत ठणकत, दणाणत ठेवणारा एकमेव चिरंजीव लेखक म्हणजे दोस्तोयव्हस्की; तुम्ही एकदा दोस्तोयव्हस्कीच्या वाटेला गेलात की संपले. 'क्राईम अॅण्ड पनिशमेन्ट', 'ब्रदर्स कार्मझांव्ह' तुमच्या आत्म्यात रुतून बसून शल्ये होतात. 'पेट्राशेव्हस्कीग्रुप' चा सभासद म्हणून फ्योडोरने काय काय भोगले नाही ? दुर्दैवाचे दशावतार किती भोगले ? तुरुंगवास, सक्तमजुरी, सैबेरियात हकालपट्टी, फाशीची शिक्षा, फाशी देण्यासाठी वधस्तंभाजवळ नेले जाणे-परतणे हा सर्व दुःखभोग का ? तर जुलमी झार-राजवटीने सेन्सॉरशिप उठवावी, न्यायालये व न्यायदान सुधारावे, भूदासपद्धतीचे निर्मूलन व्हावे म्हणून. गांधीजी व जे. पी.सारख्या सौम्य प्रकृतीच्या लढवय्यांनीदेखील एवढेच व असेच काहीसे मागितले होते. रशियन राजवटीतील अमानुष क्रौर्याचा वारसा आजच्या कामगारांच्या हुकुमशाहीलादेखील झार राजांनीच दिलेला आहे. युरोपियन मनुष्य जात्याच आशियाई माणसाहून क्रूर आहे, म्हणून तर युरोपमध्ये सारी विश्वे व्यापणारी संपत्ती व हत्यारे निर्माण होतात, धर्मसंस्थापक जन्माला येत नाहीत !

बरेचसे तारुण्य वणवण करण्यात, मध्यम वय तुरुंगवासात, दरम्यान एक नव्हे दोन विवाह झाले; पण दोन्हीही जवळजवळ अयशस्वी आणि शेवटी थकिस्त मरण ! दुःखाच्या सागरकिनाऱ्यावर व्याकुळ आत्म्याची भैरवी समजदारपणे ऐकत लागलेल्या पिया मीलनकी आसप्रमाणे !

दोस्तोयव्हस्कीला 'नर्व्हस अटॅक्स' येऊन चकरा (फिट्स्) येण्याचाही विकार होता. एकूणच थोरपणाची महावस्त्रे निसर्ग (शेष) कृतीच्या कडलोटाकरवी पाठवतो. मोठे कलावंत सुदररीत्या 'मॉर्बिड' (morbid) असतात. ह्या सर्व शारीरिक व्याधी आणि झारची इतराजी सांभाळत दोस्तोयव्हस्कीने व्रेम्या (vremya-Time) नावाचे नियतकालिक चालविले. अर्थातच घाट्यात ! टॉलस्टॉयभोवती खानदानी संपत्ती आणि ऐश्वर्याचे वलय होते, म्हणूनही

त्याच्या लिखाणाची वाहवा अधिक होती. शिवाय दोस्तोयव्हस्की हा रूढ नीतीमत्ता किंवा तात्त्विकतेने भारलेला नव्हता. फ्योडोर एक ' करिष्मा ' होता. जोराच्या धबधब्यासारखा एक साहित्यिक कोंडुरा ! सतत आणि सर्वत्र पिछेहाट सांभाळत, पाप–मरण–उदासीनतेचे मलिन झाकोळ जगूनही आपल्या प्रतिमेच्या किरणांनी त्याने ' कोळिष्टकांचे ' रूपे करून टाकले !


'क्राइम अ‍ॅण्ड पनिशमेंट' (१८६६) 'इडियट' (१७६८) व ' ब्रदर्स कार्मांझाव्ह ' (१८७९) ह्या तीव्र आनंदसंपन्न, आशयघन, शैलीदार, प्रदीर्घ व जगातील पहिल्या-वहिल्या मनोवैज्ञानिक कादंबऱ्या लिहिणारा फ्योडोर एवढा ' मार ' खाल्लेला असूनही सतत जिवंत आणि विजेत्यासारखा लढत राहिला. हे लढणे हेमिंग्वेच्या ' ओल्ड मॅनच्या ' समुद्र आणि देवमाशांशी एकाच वेळी लढण्यासारखे होते.

आणि आज ज्या पीटर्सबर्गच्या रस्त्यावरून फिरताना 'क्राइम अ‍ॅण्ड पनिशमेंट'मधला नायक इथे कोठे तरी पिळवटून भेटेल असे वाटते, त्या रशियात दोस्तोयव्हस्कीची पुस्तके मिळत नाहीत. मान, (mann) जीद (Gide) व काफ्का (kafka) यांचा हा ' साहित्य–पिता ' त्याच्या जन्मभूमीतच उपेक्षित आहे आणि त्या फ्योडोरलाच रशिया एक दिवस साऱ्या युरोपात नेतृत्व देईल असा भरवसा वाटत होता. ' मॉस्को न्यूज ' ही सरकारी प्रकाशनसंस्था ३० ग्रंथांचा शताब्दी संच आता छापत आहे; पण एकूणच त्या सर्व हालचालीत ' कार्ल ' नाही. कारण इव्हेनबर्गने १९३० साली म्हटल्याप्रमाणे ' दोस्तोयव्हस्की पूर्ण सत्य सांगतो–' अ‍ॅर्नाल्डने शेक्सपियरबाबत असाच वाक्यप्रयोग केला आहे. ' संपूर्ण सत्य हे नाकारता, झाकता येत तर नाहीच; शिवाय ते मर्मभेदी, उन्मळून टाकणारे असते.' ९–२–१८८१ रोजी फ्योडोर मेला तेव्हाही मोठा गाजवाजा झाला नाही. शेक्सपियर मेला तेव्हाही कोणाला फारसे काही चुकल्यासारखे वाटले नसण्याचा संभव अधिक आहे. दोस्तोयव्हस्की झारलाही नको होता, कम्युनिस्टांनाही नको आहे; एकूण माणसांना पिळून, हासडून जागे करणारी व ठेवणारी माणसे शासकांना नकोशी असतात म्हणायची ! वास्तविक दोस्तोयव्हस्की कोणत्याच पंथाचा नाही. टॉलस्टॉयप्रमाणे त्याला ' शेवटी ' ' करूनसवरून ' प्रॉडिगल साक्षात्कार झाला नाही, तर तो पहिले पुस्तक लिहिल्यापासून साक्षात्कारी होता. त्याचे पहिले पाऊलच तिन्ही जगे व्यापणारे होते. सर्वांत सुदीर्घ प्रवास म्हणजे माणसाने केलेला स्वतःच्याच मनाचा प्रवास. तो करूनच दोस्तोयव्हस्कीने जीवनाचा प्रवास सुरू केला होता.

दोस्तोयव्हस्कीला ख्रिश्चन धर्मातील Evil-Devil (इव्हिल-डेव्हिल) व Sin (सिन) या संकल्पनांनी पछाडलेले होते. कोणत्याही समंजस द्विपादाला ह्या जाणिवा असाव्यात; पण या दोन सुंदर दुःखांवरचा तोडगा म्हणजे ' राम–राम ' जपणे हा नाही, तो काय आहे हे कळत नाही, हे मानवी मनाचे दुःख आहे. नचिकेत्याच्या जागी दोस्तोयव्हस्की असता तर त्याने यमाला मरणाऐवजी जिवंतपणी यमयातना देणाऱ्या ' असत् ' (Evil) आणि ' पाप ' (Sin) यांचा खुलासा मागितला असता. हॅम्लेट होरेशिओला सांगतो त्या थाटात दोस्तोयव्हस्कीने सांगून ठेवले आहे की, ' जगातल्या कोणत्याही ' वादाला ' (त्यात साम्यवादी आलेच ) कुचक्या काटचाप्रमाणे माणसांच्या मनातली असत्‌ची खोट समजून घेता येणार नाही. ' विलक्षण वस्तुस्थिती अशी आहे की असत् (इव्हिल) टाळता टळत नाही. माणसाचा आत्मा हाच विकृती (अ‍ॅब्नॉर्मल) व पापांचे जिवंत कारंजे आहे. माणसाच्या अस्तित्वाचे (स्पिरिट) नियंत्रण करणारे नियम आजही, फ्योडोरच्यानंतर शंभर वर्षांनीही अज्ञात, गूढ, अनिश्चित झपूर्झा आहेत. हे सर्व परमेश्वरावर सोपविले तरी प्रश्न सुटत नाही. मरणानंतर सुटतो; पण प्रश्न नाही, प्रश्न विचारणारा ! शांतिः शांतिः शांतिः । म्हणून सांगता करणे, ही केवळ सुटणूक झाली. गुंतून पडलेला, गच्च अडकलेला राहतोच, हे एवढे पीळदार विचार करणे साम्यवाद्यांना शक्यही नाही ! त्यांनी फ्योडोरची पुस्तके छापायला कागद नाही म्हणून सांगून स्वकीयांची समजूत घालत ब्रेझनेव्हच्या भुक्कड भाषणांचे ग्रंथ छापून जगभर फुकट वाटावेत ! कारण माणसं स्वतःविषयी विचार करू लागली की ते सर्वच गोष्टींचा साकल्याने विचार करतात. कालातीत विचारांची बीजे फेकून गेलेल्या वादळाला–फ्योडोर दोस्तोव्हस्कीला–त्याचेच ग्रंथ वाचून आपण मात्र सश्रद्ध मनाने विश्वरूपदर्शन पाहून दिङ्मूढ झालेल्या पार्थाप्रमाणे जमिनीत घट्ट पाय रोवून कृतज्ञ राहू या. ' डिस्ट्रॉयर अ‍ॅण्ड प्रिझर्वर हिअर, ओ हिअर. '

□


तिसरी आवृत्ती



सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आतमचरित्र

किंमत : बारा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मुक्काम कोल्हापूर

# अस्वस्थ करणारी संध्याकाळ

## लक्ष्मण माने, दाभोळकर, सकाळ....

१२ जुलै रविवारची संध्याकाळ ! कोल्हापुरातील कॉमर्स कॉलेजचा एक वर्ग. माणसं कुतूहलानं जमली होती. वक्ते होते 'उपरा'चे लेखक श्री. लक्ष्मण माने. अलीकडे बरेच ठिकाणी दक्षिण-पश्चिम महाराष्ट्रात त्यांच्या या आत्मचरित्रपर पुस्तकाची चर्चा झालेली. वाङ्मय म्हणून आणि त्यातील सामाजिक जाणिवांबद्दलही ! डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या अध्यक्षतेखाली होणारा हा कार्यक्रम भटक्या-विमुक्त जमातीच्या प्रश्नांचा ऊहापोहही करणार होता. त्यामुळे मिरजेहून मुद्दाम हा कार्यक्रम ऐकण्यास गेलो आणि त्या सबंध कार्यक्रमाने अस्वस्थ करून टाकले. लेखकाला भेटणे-बघणे हा मर्यादित उद्देश केव्हाच संपला आणि एक उत्कृष्ट वक्तृत्व-वेदनेपोटी निर्माण झालेले-ऐकायला मिळाले.

भटक्या जमाती, त्यांचं जीवन आणि त्यातून निर्माण झालेल्या निष्ठा वगैरे हा सगळा भाग, एक फार मोठ्या सामाजिक समस्येचा भाग असू शकतो अशी काही पुसटशी कल्पनाही नव्हती; पण या हिंदू किंवा भारतीय म्हणा हवे तर, समाजाचा एक प्रचंड भाग अशा काही जनावरांच्याही खालच्या पातळीवर जगत असतो याची श्री. लक्ष्मण मानेंनी करून दिलेली जाणीव केवळ अस्वस्थच करणारी नव्हती, तर साऱ्याच जीवनमूल्यांची फेरतपासणी करायला लावणारी होती. त्यांच्या बोलण्यात तीरासारखा एकदम खोलवर घुसणारा सरळपणा, त्यांची बोलकी झालेली वेदना सगळ्यानाच अस्वस्थ करणारी होती. अगदी साध्या-साध्या दैनंदिन उपचाराचा फोलपणा या भटक्या जीवनाच्या संदर्भात जाणवत होता. 'आंघोळ ही ज्यांना निवांतपणा आहे, स्वास्थ्य आहे, त्यांची चैनीची गोष्ट आहे' हे लक्ष्मणचे साधे वाक्य त्याने दिलेल्या संदर्भात समाज ढवळून टाकणारे आहे. 'दिवसभर उकिरडाच धुंडाळायचा, बदलायला दुसरं 'धडुतं' नाही, तिथं कुठली आलीय आंघोळ ?' असं तो सहज बोलत होता. त्या वेळचं त्याच्या चेहऱ्यावरचं स्मित, या वाक्यातला विनोद काळीज फाडणारा होता. 'खेड्यातल्या लग्नाच्या जेवणावळीत मी आपला उकिरड्यापाशी जागा पकडतो. आपली 'सीट' पक्की !' असं तो हसत हसत म्हणाला; पण पाणी सगळ्यांच्याच डोळ्याला आले ! कारण परंपरेने उपऱ्यांनी तिथंच बसायचं असतं. प्रस्थापितांच्या प्रत्येक जीवनमूल्याची या उपऱ्या समाजाच्या संदर्भात पूर्ण चीरफाड होत होती. कुठं काही संदर्भच लागत नव्हता. संततिनियमनाचा उपदेश या समाजाला करण्याच्या आधी, त्याच्या 'भरपूर पिळावळीच्या' कारणाचा शोध घ्या. कारण कुठेही मन रिझवायला जागा नाही आणि रिझवण्यासाठी मनही नाही. या परिस्थितीत 'Biological Process' म्हणून ही मुलं होतात एवढंच !

इतिहास जेथे लिहितात, गुलामांना त्यात कुठला न्याय ? या देशाचे खरे नागरिक आम्ही, कुठले कोण आर्य ? आम्ही तथाकथित तळाचे लोकच खरे भारतीय, हे सूत्र ठेवून लक्ष्मणने सारा इतिहासच पुन्हा लिहिण्याची गरज असल्याचे सांगितले आणि त्या वेळी हिंदू धर्माच्या संदर्भात त्याने काही विधाने केली, ती साऱ्या इतिहासाच्या अभ्यासकांना, सामाजिकधुरीणांना विचार करायला लावणारी आहेत. बाहेर शाहूजयंतीनिमित्त हिंदू एकता आंदोलनाची मिरवणूक चाललेली होती. आवाज ऐकू येत होते. त्या आवाजांच्या पार्श्वभूमीवर लक्ष्मणने काही मार्मिक प्रश्न विचारले. 'या साऱ्या हिंदू समाजव्यवस्थेत मी कुठे बसतो ? या धर्मानं मला काय दिलं ? या सामाजिक उतरंडीचा मी शेवटचा बिंदू. त्यामुळे वरच्या भागातला तो उदात्त, विशाल हिंदूधर्म मला दिसतच नाही, त्याला मी काय करू ? राम, कृष्ण, शंकर आदी हिंदू धर्माच्या दैवताशी माझ्या समाजाची कधी ओळखच झाली नाही. ते आपले बसले पुजत पिरोबा, मरगाई वगैरे. मग मी वा माझ्या समाजाने अभिमान आणि भक्ती बाळगायची कोणाची ? हिंदूधर्म किंवा हिंदुत्व म्हणजेच जर राष्ट्रीयत्व असे असेल तर मग हा देश माझा कसा ?' या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मोठी अडचणीची होती. कारण उत्तरं द्यायची तर पुन्हा जे संदर्भ द्यायचे ते 'प्रस्थापित मूल्यांचेच !' लक्ष्मणने याचा बारीक विचार केला असावा. कारण त्याने दोन वादग्रस्त विधाने केली. १. 'राष्ट्रवाद किंवा हिंदुत्व' जपणाऱ्यांना शेवटी काही विशिष्ट वर्गाचे हितसंबंधच जपायचे असतात. २. या हितसंबंधांना आव्हान देऊन १९२० ते १९४७ च्या दरम्यान बहुजन समाजाच्या नावावर झालली सामाजिक उलथापालथ (अभिसरण नव्हे), अगदी शाहूमहाराजांनी चालू ठेवलेली चळवळही पुन्हा काही प्रस्थापितांचे हितसबंध जपण्यासच पोषक ठरली. ती सत्तेच्या सोपानावर जाणारी पहिली पायरी ठरली. या विधानातलं तर्कशास्त्र ढोबळ आणि विचित्र होतं; पण शेवटी तो सात्त्विक संताप होता ! वेदना बोलत होती ! गहाण ठेवायला भाडे नाही म्हणून बायको, बहीण, मुलगी गहाण ठेवायची हा भयानक प्रकार ज्या समाजाने भोगला त्याची प्रतिक्रिया यापेक्षा फारशी वेगळी ती काय असणार ?

कोल्हापूरच्या या 'संध्याकाळ'ने फार अस्वस्थ करायला लावलं. लक्ष्मणच्या बोलण्यात 'ढाले'चा पॅन्थरफेम आक्रस्ताळेपणा, मुद्दाम म्हणून भाषेला दिलेली असुसंस्कृत ढब, अपशब्द काही नव्हते. पण वेदना बोलत होती हे दिसत होते.

डॉ. दाभोळकरांनी अध्यक्ष या नात्यानं बोलताना लक्ष्मणच्या बोलण्याने चुकून जरी काही 'कटुता' निर्माण झालीच असेल तर ती हळुवार शब्दानं बाजूला केली आणि या सामाजिक उतरंडीच्या वरच्या 'घटकाला' अपराधीपणाची जाणीव जरूर आहे याची

जाणीव दिली. कारण श्रोतृवर्ग मर्यादित आणि प्रस्थापितपैकीच होता.

हा झाला लक्ष्मण माने यांच्या 'भटक्या जमाती'च्या प्रश्नांचा ऊहापोह; पण त्या संदर्भात त्यांनी विचारलेले प्रश्न, दाभोळकरांनी केलेली टीका टिप्पणी आणि दुसरे दिवशी दै. सकाळ (कोल्हापूर) ने दिलेल्या बातमीचे भडक स्वरूप यांचा जर संबंध जोडला गेला तर अनेक वादग्रस्त प्रश्न निर्माण होऊ शकतात, किंबहुना हा सगळा संध्याकाळचा उत्तम कार्यक्रम प्रचारकी वाटू लागतो आणि म्हणून त्याचा विचार सगळ्यांनीच करायला हवा असे वाटते.

लक्ष्मण मानेंना देव, देश आणि धर्म यांची बांधीलकीच मंजूर नाही. कारण त्या चौकटीनेच त्यांच्या वाट्याला हे जीवन दिले. आता तर्कशास्त्राने, भावनेचा कुठलाही अंश न ठेवता याला साधा प्रतिप्रश्न आहे की, ज्या देशात तुम्ही राहता तेथील बहुजनांची बांधीलकीच जर तुम्ही मानणार नसाल तर तुम्ही न्याय आमच्याकडे व अगदी शासनाकडेही मागण्याचे प्रयोजन काय ? कारण जर तुम्ही हा भारत आपला देश मानीत नाही तर येथल्या अधिसत्तेला आवाहन करण्याचा तुम्हाला अधिकार पोचत नाही ! तुम्ही देव आणि बहुजनांचा धर्म मानीत नाही तर त्या धर्माला मानणाऱ्यांच्यापुढे तुम्ही तुमचे गाऱ्हाणे मांडणे म्हणजे मग अरण्यरुदनच नव्हे काय ? पण तुम्ही हे गाऱ्हाणे गाता कारण तुम्हाला मनोमनी ही जाणीव आहे की, जर न्याय मिळायचा असेल तर येथेच मिळेल अथवा तो येथेच मिळवावा लागेल, त्या शिवाय पर्याय नसतो ! अगदी शंकराचार्य, विवेकानंदांसारख्या महात्म्यांना हा धर्म सुधारण्याकरिता प्रथम या देशावरील श्रद्धा वादातीत ठेवावी लागली आणि मग त्यांनी घणाघाती आघात घालून धर्माचे स्वरूप बदलले. छ. शाहूमहाराजांनी, राजोपाध्यांनी केलेला अपमान हा या धर्माने केलेला अपमान मानला नाही. धर्माला शिव्या दिल्या नाहीत, किंबहुना शास्त्रोक्त (वेदोक्त) संध्या करण्याचा, मी हिंदू म्हणून मला अधिकार आहे असे ठणकावून सांगितले. त्यांचे भांडण फक्त धर्म ही कोणाचीही मक्तेदारी नसावी यासाठी होते. म्हणजे पुन्हा हा माझा हिंदूधर्म सर्वांसाठी असावा, अशी त्यांची आग्रहाची मागणी होती. त्यांची देशभक्ती तर संशयातीत होती. हे आता प्रकाशात येत असलेल्या अनेक हकीकतीवरून सिद्ध झाले आहे. त्यांनी या देशातील बहुजनांनाच देव मानलं होतं. आणि तरीही ते सामाजिक न्यायासाठी अविरत झटले आहेत का ? कारण सामाजिक चौकट मोडायची होती; पण समाज नष्ट करायचा नव्हता. दुर्दैवाने प्रत्येक चळवळीचे फायदे तोटे दोन्ही असतात. सत्यशोधक चळवळीचा शेवट शेवटी माने यांनी म्हटल्याप्रमाणे दुसऱ्या काही प्रस्थापितांचे हितसंबंध रक्षण करण्यात झाला. छ. शाहूमहाराजांच्याविषयी सविस्तर संदर्भ घ्यावा लागत आहे कारण माने आणि डॉ. दाभोळकर या दोहोंच्या व्याख्यानात तसे संदर्भ होते. ज्या महात्मा गांधींनी निधर्मीपणाची कल्पना या देशाला दिली त्यांनीही निधर्मीपणाची विकृत व्याख्या केलेली नव्हती. ते आपल्या धर्माशी बांधील होते. गीतेवर त्याचा विश्वास होता. उपनिषदातील प्रार्थनाही त्यांना मंजूर होत्या, भजन ऐकण्यात त्यांना लाज वाटत नसे. याचा असा अर्थ नव्हे की, ते रुढ अर्थाने सनातनी होते. पण भारतीय संस्कृतीच्या जीवनपद्धतीवर त्यांचा विश्वास होता आणि म्हणून त्यांना हिंदू किंवा राष्ट्रवादी म्हणवून घेण्यास लाज वाटली नाही. या श्रद्धेमुळेच ते हिंदू धर्मावर अधिकाराने टीका करू शकले. अस्पृश्यतेचा कलंक धुण्याच्या प्रयत्नात त्यांचा वाटा मोठा आहे.

मग द्वेषाचे उसने अवसान तरी का ? आणि कोल्हापूरच्या त्या 'संध्याकाळ'ने मला हे उत्तर दिले. हा उसनेपणा 'संबंधित' आणतात. वास्तविक आलेला बराच श्रोतृसमुदाय 'उपरा' च्या लेखकाला ऐकण्यासाठी आला होता. त्या लेखकाबद्दलचं प्रेम, कौतुक प्रकट करणे हा एक मर्यादित उद्देश त्यांचा होता; पण डॉ. दाभोळकरांनी त्यांच्यावर आपले काही 'समाजवादी' विचार लादण्याचा प्रयत्न केला आणि दुसरे दिवशी दै.'सकाळ'मधील प्रतिवृत्त तर संबंध व्याख्यानाचे विकृत Interpretation होते. पूज्य शंकराचार्यांची टिंगल उडवणे काय, स्वखुशीने संन्यासी होऊ इच्छिणाऱ्या जैन महिलांना अटकाव करणे काय, हा सारा पोरखेळ कृत्रिम सामाजिक मूल्यांच्या काल्पनिक बांधिलकीपोटी हे लोक करतात. त्याबद्दलच्या त्यांच्या प्रामाणिक हेतूबद्दल शंका नाही किंवा केवळ प्रसिद्धीसाठी ते करतात असा माझा पोरकट आरोपही नाही; पण समाजपरिवर्तनाच्या संपूर्ण ( Total ) हेतूविषयी आपण किती प्रामाणिक आहोत आणि हा प्रामाणिकपणा प्रकट करण्यासाठी आपण कितपत निर्भय बनू शकू याचाही या लोकांनी विचार करावा. जेव्हा तुम्ही निधर्मी जीवनपद्धती मानता त्या वेळी सामाजिक परिवर्तन हे एक विशिष्ट धर्मासंबंधीचे राहू शकत नाही. मग सवाल असा की, 'दलित' काय फक्त हिंदू धर्मातच आहेत ? कुमारी संन्याशांच्या रूपाने महिलांवर होणारा (तथाकथित) अन्याय काय फक्त जैन पंथातच आहे ? डॉ. दाभोळकरांनी एकदा १० जून ते १० ऑक्टोबर या चार महिन्याच्या काळात मिरजेत मुक्काम करावा आणि मुस्लिम समाजातील दलितांवर व युवतीवर होणारा अन्याय दूर करण्याचे धाडस करावे. नुकतेच 'दै. पुढारी' या कोल्हापुरातील प्रतिष्ठित दैनिकात प्रसिद्ध झालेल्या शेख व कोतवाल या दोन सुशिक्षित मुस्लिम समाज कार्यकर्त्यांच्या अहवालाचा विचार करावा. मिरजेत सबंध मुस्लिम समाजाची कुटुंबव्यवस्था खोट्या आर्थिक सुबत्तेच्या हव्यासापायी मोडून पडते आहे आणि त्याचे बळी त्या समाजातील तळागाळातीलच लोक व स्त्रियाच आहेत. डॉ. दाभोळकरांची काही तरी 'प्रॉजेक्ट' हाती घेण्याची इच्छा दिसली. मग 'ऑपरेशन मिरज' हा उत्तम प्रोजेक्ट आहे. मिरजेपासून सात मैलावर एका देव, देश व धर्म मानणाऱ्या राष्ट्रवादी इसमाने विठ्ठल सोसायटीच्या रूपाने हरिजन कल्याणाची योजना उत्तम राबविली आहे. तिथे मधुकाका देवलांना ना सरकारी अनुदान होते, ना प्रसिद्धीसाठी पाठीशी एखादे दैनिक ! उलट तेथील प्रस्थापिताचा कणखर 'मनगटी' विरोध होता. डॉ. दाभोळकरांनी मनावर घेऊन मिरजेतील अशी योजना राबवावी. एवढी किमान निर्भयता त्यांच्यासारख्या समाजपरिवर्तनासाठी बाहेर पडलेल्या माणसाजवळ असावी अशी अपेक्षा आहे.

तात्पर्य ? दोष दाभोळकरांचा नाही, धर्मव्यवस्थेचा आहे. जी मुलाखत पूज्य शंकराचार्य ज्या पद्धतीने देतात त्याच पद्धतीने

पोप देणार, (मदर तेरेसाची संतति नियमना-बद्दलची जाहीर मुलाखत काय दर्शविते ?) इमाम देणार, जैनमुनी देणार, तपशिलात फरक असेल; पण धर्मतत्त्वांच्या बांधिलकीच्या पलीकडे ते जाऊ शकत नाहीत आणि मुळातच धर्माची बांधिलकी ही सगळ्यात पुरातन वस्तु आहे. वास्तविक कोणत्याही विचारी माणसाला हे उमगावयास हवे आणि म्हणून त्या जुन्या संदर्भांना लक्षात घेऊन जर तुम्ही सारा समाजच घोपटणार असाल तर अपेक्षित सामाजिक परिवर्तन जवळ येण्याऐवजी दूरच जाईल, याचे भान ठेवले पाहिजे. डॉ. दाभोळकरांनी शिवाजीमहाराजाचे चलनी नाणे उदाहरणादाखल वापरले. त्यांनी अन्यायाचा प्रतिकार हे जीवनसूत्र ठरवून औरंगजेबाच्या प्रचंड सत्तेशी लढा दिला. हे सांगतानाही त्यांनी औरंगजेबाची सत्ता हे अन्यायाचे प्रतीक होते असा उगीचच शब्दच्छल केला. कारण औरंगजेब हा वेड्या धर्मांधतेचे प्रतीक होता असे म्हणणे सध्याच्या सामाजिक संदर्भात अवघड आहे; पण म्हणून वस्तुस्थिती कशी नाकारता येईल ? शिवाजीमहाराज देव, देश व धर्म या श्रद्धेपायीच लढले आणि तीच श्रद्धा या देशाचे कल्याण करू शकेल अशी त्यांची भावना होती. माझ्या धर्मश्रद्धास्थानावरील हल्ला म्हणजे माझ्या मानबिंदूवरील हल्ला हे साधे गणितच त्यानी राजकारणात वापरले !

आता या 'उपरा'च्या संध्याकाळविषयीच्या तपशिलाचा संदर्भ लक्षात घेतला तर काही गोष्टींचे स्पष्टीकरण मिळते. कार्यक्रम राष्ट्र सेवा दलातर्फे होता. भटक्या विमुक्त जमातीच्या संघटनेची स्थापना शाहूजयंति निमित्त व्हायची होती. म्हणजेच कुठल्या तरी राजकीय विचारसरणीच्या दाव्याला बांधायचे होते. कार्यक्रम राष्ट्र सेवा दलाचा म्हणून संधावर टीका हवीच; पण ती करताना राष्ट्रवाद, राष्ट्रीयत्वच नाकारण्याइतपत टोकाला जाणे म्हणजे विकृतीच नव्हे काय ? आणि त्यातूनही अधिक वाईट गोष्ट म्हणजे स्वत: लक्ष्मण माने याना प्रत्यक्ष शब्दार्थाने तसे म्हणायचे नव्हतेही ! त्यांनी केवळ सात्त्विक संताप व्यक्त केला होता. वरचेवर भूक–भूक करून स्तनाशी झोंबणाऱ्या अर्भकाला आई ज्या रागाने मांडीवरून खाली आपटते ती भावना मानेंची होती. मुलाचे डोके फोडून मारणे अभिप्रेत नव्हते.

पण डॉ. दाभोळरांनी आणि दै. 'सकाळ' (कोल्हापूर) ने त्यांचा सोयिस्कर अर्थ लावला आणि १२ जुलैच्या संध्याकाळेने केलेले काही उत्तम विचारांचे संस्कार धुऊन काढले हे मात्र खरे !

— आनंद बागलकोटे
ब्राह्मणपुरी
मिरज

नवा उपक्रम

# अक्षर दिवाळी १९८०

पावसाळ्यात कावळ्याच्या छत्र्या उगवतात त्या वेळी अगदी तशाच अनाकलनीय, अचानकपणे जागोजागी, वाटेल तिथे दिवाळी अंकांची कल्पना जन्म घेते आणि साहित्य गोळा करण्याची तयारी सुरू होते. मग पूर्वविचारांचा वारसा असलेल्या, अनुभवी किंवा दर्जेदार अंकांबरोबरच अप्रगल्भ, सवंग, कच्चे किंवा अपुरे म्हणून निर्बल असे शेकडो दिवाळी अंक निघत राहतात. वाचकांपुढे अंकांचा ढीग पडतो. खिशातले पैसे ज्यातून वसूल होतील असं काय घ्यावं हा प्रश्नच असतो. अशा वेळी दर्जेदार लिखाणाबाबत जी अवस्था जाणत्या संपादकाची तीच पुढे चोखंदळ रसिकांची होते.

दिवाळी अंकांतून सर्वत्र विखुरलेल्या साहित्यातून उत्तम कलाकृतीचा आस्वाद घ्यावा असं तर वाटत असतं; पण इतके दिवाळी अंक विकत घेणं पैशाच्या दृष्टीनं ग्राहकाला मुळीच परवडणारं नसतं. पुन्हा त्यांची संख्या गवताऐसी उदंड ! घेऊन घेऊन घेणार किती ? वाढत्या किंमती आणि वेळेच्या दृष्टीनं ते ग्राहकाला सहज शक्यच नसतं.

सच्च्या रसिकाची ही कोंडी आणि सर्वसामान्य माणसाला आर्थिक दृष्टिकोनातून पडणारा प्रश्न राजाभाऊ माटयांसारख्या एखाद्या प्रकाशकाला अस्वस्थ करतो आणि स्वत:चा आर्थिक तोटा सोसूनही एक अभिनव कल्पना लोकांसाठी राबवण्याची त्यांची धडपड सुरु होते. दिवाळी अंकांच्या भाऊगर्दीतून उत्तम साहित्य निवडावं आणि ते पुस्तकरूपानं वाचकांच्या हाती द्यावं ही ती कल्पना !

कल्पना चांगली; पण प्रत्यक्षात आणणं कठीण. सोयिस्कर अजिबात नव्हे एक तर *आर्थिक बाजूचा विचार यात साफ* कोलमडतो आणि प्रकाशकाच्या नेहमीच्या पुस्तकप्रकाशनातला किमान फायदा तर राहू द्याच पण खर्चाची तोडमिळवणी करण्याचा विचारही दूर सारावा लागतो. दुसरं म्हणजे उत्तम साहित्य निवडायचं कसं ही एक अडचण असते. पुस्तकाचं स्वरूप आणि भवितव्य ठरवणारा हा एक प्रश्न एका माणसाला संपादक नेमून सुटणारा नाही.

प्रकाशक माटयांनी या दोन्ही अडचणी धाडसानं स्वीकारल्या. आर्थिक प्रश्न तर सर्वस्वी त्यांचा होता. त्यांनी या योजनेच्या प्रत्यक्षीकरणासाठी रूढ रीतीचा विचार दूर सारला आणि एक नावाजलेलं संपादकमंडळ नेमून दुसऱ्या अडचणीतून मार्ग काढला.

यातून हाती आलेलं पुस्तक म्हणजे 'अक्षर दिवाळी १९८०.' संपादकमंडळ—य. दि. फडके स. शि. भावे, आनंद यादव, प्र. वा. परांजपे, आणि दिनकर गांगल. ही नावं आजच्या मराठी जगात आपापल्या परीनं सुप्रतिष्ठित अशी, लेखक, आस्वादक, समीक्षकाची चोखंदळ आणि जबाबदारीची भूमिका बजावणारी नावं आहेत.

वाचन प्राथमिक निवड आणि नंतर दर्जानुसार बहुमताने निवड (आवश्यक तेथे मतदानही) ही जी पद्धत या संपादकमंडळानं अवलंबली, ती अशा स्वरूपाच्या कामासाठी त्यातल्या त्यात कमी दोषपूर्ण पद्धत आहे. म्हणून पुस्तकातली वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारांतील चांगल्या कलाकृतींची बहुतेक निवड वाचकांच्या दृष्टीने वादग्रस्त ठरत नाही.

अनुक्रमणिका पाहिली तर कथा, कविता, ललित लेख, हास्यचित्रे आणि कादंबरिका असे विभाग दिसतात. विनोदी लेखन, आत्म-

लेखन, व्यक्तिचित्रे, भयकथा, रहस्यकथा, कलासमीक्षण ह्या साऱ्यांचे मग काय झाले ? या प्रश्नाचं उत्तर संपादकीय निवेदनात दिलेलंच आहे. संपादकांची या सर्व वाङ्मय प्रकारातील उत्तम निवडीबाबत निराशाच झाली आहे. त्यातील सकस, कमी दोषपूर्ण असं लिखाण संपादकांना बहुमतानं निवडता आलेलं नाही ही परिस्थिती आजच्या मराठी लेखनजगताचं स्वरूप स्पष्ट करणारी आहे.

कथांमध्ये आशा बगे यांची रुक्मिणी कथा पाहिली की समाधान वाटतं. या अप्रतिम कथेबरोबरच अच्युत बर्वे, रत्नाकर मतकरी, ह. मो. मराठे, दि. बा. मोकाशी, भारत सासणे इ.च्या दर्जेदार कथा आहेत. जयंत नारळीकरांची 'अथेन्सचा प्लेग' ही कथा मात्र या गोतावळ्यात कच्चेपणानं खटकणारी कथा आहे. निवडीचा सूर इथे किंचित शबल झाल्याचं जाणवतं. बरं अकारविल्हे पद्धती स्वीकारल्याने ही पहिलीच छापलेली कथा. उत्तम शास्त्रीय कथा ती हीच ? असं क्षणभर निराशेनं वाटतं; एरवी नारळीकर लिहितातही चांगले; पण ही कथा म्हणजे त्यांची उत्तम भट्टीची कथा नव्हे.

लेखांमधे प्रो. वि. देशपांडे यांचा जी. ए. कुलकर्णींच्या कथेवरचा एक सुंदर लेख आहे. तपशिलात कदाचित सहमत न होण्याची एखादी जागा असेल पण त्यामुळे काही बिघडत नाही. विजय परुळकरांच्या शरद जोशी आणि शेतकरी आंदोलनाच्या लेखाची लांबी त्यातल्या अभ्यासाच्या महत्त्वामुळे जाणवत नाही आणि नाट्यशिक्षण शिबिरांसंबंधीच्या अशोक रानड्यांच्या लेखाची कमी लांबी वैचारिक उणेपणा ठेवत नाही.

कवितांच्या विभागात किती तरी तरुण नावं दिसतात. नव्या जाणिवांसह भरून येणारे हे आपलेच तर आवाज ! प्रथितयशांच्या ओळखीच्या शैलीबरोबर धामणस्कर–जोगळेकरांची, कोळगावकर–सोनावण्यांची स्वतंत्र, ताजी प्रतिभा भेटते तेव्हा मन खूष होतं.

ललित लेखांच्या विभागातही विविध परी आहेत. अवचटांचे ओतूरचे दिवस, ग. ह. खऱ्यांची इतिहाससंशोधनाची धडपड, चिरमुल्यांचा तबलिया मित्र आणि माणूस आणि दळवींचा ठणठणपाळ आहे. अनंतराव पाटलांची एका वस्तीच्या 'बेघरपणाची' कहाणी आहे. दत्ता भटांनी सांगितलेली माणिकराव पाटलांची गोष्ट आहे आणि प्रतिभा रानड्यांनी रेखाटलेलं एका 'आक्रमण झालेल्या देशाचं' वातावरणचित्र आहे. 'हास्यचित्र : फ्रेंच स्टाइल' हा वसंत सरवटेंचा लेख म्हणजे एक नवा सुखद अनुभव आहे, घ्यायलाच हवा असा.

वसंत सरवट्यांचीच 'दूरदर्शनलाभ' ही हास्यचित्रमालिका इथे निवडली गेली आणि आनंद पाटलांची 'कागूद' ही कादंबरी अखेरच्या विभागात आहे.

पुस्तक मिटल्यावर विचार मनात येतो की, कथा आणि कविता यांच्या क्षेत्रात निवडीला भरपूर वाव मिळेल अशी मोठ्या प्रमाणावर आणि चांगली निर्मिती आहे, मात्र वैचारिक क्षेत्रात सकस आणि जोरकस लेखन फार कमी आढळते. ललितलेखनात प्रतिभेच्या उत्स्फूर्ततेपुढे चिंतन, अभ्यास आणि वैचारिक बळाची फारशी मातब्बरी नसते, पण विचारांची स्पष्टता, मूलगामी चिकित्सावृत्ती आणि तार्किक संगतीच्या भक्कम पायावर उभी राहिलेली निष्कर्षदृष्टी मराठी जगतात अभावानेच आढळते. मात्र एक खरे की, वैचारिक लेखनात मागणी करण्यासाठी (दिवाळी अंकांचे संपादक) उत्सुक असतात का ? दिवाळी अंकांच्या सध्याच्या प्रकृतीला वैचारिक लिखाणाबाबत किती आस्था आहे ? याही प्रश्नांचा विचार वाचकांकडून झाला पाहिजे. दिवाळी अंकांमधून वैचारिक लेखन प्रतिबिंबित होत नाही म्हणून ते जन्मही घेत नाही असे नव्हे. मग याची मोजदाद कशी करायची ? केवळ दिवाळी अंकांच्या निवडीत नाही. कारण दिवाळी अंकात नाही म्हणून उत्तम लेखन बाजूला राहू नये म्हणून अशा लेखनाची सूची तुलनेसाठी समोर येईल का ? केवळ या पुस्तकाच्या निमित्ताने मनात येणारे हे प्रश्न मी मांडले आहेत.

सवंग लिखाण कोणत्याही काळात होतच असते; पण त्याचे प्रचंड वाढते प्रमाण अस्वस्थ करणारे आहे. विनोदी लेखन व व्यंगचित्रांबाबतही अभिजातता फार कमी आहे. हे विचार वाचकांच्या मनात काही नवी हालचाल घडवतात. सवंगता बाजूला सारून आणि सकस साहित्य वाचल्याचे समाधान देऊन, उत्तम अभिरुचीला हे पुस्तक खाद्य पुरवील तर पुस्तकाचा हेतू साध्य होईल असे वाटते.

'अक्षर दिवाळी' हा एक वार्षिक उपक्रम व्हावा म्हणून आता रसिकांनी या उपक्रमाच्या पाठीशी उभं राहायला हवं. कारण अशा उपक्रमांचा जन्म त्यांच्यासाठीच असतो आणि त्यांच्याच बळावर तो उमेदीनं बहरणार असतो.

—अरुणा ढेरे

अक्षर दिवाळी १९८०
विश्वकर्मा साहित्यालय, पुणे
पृष्ठे ४४८, मूल्य : छत्तीस रुपये




'केप्र' मसाल्यापासून बनविलेली कैरी, लिंबू
मिक्स लोणची ... बाटलीतून फस्त होत
असताना बाटलीची अवस्था किती कठीण बाई...

केशवलक्ष्मी प्रसाधन
कन्या शाळेजवळ, शनिवार, पुणे-३०

फिनिक्स निवड

# The Incredible japanese.

By M. K. Rustomji
& S. A. Sapre
(Macmillan India Ltd.
Pages 137, Rs. 20/-)

मी तसा फार anti-TV नाही. TV ला Idiot-Box नाव कुणी दिले ते मला माहित नाही. हे नाव अगदीच औचित्यपूर्ण आहे असे मी म्हणत नाही. कारण ज्या बॉक्सवर तुम्ही ग्रेसफुल कथ्थक बघता, निरनिराळे पक्षी बघता, समुद्राला पाल्पेट व थॉब होताना बघता, भयानक पर्वत बघता, एखादा प्रेटी फेस बघता त्या बॉक्सला तुम्ही 'इडीयट' कसं म्हणणार ? मार्शल मॅकल्युहानच्या म्हणण्यानुसार TV ने पृथ्वीचे 'ग्लोबल व्हिलेज' करून टाकले आहे. तेवढे बॉक्सचे अप्रूप मला नाही. (Medium is the message का Message is the medium असं काही तरी ते म्हणाले होते.) तेवढे अप्रूप तर नाहीच, पण कधी कधी जेव्हा हा बॉक्स सॉलीडस्टेटचा आवाज कानावर सॉलीड हल्ला करतो तेव्हा मला श्री. स. शि. भाव्यांचा 'सर्वंकष प्रदूषणाचे बळी' हा 'माणूस' मधील लेख आठवतो व दिनकर भिडे, बा. भ. पाटील यांच्यानंतर गचकण्याचा (मी स. शि. भावे व ठणठणपाळ दोन्ही वाचतो) नंबर माझा लागतो की काय, अशी शंका येते. मृत्यूचं सालं हे फार वाईट. समजा, नंबर लागला तर माझा अंदाज खरा ठरला हे मला कळायचेच नाही ! बॉक्स माणसा-माणसात ध्रुवीकरण करतं हे मात्र खरं आहे. मीच काय, पण जर्मनीचे चान्सेलर हॅल्मट श्मीट यांनी प्रत्येक कुटुंबाला आवाहन केलं होतं की, त्यांनी आठवड्यातून एक दिवस तरी बॉक्स बंद ठेवावे. काही लोकांच्या बाबतीत IT अॅट सोर्स कापला जातो. तसेच श्री. वसंत (मी नाही 'रावजी' लावणार) साठे यांनी एकदा अॅट सोर्स TV बंद केला तर बरे होईल. रात्री कोणत्याही रस्त्यावरुन तुम्ही हिंडा. विशेषत: प्रभात रोडच्या १ ते १५ नंबरच्या गल्ल्यांतून तुम्ही हिंडलात तर चालत चालत तुम्हाला छायागीतातली हीट गाणी संपूर्ण ऐकायला मिळतील. एका घरातून 'ओम शांति ओम... लगेच दुसऱ्या घरातून 'मैंने किसीसे दिल...' तिसऱ्या ओनरशिप ठोकळ्यातून 'देके कर ली बाते खराब...' तुम्हाला चालण्याचा व्यायमही मिळेल व सर्वंकष प्रदूषणही ! प्रभातरोडच्या गल्लीत इतकं शांत वाटतं ! विविध प्रकारच्या झाडांमुळे परिसर सुन्दर वाटतो आणि ग्रामीण इफेक्ट यावा त्यासाठी कॉर्पोरेशनही दक्ष ! कोणत्या ना कोणत्या गल्लीतले लाईट्स् नेहमीच ऑफ !

बॉक्सच्या पडद्यावरील इमेज तीन लाख नृत्य करणाऱ्या ठिपक्यांचे असते आणि एका सेकंदात तीस वेळा ते बदलतात, असे श्री. बी. व्ही. पटेलनी 'इंडियन एक्स्प्रेस' च्या (१९-७-१९८०) वाचकांच्या पत्रव्यवहारात लिहिले होते. मनावर व डोळ्यावर इतकी जलद होणारी बंबार्डमेंट हानिकारक आहे, असे त्यांनी पुढे म्हटले होते.

अहो, पण हे बॉक्स नसतं तर या पुस्तकाच्या एका लेखकाला मी कधीच पाहिले नसते! रूस्तोमजीला. परवा मीया पारशाला नॉर्थकोट पार्किन्सन व परेश (?) बरोबर पाहिले. मार्शल मॅक ल्युहन (हे मार्शल कसाही वाक्यप्रयोग करतात) म्हणत असे की, IT (सॉरी TV) (फ्रॉईड म्हणाले होते, "स्लिप ऑफ द टंग सत्य सांगत असते !) तुमच्या घरात असला तर तुम्ही टोटली इनव्हॉल्व्ह होता व empathy-परमानसप्रवेश-चा प्रकार इतक्या खुबीदार रीतीने होत असतो की...

हा सडपातळ, थोडासा टक्कल असलेला पारशी इतका छान बोलला की, त्याने पांढऱ्या बड्या साहेबाला मागे टाकला. पार्किन्सन बरेच म्हातारे aphasia किंवा Cleft-palate असलेले वाटले. (घेऊ द्या ! घेऊ द्या ! पांढऱ्या साहेबाची घेऊ द्या !) कदाचित माझा पॉइंट ऑफ व्ह्यू डिस्टॉर्टेड असेल. पण पार्किन्सनचा चेहरा मला डिस्टॉर्टेड वाटला खास !

हे पारशी गृहस्थ जितके चागले बोलतात तितकेच चांगले लिहितात. त्यांनी शरु रांगणेकरलाही मागे टाकले आहे असे वाटते. त्यांचे प्रत्येक पुस्तक पुष्कळच वाचनीय आहे.

अल्ल्या जगात जर कुठे औद्योगीकरणामुळे कमीत कमी बकालीपणा आला असेल तर तो जपानमध्ये. समग्र औद्योगिक क्षेत्रात जर कुठे कमीत कमी लेबर प्रॉब्लेम्स असतील तर ते जपानमध्ये. जर कुठे मनाची कमीत कमी


**NEW TITLES RECEIVED**

१. ग्रंथायन – (ग्रंथवाचनाचे महत्त्व) – बाळ सामंत
२. चैतन्याचे ऊन – (कथा) – विजया राजाध्यक्ष
३. टिळक विचार – (राजकीय विचार) – भा. कृ. केळकर
४. मनाची पिल्लं – (कविता) – डॉ. निशिकांत श्रोत्री

1. **The Viceroy's Wife** – (Biography) – Iris Butler – (Pre-independent India)
2. **Himalayon Wonderland** – (Travels in Lahaul-Spiti – M. S. Gill
3. **Dastanbuy** – (Biography) – Khwaja Ahmad Faruqi
4. **The Vantage Point** – (Biography) – Lyndon Baines Johnson

* पावसाळा आला ! 'फिनिक्स' च्या पुस्तकांना पाण्याची अॅलर्जी. त्यांना पावसाळ्यात रेनकोट (रबरबॅंडसकट प्लॅस्टिकची बंद पिशवी) चढवायला कधीच विसरू नका !!

**THE PHOENIX LIBRARY**
727, Sadashiv, Pune – 411 030

विकलांग अवस्था झाली असेल तर ती जपानमध्ये ! प्रगतीमुळे जर कुणी कमीतकमी दुरळून गेला असेल तर तो जॅपानीज. मॅनेजमेंटच्या आदर्शाचा कळस जर कुणी गाठला असेल तर तो जपानने. इतर पाश्चात्य देशांनी औद्योगीकरणापायी प्रचंड किंमत मोजली. तेथील समाजरचनेला तडे गेले; जपान असाच राहिला. Inscrutable. Staid. Phlegmatic. हा देश बाह्यत: इतका शांत राहून आतून इतका गतिमान कसा ? झेनमुळे असे घडत असेल ? अण्वस्त्रांच्या माऱ्यामुळे इतके कॅरेक्टर तर या देशात आले नसेल ना ? का गैशा व विधिपूर्ण चहामुळे असे होत असेल ? इतकी शिस्त या देशाने कशी कमावली असेल ? जपानच्या मोटारीने आज फोर्ड व जनरल मोटर्ससारख्या प्रचंड बड्या कंपन्यांना मागे टाकले आहे ! ज्या देशात मनगटी घड्याळे बनवण्याची परंपरा वर्षानुवर्षे चालत आली आहे अशी स्विस घड्याळे बनवणाऱ्या कंपन्यांच्याही जपान पुढे गेला आहे. जपानची शिपबिल्डिंग व इलेक्ट्रॉनिक्सबद्दलची ख्याती तर जगाच्या कानाकोपऱ्यात पसरत आहे. निपॉन, मित्सुबिशी, हिटाची ही नावे कुणी ऐकली नाहीत ?

स्त्रीमुक्ती जपानमध्ये फारशी आली नाही. ( हे तर मुख्य कारण नसेल ? ) जपानी नवरा हा कुटुंबाचा मुख्य असतो. कुणाच्याही समोर त्याची बायको वाद घालीत नाही. नवऱ्याचे निर्णय तिला नेहमी शिरोमान्य असतात. ( आपल्याकडे रामराज्यात असंच होतं, नाही ? )

जपानमध्ये गटबाजी आहे, नाही असे नाही. परंतु हे एकमेकाला पूरक ठरले आहेत. मारक नाही. निष्ठा ही वस्तू जपानी मनुष्य सर्वांत जास्त जपत असतो. जो तो आपल्या गटाशी संपूर्णपणे व बिनतक्रार निष्ठावंत राहतो. " Obedience in Japan takes the form of total Submission. ही कशा प्रकारची कॉन्फॉर्मिझम आहे ? या प्रकाराने तेथे मनात किती 'रिप्रेशन' होत असेल ? विधिपूर्ण हाराकिरी करण्यात तर त्यांची परिणती होत नसेल ? अशा भारी किंमती देऊन जर ही औद्योगिक शांति जपानने मिळवली असेल तर मग अमेरिकेची व इतर पाश्चात्य देशाची स्वातंत्र्य असलेली औद्योगिक अशांती श्रेष्ठ की जपानची श्रेष्ठ ? ( GNP वगैरे बाजूला सोडा; पण एवढं स्टँडरायझेशन झाले की व्यक्तिमत्त्वाचं काय ? या कारणामुळेच कदाचित जपानी साहित्याने जगावर कधीच लक्षणीय अशी छाप पाडली नाही.) यासुनारी कावाबाटा, युकीयो मिशिमा वगैरे झाले. ठीक. पण जागतिक साहित्यक्षेत्रात भरीव व ठसठशीत असे जपानने काहीच केलेले नाही.

या पुस्तकात 'द फर्म इज ऑल इंपॉर्टंट' या नावाखाली एक चित्र आहे. या चित्रातील लहान मुलं,कुत्रे,तरुण बायका,सुमो (मला इथे जपानी पहेलवान म्हणायचे आहे.) पिंजऱ्यातील पोपट व कॅलेंडरमधील बिकिनी पहेनलेली तरुणी हे सर्व जपानच्या एका फॅक्टरीला लवून मुजरा करीत आहेत ! अशी ही या पुस्तकातील चित्रेच इतकी बोलकी आहेत की, ती बघून आपल्याला पुष्कळ काही कळतं. आणखी एका चित्रात ( Fig. 11 ) तर एका फॅक्टरीतील झाडूवाला, बॉस, सेक्रेटरी मेकॅनिक, कारकून वगैरे हातात हात घालून उभी आहेत.

जपानमध्ये कंपनी ही एक फॅमिलीच समजली जाते. स्वतःचे कुटुंब कंपनीचे एक दीर्घीकरणच असा तेथे समज आहे. तिथल्या कंपन्यात म्युच्युअल अेड फंड नावाचा एक निधी असतो. जन्म, मृत्यू, लग्न, मुलाला शाळेत प्रवेश मिळतो तेव्हा सर्व जपान्यांना या निधीतून रक्कम मिळते. एका फाउंड्रीतील मॅनेजरना एक अफलातून आयडिया आली. जी मुले स्वतःच्या बाबांना आरामशीर झोपू देतात त्यांना काही तरी भेटवस्तू पाठवली जाते ! जपान्यांना शिकण्याचीं भारी हौस असते. प्रशिक्षणाला तर ते अत्यंत महत्त्व देतात. उत्पादनाच्या दर्जाचे तर ते एक प्रकारे फिटिशच ( fetish ) करून टाकतात ! प्रायव्हेट सेक्टर तिथे सुप्रीम आहे हे पुष्कळांना माहीत आहे.

तेथे ग्रुप सेन्स हा सुप्रीम असतो. सेन्स ऑफ बिलॉंगिंग आले की एलिएनेशन (alienation) कमी होते. सहाजिकच ते कमी झालं की उत्पादन वाढतं, दर्जा वाढतो. विन्मुखता, द्वैतभाव, एलिएनेशन यांनी पाश्चात्य देशांना पछाडले आहे. एलिएनेशन हे दुधारी असते, एकीकडे त्यात प्रचंड सर्जनशीलतेची शक्ती असते तर दुसरी धार कमालीची विध्वंसक व रितेपणाची असते. जपान सोडून इतर काही देशात या एलिएनेशनच्या सर्जनशीलतेमुळेच ( निदान काही उत्कृष्ट ) लक्षणीय साहित्य निर्माण झाले आहे.

या पुस्तकाच्या अनुषंगाने जपानवरील प्रभाकर पाध्यांचे 'तोकोनामा', ना. तु. ठाकुरांचे 'जपान व अतिपूर्वेकडील देश'. रमेश मंत्र्यांचे 'जपानमध्य जनू बांडे', पु. ल. देशपांडे याचे 'पूर्वरंग,' रवींद्र केळेकराचे 'जपान जसा दिसला', श्रीपाद जोशीचे 'जा जरा पूर्वेकडे', इंदू साक्रीकरचे 'पूर्वेच्या परिसरात', डेव्हिड बर्गामिनीचे 'Japan's Imperial Conspiracy', जॉन गुंथरचे 'ट्वेल्व्ह सिटीज' मधले 'टोकियो' व इतर काही इंग्रजी पुस्तके चाळली. फ्रॉइडची तीस वर्षे व त्यानंतरचे त्याचे What does a woman want ? आठवले. इतकी पुस्तके चाळून झाल्यावर मोसुद्धा मनात विचार केला What is Japan ? सालं जाऊन पाहिलं तर काय थांगपत्ता लागेल ? पण ते कधीच शक्य होणार नाही ! Incrutability तशी पूर्वेत फार असते म्हणतात; पण लॅंड ऑफ द रायझिंग सेन सर्वांत जास्त oriental व अधिक inerutable.

—जे. एन. पोंडा



तिसरी आवृत्ती संपत आली

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**
**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी ( सचित्र )
किंमत : रुपये पंचेचाळीस

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**



### ' कलयुग 'च्या निमित्ताने

# धंदेवाईक चित्रपटांच्या कुशीत श्याम बेनेगल

सतीश जकातदार

श्याम बेनेगल, धंदेवाईक चित्रपटवाल्याच्या भाऊगर्दीत स्वतःच्या चित्रपटांना 'डिरेक्टर सिग्नेचर' देऊन स्वतःचे एक वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या या ४७ वर्षीय हैद्राबादी गृहस्थाला देशातील नवसिनेमाचा 'मसीहा' समजले जाते. 'अंकुर' (१९७४) या चित्रपटाने आपली चित्रपट कारकीर्दीची सुरुवात करणाऱ्या या 'मसीहा'ने गेल्या सात वर्षांच्या उपस्थितीत नऊ चित्रपट सादर केले. धंदा हे सूत्र न नाकारता धंदेवाईक चित्रपटांशी बऱ्याच प्रमाणात फारकत घेणारे आणि काही बाबतीत साम्य दाखविणारे, सामाजिक बांधिलकीशी जवळीक साधणारे आणि सध्याच्या गल्लाभरू चित्रपटाला तात्पुरता पर्याय देऊन 'काहीच नाही तर हेही चालेल' असं मोघम पांढरपेशी तत्त्वज्ञान स्वीकारणाऱ्यांना दिलासा देणारे चित्रपट बेनेगलांनी या काळात सादर केले.

या काळात बेनेगलांनी प्रत्येक नव्या चित्रपटाबरोबर आपल्या चित्रपटशैलीला घासून-पुसून नव्या स्वरूपाची नवलाई व सफाई आणण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनी या शैलीपासून कधीच फारकत घेतली नाही, की त्यात प्रयोग करण्याचे प्रयत्न केले नाहीत. त्यांची प्रयोगक्षमता आशयापुरतीच मर्यादित राहिली. आकृतिबंधाबाबत मात्र ते आहे त्या परंपरागत शैलीपाशीच रेंगाळले.

'कलियुग' चित्रपटाच्या निर्मितीमुळे त्यांच्या चित्रपट उत्क्रान्तीतील प्रवासाचा एक टप्पा पूर्ण झाला असून या चित्रपटाने त्यांच्या शैलीचा बंदिस्तपणा, तिच्या मर्यादा व सीमारेषा व्यक्त केल्या आहेत. याचमुळे त्यांच्या चित्रपटीय प्रवासाचे व त्यातील विकासाचे तुलनात्मक विश्लेषण करण्याची व त्यांची तथाकथित 'सामाजिक बांधिलकी' जरा सखोलपणे तपासण्याची वेळ आता आली आहे.

१९७४ साली 'अंकुर' प्रदर्शित झाला आणि बेनेगलांनी बाजारू चित्रपटापासून फारकत घेऊन 'समांतर सिनेमा' (म्हणजे काय! समांतर काँग्रेस का?) नामक नव्या प्रवाहाची पताका खांद्यावर घेतली. धंदेवाईक चित्रपटाच्या नाकर्तेपणातून या प्रवाहाचा जन्म झाला आणि त्याला काहीसा प्रतिसादही मिळाला; परंतु या सिनेमाला 'तीट' लागण्याआधीच 'दृष्ट' लागली. १९७८ मध्ये शशीकपूर हा चंदेरी दुनियेतील तारा निर्माता बनला आणि बेनेगलांच्या दिग्दर्शनाखाली 'जुनूनची' निर्मिती झाली. अंकुर, (१९७४); निशांत (१९७५); चरणदास चोर (बाल चित्रपट १९७५); मंथन (१९७६); भूमिका (१९७७) आणि कोंडूरा (१९७७); (नव्या संचात याच चित्रपटांची तेलगू भाषेत पुर्नंनिर्मिती 'अणुग्रहम' या नावाने) या पाच-सात चित्रपटांत सामावलेला त्यांचा नवा प्रवाह धंदेवाईक चित्रपटांच्या 'राष्ट्रीय प्रवाहात' सामील झाला.

धंदेवाईक चित्रपटांना 'अस्पृश्य' मानण्याचे धारिष्टय निदान सध्याच्या काळात तरी कोणी करणार नाही, तसं करणंही चुकीचे आहे; पण एके काळी आपली जातकुळी न ओळखता 'समांतर सिनेमा'चे समर्थन करणारे बेनेगल 'स्वगृही' परतल्यावर मात्र धंदेवाईक चित्रपटांचे समर्थन मोठ्या झुबकेदार भाषेत करू लागतात तेव्हा त्यांची 'सामाजिक बांधिलकी' उसनी आहे का असा संशय बळावणे साहजिक आहे.'

## संदिग्ध वास्तवाची निर्मिती

आणि त्यामुळेच त्यांची 'सामाजिक बांधिलकी' त्यांच्या आतापर्यंतच्या चित्रपटांतून व्यक्त कशी होते हे पाहणे सयुक्तिक आहे. आतापर्यंतच्या बेनेगलांच्या सर्व चित्रपटांकडे नजर फिरविल्यास त्यांच्या चित्रपटातील कलात्मक कलाकुसरीपलीकडे लपलेल्या सामाजिक बांधिलकीचे स्वरूप बेनेगलांनी मुद्दाम किंवा उगाचच संदिग्ध ठेवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सामाजिक बांधलकी म्हणजे बेनेगलांनी अलीकडच्या काळातील रशियाछाप प्रचारकी ढंगाचे

चित्रपट काढावेत असं कुणीच म्हणणार नाही; परंतु चित्रपटमाध्यमांतून समकालीन वास्तव प्रतिबिंबित करताना विशिष्ट, निश्चित व अचूक दृष्टिकोन असावा अशी किमान अपेक्षा आहे. बेनेगलानी आत्तापर्यंत ज्या काही विषयांची हाताळणी केली त्याबाबत निश्चित स्वरूपाच्या दृष्टिकोनाची गरज अपरिहार्यपणे भासते. याउलट त्यांच्या चित्रपटात मात्र राजकीय कारणांचा परस्परसंबंध विसरून, सामाजिक वास्तवाची तोड-फोड करून एक संदिग्ध वास्तव निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो.

मृणाल सेनसारखा 'बांधिलकी'ची खुले आम कल्पना जोपासणाऱ्या दिग्दर्शकाच्या राजकीय दृष्टीकोनाबाबत मतभेद जरूर असू शकतात; पण त्यांचा राजकीय दृष्टीकोन त्यांच्या व्यक्तिमत्त्वात् आणि चित्रपटात पूर्णपणे सामावला आहे, हे कुणालाच नाकारता येत नाही. एक वेळ त्यांच्या चित्रपटातील 'वास्तव' वर्तमानपत्री आहे, अशीही टीका होऊ शकते; परंतु निश्चित विचाराचे दडपण मृणाल सेन यांच्या चित्रपटांमध्ये जाणवते. बेनेगल यांच्या आधीच्या पिढीतले सेन आहेत; परंतु बेनेगल यांचे समकालीन एम. एस. सथ्यूसारखे दिग्दर्शकही निश्चित अशा राजकीय दृष्टीकोनामुळे 'गर्म हवा' सारखे चित्रपट काढू शकतात. 'गर्म हवा' मध्ये केवळ जातीय दंग्यामुळे उध्वस्त झालेले जीवन चित्रित करण्याचा प्रयत्न नसतो, तर 'फाळणी'ला जन्म देणारे भ्रष्ट राजकारणीही सथ्यू उघडकीस आणतात. बेनेगलांकडे नेमक्या याच गोष्टीची कमतरता आहे. त्यांच्या 'कलात्मक सफाईत' या प्रकारची संवेदनशीलता जाणवत नाही. मध्यानेच टॅह ऽऽ केलेल्या सईद मिर्जांच्या चित्रपटात आढळणारी समकालीन व्यवस्थेविरुद्धचा संताप, चीड, उद्वीग्नताही बेनेगलांच्या चित्रपटात आढळत नाही; मग मिर्जांचा नायक 'अल्बर्ट पिंटो' अमिताभ बच्चनची सफाईदार आवृत्ती का असेना !

निश्चित दृष्टीकोनाचा अभाव आणि चित्रपटाचा बाजारी हिशोब या कैचीत सापडलेले बेनेगल 'सर्व काही' लपविण्यासाठी मध्यममार्ग स्वीकारतात. एकीकडे मणी कौल, कुमार शहानी यांचा शास्त्रीय संगीताप्रमाणे असलेला 'शास्त्रोक्त सिनेमा' नाकारतात, तर दुसरीकडे सत्यजित राय यांचा, आपल्या खास शैलीमुळे बस्तान बसलेला नववास्तववादी परंपरेतला सिनेमाही नाकारतात. इतकंच नव्हे तर सेन, सथ्यू, मिर्जा यांच्याप्रमाणे बेनेगल निश्चित राजकीय दृष्टीकोन घेण्याचे टाळतात, तर दुसऱ्या बाजूला आपला मनमोहन देसाईही होणार नाही, असं मनाशी पक्कं ठरवितात व तशी काळजीही घेतात.

मध्यमवर्गीयांप्रमाणेच हे पांढरपेशी तत्त्वज्ञान स्वीकारणाऱ्या बेनेगलांची गोची होत असली तरी बेनेगल या प्रवासाचेही समर्थन करण्यास धजावतात. ते म्हणतात, 'जोपर्यंत राजकीय चित्रपटाची गरज निर्माण होत नाही तोपर्यंत त्यांची निर्मितीही होत नसते.' एवढं म्हणून ते थाबत नाहीत; तर पुढे लॅटिन अमेरिकेचे उदाहरण देऊन बेनेगल साहेब म्हणतात की, या देशात लोकशाही अस्तित्वात नसल्यामुळे खराखुरा राजकीय प्राणी म्हणून तेथील लोकांना जगणे अशक्य असते. अशा वेळी राजकीयदृष्ट्या जागृत असणाऱ्यापुढे दोनच पर्याय उरतात; एक म्हणजे चित्रपटातून निषेध व्यक्त करणे अथवा भूमिगत क्रांतिकारी बनणे ! या प्रकारची परिस्थिती सध्या भारतात नसल्याचे सांगून ते पुढे म्हणतात, 'सध्याच्या व्यवस्थेविरुद्धचा संताप व्यक्त करणारे चित्रपट लोकांपर्यंत त्याच व्यवस्थेद्वारे पोचू शकतात ... तेव्हा (संताप व्यक्त करणारे चित्रपट) असे चित्रपट पोचविणे कितपत शक्य आहे ?' (सिनेमा व्हीजन अंक ३; १९८१)

### वैचारिक धुक्यात हरवलेला दिग्दर्शक

बेनेगलांनी स्वतःच्या राजकीय दृष्टीकोनाला हे कायमचे प्रश्नचिन्ह चिकटविले आहे. या प्रश्नचिन्हाचे ब्रीदवाक्य करून त्याचा चित्रपटप्रवास चालू आहे. मग प्रश्न पडतो की, वैचारिक धुक्यात हरविलेल्या या दिग्दर्शकाला नेमका कोणत्या वाटेने प्रवास करावयाचा आहे ?

मनमोहन देसाई किंवा राजकपूरसारखे स्वप्नविक्रेत्यांचे ठोक व्यापारी म्हणतात की, प्रेक्षकाना रोजचे रटाळ जीवन विसरायला लावणारी स्वप्नं हवी आहेत, करमणूक हवी आहे. त्यांची ही मागणी पूर्ण करणे हेच आमचं काम आहे. बेनेगलांना हेही नको आहे आणि राजकीय चित्रपटही नको आहेत. चित्रपट हे खर्चिक माध्यम असल्याचे त्रिकालाबाधीत सत्य सांगून बेनेगल एका नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत म्हणतात की, प्रेक्षकांशिवाय चित्रपटनिर्मितीचा विचार करणं मूर्खपणाचे आहे. त्यामुळे प्रेक्षकांच्या पचनी पडतील असे चित्रपट काढण्यासाठी फिल्मी बाजारातील हिशेब, तंत्र, कल्पना यांचा आवाका लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. हिंदी चित्रपटांमुळे प्रेक्षकाना 'जुलाब होण्याची वेळ आली तरी बेनेगल त्यांच्या पचनशक्तीचे (खडतर सहनशक्तीचे) फसवे बुजगावणे उभे करून आपले वेगळेपण सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहेत. थोडक्यात म्हणजे बेनेगलांना 'धंद्या' ला बसायचे आहे आणि 'सौभाग्य कुंकूही' लावायचे आहे.

'भूमिका' पर्यंत आशादायक वाटणारा बेनेगलांचा प्रवास 'जुनून' नंतर स्थिरावला आहे आणि 'कलयुग' पाशी त्याचा 'DEAD END' झाला आहे. त्यांच्या बाबतीत हे असं का घडलं याची बीजं आपल्याला त्यांच्या 'अंकूर'पूर्व प्रवासात सापडतात.

'चित्रपटाद्वारे जाहिरातबाजी' या कलेत हातखंडा असलेल्या बेनेगलांनी 'अंकूर' पूर्व प्रवासात अक्षरशः शेकडो जाहिरातपटांची व लघुचित्रपटाची निर्मिती केली. आपले 'प्रॉडक्ट' कसे विकावे किंवा 'विक्री योग्य' बनवावे याची मुळाक्षरे त्यांनी याच काळात गिरवली. एखादी विक्रीयोग्य वस्तूची खरीखुरी ओळख करून न देता त्या त्या वस्तूची प्रेक्षकांना त्यांच्या व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून जाणवेल, रुचेल आणि पचेल अशी एक भ्रामक प्रतिमा तयार करणे, या दृष्टिकोनातूनच 'जाहिरातपटांची' निर्मिती केली जाते. बेनेगलांनी 'अंकुर'पूर्व प्रवासात अशा शेकडो जाहिरातपटांचा रतीब टाकला आहे.

या जाहिरातपटीबरोबर बेनेगलांनी याच काळात काही चांगले लघुचित्रपटही दिले. 'Child of the street' (१९६७) आणि 'simhasta' (१९६८) या त्यांच्या दोन लघुचित्रपटाना मानमरातबही मिळाला. याबरोबरच 'Music of India' सारखे भारतीय सगीतातील विविध प्रवाहांची नोद घेणारे अनेक लघुचित्रपट त्यानी सादर केले. या काळातील जाहिरातपटानी बेनेगलाना व्यावसायिकतेची मखलाशी शिकवली, तर लघुचित्रपटांतून त्यानी छायाचित्रणाची चुणूक दाखवली.

हा काळ सरला आणि बऱ्याच वर्षांनंतर 'अंकुर'ने भारतीय चित्रपटात सरंजामशाहीतील सुप्रस्थापित संबंधांवर प्रतिक्रिया व्यक्त केली. सरंजामशाहीभोवती गुरफटलेल्या पारंपारिक मूल्यांचे वलय त्यांनी विस्कटले. व्यवस्थेच्या रचनेमुळे शोषिताना अपरिहार्यपणे स्विकाराव्या लागणाऱ्या शरणागतीचे चित्रण बेनेगलांनी फारशी घोषणाबाजी न करता 'अंकुर' मध्ये केले. 'अंकुर'ने 'क्रांती'चा बोलबाला केला नाही, तर बदल करण्याची आवश्यकता व्यक्त केली.

'अंकुर'मधील जमीनदाराच्या घरावर फेकलेल्या भिरभिरत्या दगडाचा सूचक वेध 'निशांत'मध्ये विकास पावला. 'निशांत'मध्ये संघर्षाची नांदी म्हटली गेली; परंतु त्याचबरोबर संघर्ष टिकविण्याबाबतच्या ग्रामीण भागातील वैचारिक क्षमतेच्या कमतरतेवर बोट ठेवून काहीशा निराशावादाला खत–पाणी घातलं.

'अंकुर' ची कथा तशी भावनाप्रधान नाटकाहून वेगळी नव्हती, त्यातील नायक शेवटी इतका राक्षसीपणा करू शकेल, हे सुरुवातीला कुठेही सूचित केले जात नाही. शेवटच्या दृश्यातील या चुकीमुळे शहरी वातावरणात एकदम खेडेगावच्या हवेची साथ पसरल्यासारखे वाटते. 'निशांत'मध्ये बेनेगलांनी 'स्टिरिओ टाइप' करण्यास सुरुवात केली. वलयांकित धंदेवाईक चित्रपटांमधून पोसल्या जाणाऱ्या स्त्रीच्या पावित्र्याच्या कल्पनेचा त्यांनी या चित्रपटात वेगळ्या तंत्राचा अवलंब करून गौरवच केला.

'निशांत'नंतरच्या पुढील टप्प्यात बेनेगलांनी 'भूमिका' मध्ये एक नटीच्या उध्वस्त जीवनाचा धंदेवाईक, समाजातील विविध थरांमध्ये तिला वैयक्तिकरीत्या आलेल्या उद्विग्न अनुभवांचा शोध घेतला. ग्रामीणव शहरी जीवनाची पार्श्वभूमी लाभलेल्या या चित्रपटात 'जिला जे हवं होतं ते मिळालं नाही आणि जे मिळालं त्याचा इतरांनी विध्वंस केला,' अशा नटीचे आत्मचरित्र (हंसा वाडकर 'सांगते ऐका') उलगडून दाखविलं. या चित्रपटात त्यांनी 'nostalgia' या प्रकाराची हाताळणी बहारीने केली.

त्यानंतरच्या 'मंथन' या गुंतागुंतीच्या चित्रपटाची प्रेरणा बेनगलांनी गुजराथमध्ये अपवादात्मकरीत्या यश पावलेल्या 'आनंद पॅटर्न ऑफ को–ऑपरेशन'वर आधारित 'खेडा डेअरी प्रकल्पा'तून घतली. भारतातील प्रख्यात दूधविषयक राजकारणी डॉ. कुरीन याचे सहाय्य बेनेगलांनी या वेळी घेतले. आणीबाणीच्या काळात या चित्रपटाची निर्मिती झाल्यामुळे आशादायक शेवट ठेवण्याची पूर्वनियोजित व्यवस्था त्या काळाने केली होती. 'सहकाराच्या तत्त्वावर समाजाची पुनर्बांधणी' या सूत्रावर आधारित बेनेगलाचा हा चित्रपट वास्तव जीवनातील सुसंगत तर्कावर बेतण्याऐवजी डॉ. कुरीन यानी माडलेल्या पुस्तकी तर्कावरच बेतला होता. सहकारक्षेत्रात नव्या स्वरूपात (गुजराथ व महाराष्ट्रातील सहकारक्षेत्रातले राजकारण) बस्तान मांडणारे राजकारण उघडकीस आणण्याऐवजी बेनेगलांनी भोंगळ दृष्टिकोन स्वीकारून एका सुरक्षित तटस्थतेवर चित्रपटात भर दिला.

## 'कोंडुरा'–एक हास्यास्पद फसगत

यानंतर त्यांनी कं. वि. त्र्यं. खानोलकर याच्या 'कोंडुरा' या कादंबरीवर आधारित त्याच नावाचा चित्रपट सादर केला. या चित्रपटाची तेलगू आवृत्ती 'अनुग्रहम' प्रदर्शित झाली असली तरी 'कोंडुरा' अजून डब्यातच आहे. बाजाराचे पक्के हिशेब बाधणाऱ्या बेनेगलाचे हे अपयश जरा खेदकारकच वाटते. खानोलकराच्या कादंबरीतले अनेक विस्कळित प्रसंग व उसवत जाणारे संबंध, अनेक पातळ्यांवर वावरणाऱ्या 'कोंडुरा'च्या गूढ कथानकात देव-दैवतांचा असलेला वस्तुनिष्ठ दृष्टिकोन, त्याबाबत मानवाची भूमिका व मानवनिर्मित अंधश्रद्धेबाबत मानवाचाच दृष्टिकोन अशा तिहेरी गुंतागुंतीचा बेनेगलांनी या चित्रपटात ऊहापोह केला. विस्कळित प्रसंगांच्या विसंगत सरमिसळीमुळे हे चित्रपटीय रूपांतर काही बाबतीत कादंबरीपेक्षा सरस ठरले. मात्र काही वेळा कादंबरीचे सही–सही रूपांतर करण्याच्या नादात बेनेगल हास्यास्पद ठरले. खानोलकरानी कादंबरीच्या पहिल्या दोन पानात 'कोंडुरा'बाबत एक उत्सुकतेचे, गूढ वलय निर्माण केले. तो 'कोंडुरा' चक्क मानवी रूपात सादर करून बेनेगलांची रूपांतर करण्याच्या नादात झालेली फसगत हास्यास्पद ठरते.

धंदेवाइक चित्रपटात काम व पैसा भरपूर मिळाला पण स्थान व मानमरातब मिळाला नाही, अशा शशीकपूर या चंदेरी दुनियेतील ताऱ्याने बेनेगलाना चित्रपटासाठी डिवचले. 'मी निर्माण केलेल्या चित्रपटांचा मीच नायक असावे' असा माझा हट्ट राहणार नाही, असं म्हणत शशीकपूरने 'जुनून'ची निर्मिती केली. श्याम बेनेगलांनीही वरील विधानाचे समर्थन करीत शशीकपूरला त्यानेच निर्माण केलेल्या 'जुनून' व 'कलयुग'मध्ये नायकाच्या भूमिकेत सादर केलं.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धातील हिंसेच्या पार्श्वभूमीवर 'जुनून'ची कथा बेतली होती. (किंवा तुमची बाजू जर वेगळी असेल तर १८५७ चे 'शिपायांचे बंड' म्हणा अथवा 'सरंजामदारानी स्वसंरक्षणासाठी केलेली चढाई' म्हणा...) या हिंसेमध्ये बळी पडलेल्या भावड्या जीवांचा कोंडमारा आणि त्या तणावपूर्ण परिस्थितीतही जोडली जाणारी नवी नाती, यांचं चित्रण करताना बेनेगलानी स्वातंत्र्ययुद्धाचा आवाका व्यक्त करताना त्याबाबत काही प्रतिक्रिया व्यक्त करण्याऐवजी शशीकपूरबाबतच जरा जास्त सांगितलं.

## व्यक्तिरेखा व तणावपूर्ण घटनांना प्राधान्य

'जुनून'पर्यंतचा हा बेनेगलाचा प्रवास चित्रपटमाध्यमाच्या हाताळणीबाबत अनेक गुण-दोषांसह झाला आहे. तेव्हा त्याची या माध्यमाबाबतची जाण, त्यातील अपुरेपण व माध्यमातील काही अंगाबाबतचे कसब व हातोटी याची चर्चा करणं अगत्याचे आहे.

चित्रपटांसाठी कथेची निवड करण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना बनेगल म्हणतात की, 'कोणताही माणूस, मग तो पुरुष असो अथवा स्त्री असो, आपल्या वास्तव जीवनात विविध पातळ्यावर संबंध जोडत असतो. आपलं नातं साधण्याचा प्रयत्न करत असतो...मग ते नातं सामाजिक, आर्थिक, नाट्यात्मक असो अथवा भावनिक असो! आणि हे नातं जोखणं, ओळखणं हाच माझा आवडता विषय आहे. मला कधीही गूढकथा आवडली नाही की निवेदनात्मक कथेचीही मी कधी उभारणी केली नाही. अपरिहार्यपणे मी वास्तव जीवनाशी संबंध प्रस्थापित करू पाहणाऱ्या माणसांचा व त्याच्या जीवनाचा आलेख व्यक्त करणाऱ्या कथांची निवड केली. मग त्याचा संदर्भ ऐतिहासिक असो (जुनून), समकालीन असो (मंथन) अथवा त्याचा तो 'नोस्टाल्जिआ' असो (भूमिका)!'

'यावरून हे स्पष्ट होते की, बेनेगलांच्या चित्रपटात निवेदनात्मक कथनशैलीपेक्षा व्यक्तिरेखामधील परस्पर संबंधाना व त्यातून निर्माण झालेल्या तणावपूर्ण घटनाना महत्त्व असते. प्रेक्षकांना केवळ 'प्यादी' बनवून निवेदनात्मक कथनशैलीच्या हुकुमाचे ताबेदार बनविणे त्याना अभिप्रेत नसते. त्यामुळे चित्रपटातील व्यक्तिरेखाचे परस्पराशी असलेले गुतागुतीचे संबंध व त्यातून निर्माण झालेले ताण-तणाव यावरच चित्रपटात भर असतो. निवेदनात्मक कथनशैली टाळणं यात वावगं काहीच नाही; पण बेनेगल जी गुतागुत दाखवू इच्छितात तिच्यात ते स्वतःच इतके गुततात की त्याची वाटचाल सखोलतेकडे होण्याऐवजी संदिग्धतेकडे होते. मग संपूर्ण चित्रपटावर धूसर, अस्पष्ट कल्पनाचे साम्राज्य पसरते.

निवेदनात्मक कथनशैलीतील पारपारिकता टाळून तिचा उत्कृष्टपणे व प्रयोगक्षमतेने वापर करणारे एकमेव दिग्दर्शक सत्यजीत रे यानी 'अंकुर'च्या प्रदर्शनानंतर श्याम बेनेगल यांना दिलेला सल्ला नोंद घेण्यासारखा आहे. (Our film's therin film's –सत्यजीत राय) राय म्हणतात, 'As a firm believer in geometry, as a guiding principle in art, I should strongly advise Benegal to keep away from *quadrangles* in future.'

बेनेगलांना सल्ला देण्याचा सत्यजित रे यांचा हक्क बेनेगलांसह कोणीच नाकारणार नाही. तसंच तो न स्वीकारण्याचे स्वातंत्र्यही बेनेगलाकडून कोणी हिरावून घेणार नाही. हे खरे असले तरी राय यानी बेनेगलांच्या चित्रपटमाध्यमविषयक दृष्टिकोनातील एका महत्त्वाच्या कमतरतेवर अचूकपणे बोट ठेवले आहे. सत्यजित रे यांचा 'quadragles' टाळण्याचा सल्ला अजूनपर्यन्त तरी बेनेगलांनी मानलेला नाही आणि यापुढेही ते तो न मानण्याचीच शक्यता अधिक आहे. त्याच्या प्रत्येक चित्रपटात ज्या गोष्टीचा साधारणपणे पेचात टाकल्यासारखा शेवट होईल तीच गोष्ट ओढूनताणून पूर्ण करण्याचा प्रयत्न हे या टीकेचे मुख्य लक्ष्य आहे. दोन्ही डगरीवर पाय ठेवून चाललेली ही कलाकुसर व कसरत बेनेगलाच्या चित्रपटातील एक मोठी उणीव बनली आहे.

हृषीकेश मुखर्जीकडे जशी एक कल्पना (Idea) असते... (चलाख पण भाबड्या माणसाच्या करामती) किंवा मनमोहन देसाईकडे जसे एक सूत्र असते (हरवले ते गवसले) तसाच बेनेगलांकडे एक 'प्लॉट' असतो आणि याच प्लॉटवर त्यांच्या संपूर्ण चित्रपटाचा डोलारा उभा असतो. या प्लॉटला चित्रपटीय आकार प्राप्त करून देण्यासाठी बेनेगलांच्या गोतावळ्यातील सदस्यांची एक कमिटी नेहमीच कोरा कागद घेऊन तयार असते. गिरीश कर्नाड, विजय तेंडुलकर, सत्यदेव दुबे आणि खुद्द बेनेगल असे चार–पाच सदस्य या 'कमिटी' मध्ये आहेत.

कमिटीद्वारे पटकथा (script writing by a committee) लिहिण्याच्या या प्रकारामुळे दिग्दर्शकाच्या एकसंध अशा 'दृश्यीकरणा'वर परिणाम होण्याच्या संभाव्यतेचे निराकरण करताना बेनेगल म्हणतात की, माझ्या चित्रपटाचे अंतिम स्वरूप माझ्या डोळ्यांसमोर असते; परंतु पटकथा तयार करताना 'प्लॉट' या प्रकाराची संपूर्ण जाण असलेला व बुद्धिबळपटूप्रमाणे तर्कसुसंगत संकल्पना असलेला गिरीश कर्नाडसारखा दिग्दर्शक माझ्या चित्रपटाच्या पटकथेत भरच घालतो. दुबे, तेंडुलकर पटकथेची 'नाट्यात्मकता' वाढविण्यास उपयुक्त ठरतात आणि असं असूनही संपूर्ण चित्रपटावर प्रभुत्व माझेच असते.'

बेनेगल म्हणतात ते खरे आहे असे जरी मानले आणि चित्रपट हे अनेक निर्मितिक्षम कलाकारांनी एकत्रितपणे निर्मिती करावयाचे माध्यम असले तरी चित्रपटाचा पटकथाकार दिग्दर्शक असावा, अशा कल्पनेचे पुरस्कर्ते जास्त सकस, सुसंगत व भरीव चित्रपट काढू शकतात असा आजपर्यंतचा अनुभव आहे. बेनेगलांची स्वतःचीच पटकथा असलेला 'अंकुर' चित्रपट त्याच्या आतापर्यंतच्या सर्व चित्रपटामध्ये उजवा ठरला, त्याला कदाचित हेही कारण असेल.

बेनेगलानी जरी बाजारू चित्रपटात प्रवेश केला असला तरी त्यांनी अशा चित्रपटाचे 'पोषाखीपण' कटाक्षाने टाळले आहे. 'सामाजिक वास्तवाकडे' संपूर्णतः पाठ फिरवून एक वेगळंच स्वप्नील आणि पलायनवादी जग निर्माण करण्याचा या चित्रपटांचा खाक्याही बेनेगलांच्या चित्रपटात नसतो. हे वेगळेपण त्यांच्यात उमटले आहे ते सत्यजित राय यांच्या नववास्तववादी शैली परंपरेच्या परिणामातून!

घटनांची तपशीलवार अतिशय बारीकसारीक गोष्टीसह मांडणी, बाह्यचित्रणावर भर देऊन प्रामुख्याने त्या परिसराचा वापर करणे. कथित घटनेतील काळ, वेळ, स्थळ याच्या निश्चितीबाबत व अनुषंगिक गोष्टीबाबत इमान दाखविणे ही प्रकर्षाने जाणवणारी नव–वास्तववादी शैलीपरंपरेची मुख्य लक्षणे.

### बेनेगलांचा वांझोटा वास्तववाद

. याच परंपरेची मुहूर्तमेढ रोवून, त्याला साज चढवून, लयबद्ध ओघवत्या अशा शैलीत सत्यजित रे यानी या परंपरेचा शैलीप्रवाह निर्माण केला. याचा परिणाम कोणी थोपवितो म्हटलं तरी ते अशक्य आहे. बेनेगलसुद्धा याच शैलीप्रवाहाशी जवळीक साधतात. बेनेगल आणि सत्यजित रे यांची तुलना करणे जरी चुकीचे असले तरी त्याच्यातील एका फरकाची नोंद घेणे आवश्यक आहे.

सामाजिक प्रश्न असो अथवा राजकीय गोष्ट असो, सत्यजित रे त्यातील दारिद्र्य अथवा कुरूपता मर्मभेदक स्वरूपात मांडतात, तर बेनेगल तडजोडवादी भूमिका स्वीकारून 'विक्रीयोग्य' वस्तू म्हणूनच की काय, अशा स्वरूपात या वास्तववादाचा वापर करून घेतात. रे यांच्या शैलीत आढळणारी एकसूत्रता, सखोलता आणि तरलता ही वैशिष्ट्ये बेनेगलांमध्ये अभावानेच आढळतात.

नववास्तववादाचा बेनेगल कशा प्रकारे अर्थ लावतात हे बघणं जरा गमतीशीर आहे. 'निशांत' मध्ये बायको पळविल्यानंतर शाळामास्तरच्या मनातली आंदोलने टिपण्याऐवजी बेनेगल शाळामास्तरला आपल्या मुलाची चड्डी धुताना अथवा ढुगण धुताना दाखवितात. वास्तववादाची एक बाह्य कल्पना ते इथे जोपासतात.

'निशांत' मध्येच अमरेश पुरीचो काखेतले केस कापतानाची दृश्ये, सर्वांत लहान जमीनदार जास्त प्यायल्यानंतर ती ओकारीची दृश्ये किंवा 'भूमिका' मधील स्मिता पाटीलची वारंवार साडी बदलतानाची दृश्ये किंवा अगदी 'कलयुग'मधील 'बेडसीन्' अशा अनेक 'शोभादायक' (?) गोष्टी खरं तर चित्रपटाच्या आशयाला कोठ-

त्याही प्रकारे मदत करीत नसतानासुद्धा वास्तववादाच्या नावाखाली बेनेगल टाकतात आणि मग तो 'बेनेगल वास्तवाद' वांझोटा बनतो, चमत्कृतिवजा उरतो !

आतापर्यंत आपण बेनेगलाच्या चित्रपटविषयक दृष्टीकोनाबाबत ऊहापोह केला व त्याचे अपुरेपण, मर्यादा बघितल्या त्याच्या चित्रपटाच्या आशयाबाबतही तपासणी केली. हे असले तरी बेनेगल चित्रपटकलेतील दोन महत्त्वाची अंगे मात्र–छायाचित्रण आणि अभिनय–अतिशय सामर्थ्याने व निश्चयाने हाताळताता दिसतात.

'अंकुर' मधील पहिल्या काही दृश्यांमध्ये जेव्हा नायक ठाकूर (अनंत नाग) प्रथमच त्याच्या शेतावर येतो त्या ठिकाणी कथेच्या दृष्टीने फारसे काही घडत नाही. तरीही त्या ठिकाणी बारीक–सारीक तपशीलाच्या सढळ चित्रणातून खेडे व नायकाचे त्यातील स्थान सकसपणे चित्रित केले जाते. उदाहरणच द्यायचे झाले तर पहिल्यांदा जेव्हा ठाकूर नायिकेला भेटतो, वा साधू मेहेर ताडाचे फळ चोरताना पकडला जाऊन त्याची डाबर फासून गाढवावरून धिंड काढली जाते ती दृश्ये ! कॅमेरा गावातून निघालेल्या मिरवणुकीमागील आनंदित मुलांवरून 'कट' घेऊन बाजूला उभ्या असलेल्या तरूण व म्हाताऱ्या माणसांच्या चेहऱ्यांवरील अस्वस्थता टिपताना दिसतो किंवा अतिशय काळजीपूर्वक पद्धतीने ठाकूर आणि कुळाची बायको यांच्यातील नाते बेनेगल प्रस्थापित करतात. तेथील परिसराचे, माणसाचे व त्याच्यातील संबंधाचे थोडक्यात, तरी पण पुढील कथेच्या दृष्टीने व भावी परिणामांची चुणुक दाखविणारे चित्रीकरण ते परिणामकारकपणे हाताळतात.

'निशांत' मध्ये सुरुवातीलाच दोघे जमीनदार भाऊ एका शेतमजूराला त्याच्या बायकोला रात्री वाड्यावर पाठवून द्यायला सांगतात. ती बाई वाड्यावर येते तेव्हा ते दोघे जमीनदार भाऊ भरपूर पिऊन विकृतपणे हसत असतात. एक नव्या शिरशिरी आणणाऱ्या विकृत सुखाचा आनंद घेण्यासाठी दोघेही उत्सुक असतात. त्या वेळी या स्त्रीच्या चेहऱ्यावर फक्त गारठलेल्या वेदना असतात आणि पाय आखडून घेतलेला शरीराचा सागाडा असतो. संपूर्ण चित्रपटभर हा एकच 'क्लोज–अप' बरचं काही सांगतो. याच चित्रपटात मास्तरची बायको जमिनदाराच्या वाड्यावर पळवून नेल्यानंतर गिरीश कर्नाड चा 'आक्रोश' आणि त्या पार्श्वभूमीवर पुतळ्यासारख्या उभ्या असलेल्या गावकऱ्यांच्या बिनचेहऱ्याच्या आकृत्या हे दृश्य संघर्ष पेटविणाऱ्या शाळामास्तरचा पुढचा प्रवास सूचित करते.

'मंथन' मध्ये भोला या हरिजनाला ( नसीरउद्दीन शहाला ) तुरुंगातून गिरीश कर्नाड सोडवून आणताना वाटेत गाडी बंद पडते. मनात संतापाची लाट थोपवून भोला मख्खपणे बसतो. त्या वेळचा भोलाचा 'क्लोज अप' किंवा गिरीश कर्नाड शहराकडे जाताना गुजराती लोकगीताच्या पार्श्वभूमीवर स्मिता पाटीलने परतीच्या इच्छेने केलेला पाठलाग, हे याबाबतचं आणखी एक उदाहरण !

'भूमिका,' 'कोडूरा,' 'जुनून' व 'कलयुग' मध्ये बेनेगल छायाचित्रणात अशाच काही सुट्या प्रसंगात सरशी करतात. 'भूमिका' मध्ये नटीच्या जीवनातील तो काळ उभा करण्याचे त्याचे कसब वाखाणण्यासारखे आहे. १९३० ते ४० दरम्यानच्या काळातील चित्रपटाची दृश्ये हुबेहुबपणे उभी करण्यासाठी बेनेगलांनी बरीच मेहनत घेतली आहे. प्रभात, वाडिया, बॉम्बे टॉकी, रणजीत इत्यादी स्टुडीओची पायपीट करून व त्या काळाचा अभ्यास करून तो काळ उभा करण्यात ते यशस्वी झाले आहेत; मात्र या चित्रपटात संकलनाची कात्री आखडती घेतल्यामुळे चित्रपट कंटाळवाणा बनला आहे.

बेनेगलांचे त्याच्या सर्वच चित्रपटात जाणवणारे वैशिष्टय म्हणजे घटना अथवा कथा ज्या परिसरात घडते त्या परिसराशी, वातावरणाशी, परंपरेशी प्रेक्षकाचं नातं निर्माण करण्याचा, जोडण्याचा प्रयत्न ते करतात. गोविंद निहलानीसारखा कॅमेरामन ( 'आक्रोश' चित्रपटाने आपले स्वयंभूपणा सिद्ध करणारा) बेनेगलांच्या हिमतीला असल्यामुळे बेनेगल निहलानीचं कसब पुरेपूर पणाला लावतात.

'अंकुर' व 'निशांत' मध्ये आंध्र प्रदेशाची पार्श्वभूमी, 'मंथन' मधील गुजरातच्या परिसरातील उजाड वातावरण व 'जुनून' मधील लखनौचा पारंपारिक रुबाब कथेच्या अनुषंगाने बोलक्या स्वरूपात प्रकट होतो.

'अंकुर', 'निशांत', 'मंथन' अशा चित्रपटांत 'झूम'चा वापर कटाक्षाने टाळणारे बेनेगल व्यक्तिनिष्ठ विषयाची गरज लक्षात घेऊन 'कोडुरा' चित्रपटात 'झुम' चा वापर सातत्याने करतात, हीही लक्षणीय बाब आहे.

छायाचित्रणात सुट्या स्वरूपात वेगळेपण दाखविणारे बेनेगल संकलनदृष्ट्या मात्र अपुरे पडतात. छायाचित्रणामागे घेतलेली त्यांची मेहनत उत्कृष्ट संकलनाभावी लुप्त होते व त्यामुळे बऱ्याच वेळा त्याच्या चित्रपटातील गतिमानता हरवते. अर्थात ' प्लॉट 'च्या अनुषंगाने काही वेळा त्यानी काटछाटी सूत्रपद्धतीचा यथोचित वापर केला आहे. उदाहरणार्थ, 'जुनून' मधील मध्यंतरापर्यंतचा काळ संथगतीने पुढे सरकतो आणि त्यानंतर आशयानुसार संपूर्ण चित्रपटाला द्रुतगती मिळते; परंतु एकंदरीत, बेनेगलाच्या बहुतेक सर्व चित्रपटाना संथगतीच असते, द्रुतगती निर्माण करण्यासाठी काटछाट करण्याचे ते टाळतात किंवा काही दृश्यावर उगीचच जोर देऊन संथगती टिकवितात आणि योग्य ती परिणामकारकता साधण्यात अयशस्वी ठरतात.

### 'कलयुग' – भोंगळ मांडणी, उथळ हाताळणी

बेनेगलाचे एक वैशिष्टय आणि हिंदी चित्रपटांना त्यानी दिलेली देणगी म्हणजे, नव्या कलाकारांना पुढे आणण्याची त्यांची वृत्ती आणि त्यांच्यातील अभिनय गुणाचे संगोपन व चीज करण्याची त्याची हातोटी. शबाना आझमी, अनंत नाग, साधु मेहेर, नसीरउद्दीन शाह, अमरीश पुरी, स्मिता पाटील, गिरीश कर्नाड, कुलभुषण खरबंदा, नफीसा अली, सुषमा सेठ, मोहन आगाशे, सुप्रिया पाठक, जेनीफर कपूर, सुनील शानबाग अशा अनेकाना आपल्या चित्रपटांमध्ये संधी देऊन बेनेगलांनी अभिनयाची सक्षम जाण असलेल्या नवकलाकारांची पिढीच चित्रपटसृष्टीला प्रदान केली आहे. याच बरोबर नाटकातून व चित्रपटातून गाजलेल्या अभिनेत्याचे चीज करायलाही बेनेगल विसरत नाहीत. विजया मेहता, शशीकपूर, अमोल पालेकर, रेखा, व्हिक्टर-बॅनर्जी इत्यादीना त्यानी चांगल्या भूमिका देऊन त्याचे चीज करण्याचे प्रयत्नही केले आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर शशीकपूरनिर्मित व बेनेगल–दिग्दर्शित

'कलयुग' या चित्रपटाकडे पाहण्याची आवश्यकता आहे. बेनेगलांच्या आतापर्यंतच्या चित्रपटामधील मर्यादा आणि बदीस्तपणा, त्यांच्या चित्रपटमाध्यमविषयक जाणिवेतील कमतरता आणि उणीवा यांचा एकत्रित परिणाम 'कलयुग' मधून व्यक्त झाला आहे.

या चित्रपटाद्वारे बेनेगलानी महानगरातील अफाट पसरलेल्या जगलात तीर मारण्याचे धाडस केल आहे. इतकंच नव्हे तर या जंगलातील नीती–नियमादी कल्पना नाना स्वरूपात प्रगट करणाऱ्या उद्योगपतीच्या घराण्यातील गुतागुत व्यक्त करण्याचं धारिष्ट्य दाखविण्यास ते धजावले आहेत.

मात्र एतक धाडस करूनही व व्यापक कथासूत्र, पार्श्वभूमी आणि बरंच काही व्यक्त करण्याची शक्यता असूनही दुर्दैवाने बेनेगल पुन्हा एकदा पोकळ फालतू विधानावर आधारित आपली सुरक्षित कल्पनाच 'कलयुग' मध्ये जोपासताना दिसतात. अतिशय गढुळ व वरपागी स्वरूपात ते या घराण्यातील गुंतागुतीचे संबंध रेखाटताना दिसतात.

शेअर-वायदे-बाजारात आणि रस्त्यावर या उद्योगपतीनी दिवसा-ढवळघा चालविलेल्या डावपेचाबाबत व त्यासाठी केलेल्या रक्तपाता-बाबत हा चित्रपट बोलतो. पैशाच्या प्रभुत्वाच्या हव्यासातून स्पर्धेचा बागुलबुवा उभा करून पिळवणुकीचे समर्थन करणाऱ्या या थैली-शाहीच्या जमातीचा निषेध अथवा त्याची सामाजिक गुन्हेगारी उघडकीस आणण्याऐवजी बेनेगल या पैशेवाल्यांच्या वरपागी स्वरू-पावरच थांबतात.

चित्रपटात तसे सूचित करण्याचा प्रयत्न लपलेला आहे; परंतु संपूर्ण चित्रपटाच्या लयीत तो हरवतो आणि बेनेगल पुन्हा एकदा स्वतःचा निश्चित दृष्टीकोन व्यक्त करण्याचं टाळतात. भोंगळ स्वरू-पात विषयाची माडणी करून एका चागल्या कल्पनेचा ते विचका करतात.

मूठभर श्रीमंतांच्या, थैलीशहांच्या जीवनविषयक धारणा, त्यांच्या नीतीकल्पना इत्यादी तपशीलात तर बेनेगल शिरतच नाहीत. पण या उद्योगपतीच्या 'आर्थिक नीतीमत्ते'वर कोरडे ओढण्याची संधी मिळूनही बेनेगल आणि त्यांचे लेखकद्वय (कर्नाड व दुबे) नाट्या-त्मक घटनांवर सर्व भिस्त टाकून या विषयाला वाऱ्यावर सोडतात– 'महाभारत' निर्माण करण्याची मनीषा बाळगुन !

दोन जुळघा उद्योगपतीच्या घराण्यातील सुदोपसुदीचे संघर्षचित्रण करून हे 'बूर्झ्वा' महाभारत निर्माण करण्याची मनीषा बाळगणारे बेनेगल आणि गिरीष कर्नाड रामायण व महाभारतातील काही नावाची आणि त्यासोबत चिकटलेल्या व्यक्तिमत्त्वाची, त्यातील पैलूची उधार–उसनवारी करतात.

यातील पात्रांना जी नावे दिली जातात त्याना सर्वसाधारणपणे महाभारतातील त्याच भूमिका अदा कराव्या लागतात. 'कलयुग' या महाभारताशी समात रअसलेल्या कथानकाचा साराश पुढीलप्रमाणे–

उद्योगधद्यामध्ये स्वत.चे भलेथोरले साम्राज्य निर्माण करणारे रामचंद आणि भीष्मचंद (ए. के. हंगल) हे दोघे भाऊ. यातील भीष्मचंद महाभारतातील भीष्माचे रूपक ब्रह्मचारी–आपल्या भावाच्या मुलीची काळजी वाहणारा. म्हातारपणामुळे 'सल्लेगिरी' करणारा, संघर्षातील पेचप्रसंगाच्या वेळी बाजू घेणारा !

रामचंदाला दोन मुले. एक खुबचंद (विनोद दोशी) पांगळा, असहाय, त्याची पत्नी देवकी (विजय मेहता) सुस्थिर, ताठर, पतीची सेवा वगैरे (म्हणजे 'आंधळी कोशिंबिरी'च्या खेळाप्रमाणे डोळ्याला कायमचाच रुमाल लावणारी गांधारी बरं का !) दुसरा मुलगा पुरणचंद, कुंतीशी किंवा सावित्रीशी (सुषमा सेठ) लग्न केल्यानंतर तीन परिचित पुत्रांचे व एका अनौरस पुत्राचे 'बारसे' पाहिल्यानंतर मृत्यू पावलेला. परपुरुषाशी संबंध ठेवणाऱ्या कुंतीचे चित्रपटात (सती) सावित्री असे नाव ठेवण्यात आले आहे.

साधारणतः कुटुंबाची अशी विभागणी झाल्यावर पुढच्या पिढीची ओळख करून देणे ओघानेच आले. पांगळघा खुबचंदाला दोन मुलं. एक दुःशासनरूपी धनराज (व्हिक्टर बॅनर्जी), तर दुसरा सदीपराज (आकाश खुराना). दोघेही निष्ठुर आणि निष्ठावान धंदेवाईक. त्यातील सदीपराज काहीसा उतावीळ.

पुरणचंद घराण्यात विधवा सावित्रीची तीन मुले. सर्वांत मोठा जुगारी धर्मराज (राजबब्बर) युधिष्ठिराचे रूपक, घोड्याच्या शर्यतीत सर्वस्व हरविलेला, नपुसकत्वाच्या भावनेपोटी संयमी स्वभावाचा मुखवटा चढविलेला. त्याची पत्नी सुप्रिया (रेखा) अतृप्ततेची झालर असलेली महत्त्वाकांक्षी स्त्री, द्रौपदीचे रूपक असल्यामुळे शारीरिकदृष्ट्या धर्मराजाची !

दुसरा मुलगा भरत उर्फ अर्जुन (अनंत नाग) हा संघर्षात्मक पवित्रा घेण्याची कल्पकता आणि ती पेलण्याची क्षमता असलेला, आणि तिसरा बलराज (कुलभूषण खरबंदा) थोडासा लंपट आणि काहीसा उतावीळ तर बलराजची पत्नी (रिमा लागू) त्याचा मुलगा सुनील (सुनील शानबाग) आणि भरतची पत्नी सुभद्रा (सुप्रिया पाठक) या तीन व्यक्तिरेखा म्हणजे संपूर्ण सूड-संघर्षाचे नाहक बळी पडणारे भाबडे निरोधक. याशिवाय पुरणचंद कुटुंबाला 'मोफत सल्ला' सेवा देणारा कृष्णरूपी किशन अंकल (अमरीश पुरी).

या सर्वांहूनही सर्वांत वेगळे आणि व्यामिश्र व्यक्तिमत्त्व म्हणजे कर्णरूपी करण (शशीकपूर), कुंती किंवा सावित्रीचा अनौरस पुत्र, स्वामीच्या आशीर्वादाचे हे अपत्य (चित्रपटातील मूर्ख प्रसंग) करण या सबंध कथानकातील निष्णात शत्रू असलेल्या धनराजच्या बाजूचा. सूड-स्पर्धेतून धंदाच गिळंकृत करण्याच्या प्रयत्नाला चालना देणारे व्यक्तिमत्त्व, संयमी व जाणता !

### व्यक्तिरेखांच्या भाऊगर्दीत हरवलेले बेनेगल

अशा अनेक व्यक्तिरेखांची भाऊगर्दी केल्यामुळे बेनेगलांचेच काय, समीक्षकांचे डोकेसुद्धा ताळ्यावर राहात नाही. (उपरोल्लिखित परिच्छेदातून वाचकाना 'WHO'S WHO' बाबत निश्चित कल्पना आली नसेल तर चित्रपटात ती येण्याची खात्रीच बाळगू नका.) आणि बेनेगलही याबाबत निश्चित कल्पना देण्याचा त्रोटकसाच प्रयत्न करतात.

२७ कोटीचे सरकारी कंत्राट मिळविण्याच्या ईर्षेने या दोन घराण्यात 'काडी' पडते आणि ही दोन घराणी एकमेकांविरुद्ध सूडाने पेटतात. संघर्षाची सूड-स्पर्धा सुरू होते...डावपेच, मारा-माऱ्या, खून, गुंडगिरी, आत्महत्या, औद्योगिक घातपात, कामगार-संघटनांची भडवेगिरी या सर्व गोष्टींचा वापर बेनेगलनिर्मित कुरुक्षेत्रावर केला जातो. फॅक्टरीच्या रणमैदानी या प्रसंगाची चांग-लीच जुंपते.

याच जोडीला महाभारतातील कल्पना समवेत धावण्याच्या शर्यतीत बेनेगल चांगलेच फसतात. कित्येक वेळा समांतर रूपके, चमत्कृतिपूर्ण, हास्यास्पद ठरतात. (उदा. ऐन टायमाला कर्णाच्या गाडीचे चाक पंक्चर होण्याचा प्रसंग) खरं तर खून आणि हिशेबी जुगार (मग तो भावनिक पातळीवरचा का असेना) या कथेतील महत्त्वाचे वळण ठरण्याऐवजी तो या 'बेनेगली कुरुक्षेत्रातला' औपचारिक भाग म्हणूनच गुंडाळला जातो. त्या खुनामागच्या युक्त्या आणि क्लृप्त्या 'गिमिक्स' पातळीला जाऊन पोचल्यामुळे त्यातील मुख्य धागा तुटतो आणि चित्रपट अगदी धंदेवाईक चित्रपटांच्या पातळीला जाऊन पोचतो.

ही दोन्ही घराणी सर्व तयारीनिशी जेव्हा या औद्योगिक युद्धात आपल्या सर्व भूतकाल व वर्तमानकालासह सहभागी होतात तेव्हा बेनेगल या सूडस्पर्धेमागे दडलेल्या व खोलवर रुजलेल्या प्रश्नांची दखल तर घेतच नाहीत, पण तसं सूचितही करत नाहीत.

मग संपूर्ण चित्रपटात ही सर्व मंडळी करतात काय, तर बेनेगल पात्राच्या विविध प्रकारच्या mannerisms व हालचालीतच वेळ घालवितात. चित्रपटात ही पात्रे एक तर टेलिफोनवर बोलत असतात किंवा डायनिंग टेबलावर जेवण किंवा नाश्ता करत असतात. व्यक्तिरेखांच्या भाऊगर्दीमुळे प्रत्येक कलाकाराला स्वतःचं स्वतंत्र व्यक्तिमत्त्व उभे करण्यास मिळालेला वाव फारच तोकडा असल्यामुळे या सर्वांना एकत्र गुंफण्यात, प्रत्येकाचे स्वतंत्र स्थान निर्माण करण्यात बेनेगलांचे अपुरेपण सिद्ध होते. यातील काही जणांचे अस्तित्व तर श्रेयनामावलीपुरतेच आहे.


गतिमान भरत, सुप्रिया व करण ही व्यक्तिमत्त्वं उभी करण्याचा बेनेगल प्रयत्न करतात; परंतु तो फसतो! त्यातल्या त्यात दुःशासनरूपी धनराजचं व्यक्तिमत्त्व साकार करण्यात ते यशस्वी ठरतात, प्रेक्षकांच्या मनावर हा निष्ठुर धंदेवाईक छाप पाडतो तो त्याच्या बंद खोलीतल्या आत्महत्येमुळे!

सुप्रिया झालेल्या रेखाच्या अभिनयाबाबतचा गवगवा मात्र फुसका ठरतो. 'खूबसुरत' चित्रपटात आपली अभिनयक्षमता पणास लावणारी रेखा येथे मात्र 'खानदानी स्त्री'च्या तसबिरीप्रमाणे शोभादायक वस्तू म्हणूनच वावरते. तिची तगमग, तिची महत्त्वाकांक्षा पुरेशी व्यक्तच होत नाही. गतिमान भरत मात्र काहीसा उठावदार वाटतो तो त्याच्या व्यक्तिमत्त्वाभोवती इतरांनी निर्माण केलेल्या वलयामुळे. शशीकपूरने मात्र संयमी कर्ण संयतपणे, काहीसा आब राखून केला आहे.

भरतची पत्नी झालेली सुप्रिया पाठकची व्यक्तिरेखा म्हणजे बेनेगलांचे आणखीन एक 'स्टिरिओ टाइप फाइंड.' 'मंथन'मधील सातत्याने रेडिओ ऐकणाऱ्या गिरीश कर्नाडच्या पत्नीशी मिळतेजुळते असे पात्र त्यांनी पुन्हा एकदा सुप्रियाच्या रूपाने उभे केले आहे.

छायाचित्रण आणि अभिनय या दोन अंगांबाबत आधीच्या चित्रपटात आत्मविश्वास दाखविणारे बेनेगल इथं मात्र 'अभिनय' हे अंग हाताळण्यात पूर्णपणे अयशस्वी ठरले आहेत. गोविंद निहलानींसारखा कॅमेरामन हाताशी असल्यामुळे छायाचित्रण नयनमनोहर वाटले तरी त्यात कोणत्याही प्रकारचा एकसूत्रीपणा दिसत नाही. अर्थात हा दोष निहलानींचा नसून संकलनाबाबत संथ गती ठेवणाऱ्या बेनेगलांचाच आहे. कै. बन्सी चंद्रगुप्त हा कलादिग्दर्शक तांत्रिक कलाकुसरीचा वापर करून पारंपारिक औद्योगिक घराण्यातील वातावरण हुबेहुबपणे उभे करण्यात यशस्वी ठरला आहे. (बहुधा बन्सीदांचा हा अखेरचाच चित्रपट असावा.)

'कलयुग'च्या निमित्ताने बेनेगल बाजारू चित्रपटांच्या कुशीत विसावले आहेत. याबाबतची त्यांची भूमिका आणि दृष्टिकोन याची सखोल चर्चा अगोदरच केली असल्यामुळे त्याचा ऊहापोह इथे करण्याचे टाळले आहे; पण एवढे मात्र निश्चित की, आशयाच्या दृष्टिकोनातून बेनेगल खरं तर अजूनही स्वतःच्या वैयक्तिक कुरुक्षेत्रातच अडकलेले आहेत. इतके दिवस सरपंचाच्या चावडीवर बसून सामाजिक बांधिलकीच्या गप्पा छाटणाऱ्या या दिग्दर्शकाने 'कलयुग'-च्या निमित्ताने व्यावसायिक व्यवस्थापनक्षेत्रात प्रवेश केला आहे. □



सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC–W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)

# मुंबई वार्ता

पृष्ठ ३ वरून

वासी कार्यकर्त्यांनाच तयार केलं होतं आणि आपल्या बोली भाषेतून त्यांनी या कार्यक्रमाचं निवेदन केलं होतं.

यानंतर लोकविज्ञान संघटना तिच्या आजच्या स्वरूपात उभी राहिली. जो कार्य करेल तो या संघटनेचा सभासद. आवश्यकता पडल्याशिवाय कुणाकडून दहा हजाराहून अधिक देणग्या घ्यायच्या नाहीत. एका देणगीदाराकडून दहा हजाराहून अधिक देणगी घ्यायची नाही, असे त्याचे काही नियम आहेत. लोकविज्ञान संघटनेच्या एका पुस्तिकेत म्हटल्याप्रमाणे 'ही विज्ञानचळवळ 'हे सर्व त्यांच्यासाठी...जे घडवू पहाताहेत... असंख्य अनामिक हातांच्या... सर्जनशीलतेच्या आधारानेच .. उद्याचे विज्ञान' लोकविज्ञान चळवळ कशासाठी ? तर लोक आणि विज्ञान यांच्यातली दरी दूर करण्यासाठी विज्ञानानं लोकाभिमुख व्हावं आणि लोकांनी विज्ञानाभिमुख व्हावं हा उद्देश. विसाव्या शतकात विज्ञानाची प्रगती आणि प्रसार खरं म्हणजे पुष्कळच झाला आहे; पण हा प्रसारही सगळीकडे सारखा झालेला नाही आणि मुख्य म्हणजे जिथे विज्ञानाचा प्रसार झालेला आहे, तिथेसुद्धा वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार झालेला नाही. जीवनाकडे बघण्याचा बौद्धिक दृष्टिकोन अजून आलेला नाही. म्हणून तर निरर्थक चमत्कारांवर विश्वास बसतो. अंधश्रद्धा पुरती मुळं रोवून असतात परीक्षाना जाण्याअगोदर ज्योतिष्याकडं जायची किंवा देवापुढे नाक घासायची गरज भासते, कारण आपल्याकडे विज्ञान अजून मानवी भावनाविश्वाचा आणि मनोव्यापाराचा भाग बनलेल नाही. विज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून अंधश्रद्धाविरुद्ध झगडा देणं हे महत्त्वाचं. अशिक्षितअर्धशिक्षित जनतेपर्यंत विज्ञान पोचवायचं तर अशा जत्रा भरवणं किंवा असे नाटयमय मार्ग अवलंबिणं प्रभावी ठरतं

पण लोकविज्ञान संघटना काय किंवा एकूण विज्ञान–चळवळ काय, यांच्या मार्गात याहूनही मोठया अडचणी येतात, जेव्हा सत्य, आरोग्य इत्यादीसाठी झगडणारा वैज्ञानिक, सामाजिक किंवा राजकीय अडथळयांवर आदळतो तेव्हा. उदाहरणार्थ—कारखानदारी, प्रदूषण, प्रदूषणामुळे आरोग्याला असणारा धोका हे सारं समजा, विज्ञानानं लोकापर्यंत पोचवलं; पण पुढे काय ? बेपर्वा कारखानदारांशी लढा द्यायला विज्ञानजत्राची कल्पकता उपयोगी पडणार नाही. अशा ठिकाणी जबर राजकीय नाही तर सामाजिक शक्ती पाठीशी हवी. प्रश्नांच्या या समाजिक पैलूची जाणीव लोकविज्ञानसंघटनेला नाही असं नाही; पण सध्या तरी केवळ त्यावर लक्ष केंद्रित करायचं नाही असं त्यानी ठरवलंय. बुवाबाजीवरचा त्यांचा कार्यक्रम पाहून मला वाटलं की, या एकेका कार्यक्रमातून निदान एका व्यक्तीला जरी काही कळलं तरी पुष्कळ झालं.

## □ ज्ञानेश्वर–समाधीची निगा

वैज्ञानिक दृष्टिकोन व्यावहारिक आयुष्यापर्यंत आणण्याचा हा एक प्रयत्न झाला. बाळ जाधव यांच्या छायाचित्रप्रदर्शनामागची प्रेरणाही काहीशी अशीच होती. लोकविज्ञानसघटनेचा हल्ला धार्मिक अंधश्रद्धावर होता. बाळ जाधवांच्या छायाचित्रप्रदर्शनामागचा हेतू भाबडया पूजे–अर्चेला वळण लावण्याचा होता. 'आळंदीदर्शन' अशा शीर्षकाचं हे प्रदर्शन आषाढी एकादशीनिमित्त आयोजित केलं होतं. छायाचित्रामधली कलात्मकता वाखाणण्याजोगी होती. मात्र प्रत्यक्षात मांडलेली छायाचित्रं आणि प्रदर्शनाचा हेतु यामध्ये मात्र फारसा घनिष्ठ संबंध होता असं नाही. छायाचित्रंही बहुतेक आळंदीतल्या दृश्याची, देवळाची होती. प्रदर्शनाचा उद्देश हा तसा बहुचर्चित विषय–संत ज्ञानेश्वरांच्या समाधीची निगा आणि जीर्णोद्धार, हा तो विषय. ज्ञानेश्वरांनी समाधी घेतली त्या काळातसुद्धा पुरातन असणारं असं हे समाधिस्थान ! तेव्हा आता इतक्या कालांतरानं, वरच्या भारानं आणि मुख्यतः दूध-पाण्याच्या अभिषेकानं ते खचून चालल आहे. समाधी आपल्या पुरातन स्वरूपात राखायची असेल आणि भाविकांची अभिषेकाची इच्छाही पूर्ण करायची असेल तर एक नवीन समाधिमंदिर बांधायला हवं. तिथे अभिषेक करता येतील. शिवाय अशा स्थानाला साजेशा पद्धतीनं ते सजवताही येईल, या विषयावर आतापर्यंन्त असे तर्कशुद्ध विचार बरेच मांडले गेले आहेत अशा प्रदर्शनाद्वारे किंवा प्रदर्शनासोबत ते मांडणे हा मात्र अभिनव मार्ग असावा.

आषाढी एकादशीनिमित्त आलेले हे दोन कार्यक्रम...विज्ञानजत्रा आणि छायाचित्रप्रदर्शन हे दोन्ही कार्यक्रम एकाच दिशेने तोंड करून आहेत. तुमच्या–आमच्यासाठी आषाढी एकादशीचा अर्थ म्हणजे केवळ उपवास, भाविक वारकऱ्यांसाठी आषाढी एकादशी म्हणजे बेभान दिंडया, तल्लीन नामस्मरण आणि उत्कट पारमार्थिक अनुभव! आषाढी एकादशी म्हटल्यावर आणखीही काही चित्र नजरेसमोर येतं. दिंड्यामधली विषमता, गैरसोयी, अनारोग्य, अस्वच्छ-मलीन परिसर, बडव्याची मक्तेदारी, देवाच्या असहाय्य उघडया डोळयांसमोर होणारी गरीब भक्तांची पिळवणूक आणि उपेक्षा, निरर्थक भाबडया अंधश्रद्धा आणि भोंदू बुवांनी चालवलेली लूटमार हे सारे सामाजिक कलंक आहेत. ते पुसून काढायचे तर समाजात बौद्धिक वृत्तीचा प्रसार व्हायला हवा; पण हा वैज्ञानिक दृष्टिकोन येणार कसा ? विज्ञानाच्या पाठयपुस्तकांतून ? ती तर बहुधा थिअॉरेटिकल, कोरडी असतात ! शिवाय 'रिलेटिविटीचा सिद्धान्त' नाही तर 'प्रकाशाच्या वक्रीभवनाचे नियम... १)...२)...' असं शिकवण्यापेक्षा त्याचा व्यावहारिक संदर्भ शिकवणं हेच अधिक महत्त्वाचं सकल जन शहाणे करून सोडावे ते याच मार्गानं. त्यांचं रंजन करून धर्म आणि विज्ञान अशा रीतीनं एकमेकांच्या हातात हात घालून येत असतील, तर ते आपल्याला श्रेयस्करच आहे !

—ललिता बर्वे